सत्यमेव जयते

महाराष्ट्र विधानमंडळ

सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.६ तसेच " महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१३ तसेच " महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१४ तसेच " महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१८ ते ३.२० तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१२ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१३-२०१४ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महिला आर्थिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.२ यावरील समितीचा

नववा अहवाल

(दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई

सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.६ तसेच " महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१३ तसेच " महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१४ तसेच " महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१८ ते ३.२० तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१२ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१३-२०१४ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महिला आर्थिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.२ यावरील समितीचा

नववा अहवाल

सार्वजनिक उपक्रम समिती
(२०१५-२०१६)

समिती प्रमुख :

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

सदस्य

(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.
(४) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(५) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.
(६) ॲड आकाश फुंडकर, वि.स.स.
(७) श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.
(८) श्री. अमित साटम, वि.स.स.
(९) श्री. राजन साळवी, वि.स.स.
(१०) श्री. हर्षवर्धन जाधव, वि.स.स.
(११) श्री. सुनिल राऊत, वि.स.स.
(१२) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.
(१३) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(१४) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.
(१५) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१६) श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.
(१७) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स
(१८) श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स
(१९) श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.
(२०) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(२१) ॲड. अनिल परब, वि.प.स.
(२२) श्री. किरण पावसकर, वि.प.स.
(२३) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.
(२४) आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.
*(२५) रिक्त

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री. राजेश तारवी, उप सचिव,
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,
श्री. प्र.स.मयेकर, अवर सचिव (समिती),
श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

* श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स. यांची दिनांक ७ जुलै, २०१६ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्याने सदर जागा रिक्त आहे.

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
प्रस्तावना		(सात)
एक	**" महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ "** (लेखापरीक्षा अहवाल २००९-२०१०) **(१) अपफ्रंट किंमतीची कमी वसुली** (परिच्छेद क्रमांक ३.६)	१
दोन	**" महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित "** (लेखापरीक्षा अहवाल २००९-२०१०) **(२) निष्फळ खर्च** (परिच्छेद क्रमांक ३.१३)	८
तीन	**" महाराष्ट्र राज्य इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित "** (लेखापरीक्षा अहवाल २००९-२०१०) **(३) निष्फळ खर्च** (परिच्छेद क्रमांक ३.१४)	१७
चार	**" महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ "** (लेखापरीक्षा अहवाल २००९-२०१०) **(४) महसुलाचे नुकसान** (परिच्छेद क्रमांक ३.१८) **(५) टाळता येण्याजोगा खर्च** (परिच्छेद क्रमांक ३.१९) **(६) टाळता येण्याजोगा खर्च** (परिच्छेद क्रमांक ३.२०)	३०

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
पाच	**" महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित "** (लेखापरीक्षा अहवाल २०१०-२०११) **(७) अपुरे अंतर्गत नियंत्रण** (परिच्छेद क्रमांक ३.१२)	४६
सहा	**" महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित "** (लेखापरीक्षा अहवाल २०१३-२०१४) **(८) आयकर परताव्याची मागणी न करणे** (परिच्छेद क्रमांक ४.२)	५२
सात	**बैठकीचे परिशिष्ट**	५७

प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून महाराष्ट्र शासनाच्या सन २००९-२०१० च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.६ तसेच " महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१३ तसेच "महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१४ तसेच "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१८ ते ३.२० तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१२ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१३-२०१४ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील "महिला आर्थिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.२ यावरील समितीचा नववा अहवाल (तेरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

" महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिव, श्रीमती वल्सा नायर-सिंह, तसेच " महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री. विलास पाटील, यांची समितीने दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर उद्योग विभागाचे प्रधान सचिव, अपूर्व चंद्रा तसेच " महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादितचे " महाव्यवस्थापक (संचलन), श्री.पी.वाय.टेंभरे, यांची समितीने दिनांक १० मे,२०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव, श्री. श्याम तागडे, तसेच "महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री.शरद बा.लोंढे, यांची समितीने दिनांक २ फेब्रुवारी,२०१६ व २४ मे,२०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर उद्योग विभागाचे प्रधान सचिव, अपूर्व चंद्रा तसेच "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे " मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.भूषण गगराणी, यांची समितीने दिनांक २६ एप्रिल,२०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, डॉ.भगवान सहाय, तसेच "महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादितचे " महाव्यवस्थापक, श्री.अशोक अमानकर, श्री.संजय ठकरार, व श्री.आज.जी.नाके, यांची समितीने दिनांक १८ मे,२०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महिला आर्थिक विकास महामंडळ " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर " महिला आर्थिक विकास महामंडळाच्या " उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती कुसुम बाळसराफ तसेच महिला व बालविकास विभागाचे उप सचिव, श्री. ब.बा.चव्हाण, यांची समितीने दिनांक १ मार्च, २०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार (लेखा III), श्री.रविकिरण उबाळे, उप महालेखाकार तसेच श्री.एस.व्ही.खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी (वाणिज्यिक लेखापरीक्षा) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. तसेच सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिव, श्रीमती वल्सा नायर-सिंह, तसेच " महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री. विलास पाटील, तसेच उद्योग विभागाचे प्रधान सचिव, अपूर्व चंद्रा तसेच " महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादितचे " महाव्यवस्थापक (संचलन), श्री.पी.वाय.टेंभरे, तसेच सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव, श्री. श्याम तागडे, व " महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे " मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.भूषण गगराणी, तसेच " महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री.शरद बा.लोंढे, तसेच कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, डॉ.भगवान सहाय, तसेच "महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादितचे " महाव्यवस्थापक, श्री.अशोक अमानकर, श्री.संजय ठकरार, व श्री.आज.जी.नाके, तसेच " महिला आर्थिक विकास महामंडळाच्या " उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती कुसुम बाळसराफ तसेच महिला व बालविकास विभागाचे उप सचिव, श्री.ब.बा.चव्हाण, यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने सोमवार दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक १ ऑगस्ट २०१६.

डॉ. सुनिल देशमुख,
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

" महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ "

(सन २००९-२०१०)

एक - अपफ्रंट किमतीची कमी वसुली :—(कंपनीला बीओटी कार्यचालकाकडून अपफ्रंट किंमतीची कमी वसुली केल्यामुळे रु. ४.२१ कोटी महसुलाचा तोटा सहन करावा लागला होता).

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-१० च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.६ मध्ये **" अपफ्रंट किंमतीची कमी वसुली "** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, कंपनीने तीन *स्टुडिओ आणि दळणवळण केंद्र चित्रनगरीमध्ये गोरेगांव, येथे बांधण्याचा निर्णय (जून २००२) मध्ये घेतला व बांधकामाच्या खर्चासाठी रु. २० कोटीचे बॉण्ड व्याजासहित जारी करून कर्ज घेतले होते. परंतु, कंपनीने या कामासाठी फक्त रु. ६.२९ कोटी खर्च केले व उरलेले कर्ज दुसऱ्या कामासाठी परावर्तित केले. नंतर हा प्रकल्प (जून २००३) निधीची कमतरता आणि इतर कारणास्तव परित्याग करण्यात आले. परंतु कंपनीच्या संचालक मंडळाने हा प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर राबविण्याचे ठरविले (फेब्रुवारी २००४).

कंपनीने या प्रकल्पासाठी अंदाजित खर्च रु. ५४.२३ कोटी निश्चित केला ज्याच्यामध्ये खालील बाबींचा समावेश होता :—

- कंपनीने बांधकामावर केलेला खर्च रु. ६.२९ कोटी व कंपनीने केलेल्या बांधकामाचे सद्दःमुल्यासाठीचे अतिरिक्त मूल्य रु. ३.३३ कोटी आणि सल्लामसलतसाठी रु. ४.०३ कोटी खर्च केला होता.
- इतर खर्च आणि रु. ४०.५८ कोटी हे उरलेले काम खाजगी संस्थेद्वारा पुर्ण करण्यासाठी होते.

त्या अनुसार हा प्रकल्प बीओटी तत्वावर पुर्ण करण्यासाठी निविदा मागविल्या होत्या. कंपनीने (ऑगस्ट, २००७) स्टुडिओ बांधण्याचे काम ॲडलाब मर्यादित तर दळणवळण केंद्र बांधण्याचे काम मुक्ता आर्टस मर्यादितला त्यांच्या निविदा सर्वात ** जास्त रकमेच्या होत्या म्हणून दिले होते. केंद्र सरकारच्या सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्पासाठी अपफ्रंट टॅरिफ सेंटिगच्या मार्गदर्शक तत्वानुसार, कोणत्याही प्रकल्पाची अपफ्रंट किंमत निश्चित करताना त्यात प्रामुख्याने भांडवली आणि कार्यचालन खर्चाचा समावेश असतो. भांडवली खर्चामध्ये इतर खर्चाबरोबर भांडवल पुरवठा खर्च व बांधकाम कालावधीतील व्याजाचा समावेश असतो. कंपनीने बाजारात बॉण्ड जारी करून भांडवल उभे केल्यामुळे अपफ्रंट किंमत निश्चित करताना त्यावरील व्याजाचाही समावेश करावयास हवा होता. आम्हाला लेखापरिक्षणात असे दिसून आले की, अपफ्रंट किंमत रु. १३.६४ कोटी ठरविताना कंपनीने कर्जावरील व्याजापोटी दिलेल्या (एप्रिल २००२ ते मार्च २००७ या कालावधीसाठी) रु. ४.२१ कोटीचा विचार न केल्यामुळे बीओटी ऑपरेटरकडून तेवढ्या रकमेची कमी वसुली रु. ४.२१ कोटी झाली आणि परिणामस्वरुप कंपनीला महसुलाचे नुकसान झाले होते.

* **स्टुडिओ VII, VIII आणि IX**

** **ज्या बोलीदाराने सर्वात जास्त किंमतीचा अपफ्रंट किंमत देकार दिला होता त्यांना बीओटी तत्वावर काम प्रदान करण्यात आले होते.**

शासन / व्यवस्थापनाने हे मान्य करताना (जून-सप्टेंबर २०१०) सांगितले की, कंपनीने या व्याजाचा अपफ्रंट किंमतीमध्ये समावेश केला नाही कारण कंपनीने आधीच ५० टक्के अतिरिक्त खर्चाचा समावेश २००१-०२ मधील जिल्हा दर सुचीनूसार केलेला होता व ठेकेदाराला जुलै २००३ पर्यंत वाढलेला खर्च दिला होता.

कंपनीने दिलेले उत्तर हे तथ्यावर आधारित नव्हते कारण प्रत्यक्ष दिलेल्या रु. ४.२१ कोटीत संपूर्ण व्याजाचा समावेश अपफ्रंट किंमत निश्चित करताना विचारांत घ्यायला हवा होता, म्हणून शिफारस करण्यात येते की, बीओटी करार अंमलात आणताना अपफ्रंट किंमत सार्वजनिक खाजगी भागीदारी मार्गदर्शक तत्वानुसार ठरवावी. निधीचा खर्च योग्यरित्या अंदाजित करावा. तसेच बीओटी करारासाठी होणारा उशीर टाळावा जेणेकरून कालमर्यादा वाढणार नाही आणि कंपनीला महसुलाचे नुकसान होणार नाही.

१.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महामंडळाने कलागारे व बहुउद्देशिय केंद्र (Communication Centre) चा पुनर्विकास करण्यासाठी तसेच, इंडियन ओव्हरसीज बँकेचे अधिक व्याज दराचे जूने कर्जाची परतफेड करण्यासाठी आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ठेव रकमेची परतफेड करण्यासाठी यांचेकडून घेतलेल्या रु. २०.०० कोटी एवढ्या रकमेचे कर्जरोखे उभारले होते. (संचालक मंडळाची बैठक क्र. ८० दिनांक ३० जानेवारी २०११) कर्जरोख्यांमधून प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग महामंडळाने खालीप्रमाणे केला आहे :—

अ. क्र.	तपशिल	रक्कम (रु. कोटी)
(१)	(२)	(३)
१.	इंडियन ओव्हरसीज बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड	५.४५
२.	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून घेतलेल्या ठेवीची परतफेड.	२.७०
३.	कलागारे प्रकार ४ वरील खर्च	३.१५
४.	नवीन प्रकल्प कलागारे प्रकार ७, ८ व ९ वरील खर्च	३.५३
५.	हम एक है कार्यक्रम वरील खर्च	५.८०

कलागार प्रकार ७, ८, ९ व बहुउद्देशिय केंद्र यावर एकूण रु.६.२९ कोटी इतका खर्च करण्यात आला. वरील तत्क्त्यावरून हे स्पष्ट होते की, नवीन प्रकल्प म्हणजेच कलागार प्रकार ७,८,९ व बहुउद्देशिय केंद्र यांचा पुनर्विकास या कामाकरिता कर्जरोखे म्हणून प्राप्त निधीतील फक्त रु. ३.५३ कोटी इतका खर्च करण्यात आला व उर्वरित खर्च रु. २.७६ कोटी (रु. ६.२९ कोटी- रु. ३.५३ कोटी) हा महामंडळाच्या स्वउत्पन्नातून भागविण्यात आला.

महामंडळाने नवीन प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर विकसित करण्याचे ठरविले. त्यानुसार BOT प्रकल्पाकरिता कंत्राटदार अंतिम करण्यासाठी संचालक मंडळाच्या दिनांक ६ मे २००७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावेळी संचालक मंडळाने यशस्वी निविदाकारांसोबत करारनामा करण्यापूर्वी सदर प्रकल्पाची संपूर्ण कार्य पद्धती (processing) तसेच, आर्थिक सुसाध्यता (Financial feasibility) आणि आर्थिक व्यवहार्यता (Financial Viability) या बाबतचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) किंवा सिकॉम (SICOM) यापैकी एखाद्या नामवंत संस्थेकडून पृथ:करण करून घेण्यात यावे या अटीवर कंत्राटदार नियुक्त करण्याची मान्यता दिली. महामंडळाने मे. सिकॉम यांना दिनांक ७ जून २००७ च्या पत्रान्वये प्रकल्पाच्या आर्थिक व्यवहार्यतेबाबत पृथ:करण करून देण्याबाबत विनंती केली.

मे. सिकॉम यांनी सदर प्रकल्पासाठी संबंधित सर्व संबंधित कागदपत्रे, अहवाल, ताळेबंद यांची तपासणी केली. तसेच, कलागार व त्या क्षेत्रातील सल्लागार तसेच महामंडळामधील अधिकाऱ्यांशी चर्चा केली व महामंडळाने प्रस्तावित केलेल्या अपफ्रंट रकमेस (सदर प्रकल्पाकरिता महामंडळाने यापूर्वी खर्च/गुंतवणुक) यांस संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाकरिता महामंडळाने रु. १३६४.२५ लाख इतकी अपफ्रंट रक्कम सल्लागारांच्या मदतीने निश्चित करण्यात आली होती. त्याचा सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे आहे :—

१. महामंडळाने सदर प्रकल्पाकरिता बांधकामावर केलेला प्रत्यक्ष खर्च रु. ६२९ लाख

२. अतिरिक्त खर्च रु. ३.३३ कोटी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून स्थापत्य बांधकामाचे मूल्य ठरविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जिल्हा दरसूची (DSR) नुसार महामंडळाने अंशत: बांधकाम केलेल्या कामासाठी आलेल्या खर्चाची पुन:श्च परिगणना महामंडळाने केली असून ती रु. ९.६२ कोटी इतकी निश्चित करण्यात आली. ही बाब लक्षात घेता महामंडळाने रु.३.३३ कोटी इतकी रक्कम (रु. ९.६२ कोटी - रु. ६.२९ कोटी) ही अतिरिक्त रक्कम या स्वरुपात अपफ्रंट रकमेमध्ये समाविष्ट केली आहे.

३. इतर खर्च रु. ४.०३ कोटी : सदर रक्कम सल्लागारांचे शुल्क, कार्यपद्धतीचे शुल्क, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना प्रदान केलेला कर व इतर रकमा आणि अंशत: बांधकामासाठी महामंडळाचे वापरण्यात आलेले मनुष्यबळ यावरील खर्च अशा सर्व बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

महामंडळाने तयार सल्लागारांच्या मदतीने उपरोक्तप्रमाणे ठरविलेल्या वरील deal बाबत SICOM यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत :—

जर संपूर्ण प्रकल्प आता कार्यान्वित करावयाचे ठरविले असते तर प्रकल्पाची एकूण अंदाजित रक्कम अधिक झाली असती. म्हणजेच महामंडळाने २००१ ते २००४ मध्ये सदर प्रकल्पावर खर्च केलेली रक्कम रु. ६.२९ कोटी ऐवजी रु. ९.६२ कोटी इतकी खर्च झाली असली. म्हणून चालू बाजार दर विचारात घेता रु. ३.३३ कोटी इतकी रक्कम अतिरिक्त खर्च म्हणून अपफ्रंट रक्कमेमध्ये दर्शविलेली आहे. हे योग्य आहे.

इतर खर्चाबाबत तपशिलवार माहिती उपलब्ध न झाल्याने त्यांची व्यवहार्यता तपासता आली नाही. परंतु इतर खर्च या शीर्षाखाली दर्शविलेल्या बाबीबाबत अधिकतम दरामुळे महामंडळास फायदा होत आहे.

SICOM यांच्याकडून BOT रक्कम, अपफ्रंट रक्कम, Lease Rent याबाबतचा संपूर्ण प्रकल्प अहवाल सादर झाल्यानंतरच महामंडळाने दिनांक ३० ऑक्टोबर २००७ रोजीच्या संचालक मंडळाच्या १०४ व्या बैठकीमध्ये मान्यतेकरिता प्रस्ताव सादर केला.

महालेखापाल यांनी आक्षेपात असे नमूद केले आहे की, अपफ्रंट रकमेची परिगणना करताना यशस्वी निविदाकारांकडून कर्जरोखे रक्कम रु. २०.०० कोटीवरील व्याज रु. ४.२१ कोटी ही रक्कम (एप्रिल, २००३ ते मार्च, २००७ या कालावधीतील) देखील वसूल करणे आवश्यक होते.

या ठिकाणी असे नमूद करण्यात येते की, महामंडळास कर्जरोखेद्वारे रु. २०.०० कोटी इतका निधी मिळाला असला तरीही नवीन प्रकल्पाकरिता महामंडळाने त्यापैकी फक्त रु. ३.५३ कोटी इतका निधी खर्च केलेला आहे. अभिलेख्यांप्रमाणे महामंडळाने एप्रिल, २००३ ते मार्च, २००७ या कालावधीत रु. २०.०० कोटी रक्कमेच्या कर्जरोख्यावर एकूण रु. ७.२८ कोटी इतके व्याज प्रदान केलेले आहे. महामंडळाने कर्जरोखेद्वारे उभारलेल्या रकमेतून फक्त १७.६५% इतकी रक्कम नवीन प्रकल्पांकरिता वापरलेले असल्याने त्याच्या सममूल्य व्याजाची रक्कम रु. १.२९ कोटी इतकी अप फ्रंट रक्कमेमध्ये समाविष्ट करता आली असती. मात्र, येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, UPFRONT रक्कम वसूल करताना महामंडळाने त्या तारखेपर्यंत पूर्ण झालेल्या कामावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% रक्कम (वर्ष २००१ च्या DSR दरानुसार) + कंत्राटदारास Premium रक्कम + जुलै २००३ पर्यंतची दरवाढ + अतिरिक्त खर्च रु. ४.०३ कोटी ज्यामध्ये अंशत: बांधकामाकरिता महामंडळाचे मनुष्यबळ वापरण्याबाबतचा खर्च याचाही समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे महामंडळाने जरी कर्जरोख्यांवरील व्याज रु. १.२९ कोटी ही रक्कम यशस्वी निविदाकारांकडून वसूल केलेली नसली तरीही महामंडळाने अगोदरच जवळपास सर्व बाबींवर झालेला खर्च वसूल केलेला असून यशस्वी निविदाधारकारांसोबत UPFRONT रकमेच्या बाबतीत अतिशय चांगले deal केलेले आहे. SICOM यांनी दिलेल्या अभिप्रायांवरून सदर बाब पूर्णपणे स्पष्ट होते.

त्यामुळे महामंडळाने BOT cost ठरवताना जवळपास सर्वच बाबी ज्या महामंडळास फायदेशीर ठरतील त्या विचारात घेतलेल्या असून संचालक मंडळाने वेळोवेळी त्यास मान्यताही दिलेली आहे. हे पाहता सदर परिच्छेदाचे स्पष्टीकरण स्विकारण्यात यावे अशी विनंती करण्यात येत आहे. तसेच, महामंडळास सद्यस्थितीत या प्रकल्पापासून नियमित lease rent मिळावयास सुरूवात झालेली आहे. भविष्यात महामंडळाकडून BOT तत्वावर प्रकल्प राबवावयाचे झाल्यास आवश्यक ती सर्व दक्षता घेण्यात येईल.

१.३ याप्रकरणी " बांधा, वापरा व हस्तांतर करा " या तत्वावर प्रकल्प निश्चित करताना महामंडळाने त्यांना फायदेशीर ठरतील अशा जवळपास सर्व बाबी विचारात घेतल्या होत्या. हे सिकॉम सारख्या तज्ज्ञ संस्थेच्या मार्गदर्शनानुसार निश्चित करण्यात आले होते. याचबरोबर महामंडळाला या प्रकल्पापासून नियमित भाडे मिळण्यास सुरूवात झाली आहे. या बाबी लक्षात घेता महामंडळाचे अभिप्राय स्विकारार्ह आहेत.

अहवालात केलेल्या शिफारशीनुसार भविष्यात " बांधा, वापरा व हस्तांतर करा " या तत्वावर प्रकल्प निश्चित करताना अपफ्रंट किंमत सार्वजनिक खाजगी भागीदारी मार्गदर्शक तत्वानुसार निश्चित करण्यात येईल याची दक्षता घेण्याचे महामंडळाने मान्य केले असून या परिच्छेदाबाबत महालेखापालांनी केलेल्या शिफारसी भविष्यात महामंडळ अंमलात आणील. यास्तव सदर स्पष्टीकरण मान्य व्हावे..

१.४ समितीला सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २७ ऑगस्ट २०१५ रोजी सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी अपफ्रंट किंमतीची कमी वसूली झाल्यामुळे महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाला तोटा सहन करावा लागला, याबाबत विभागाने खुलासा करण्यात यावा तसेच महामंडळाने २० कोटी रुपयांचे कर्ज रोखे व्याजासहित जारी करुन कर्ज घेतले होते, त्यामुळे महामंडळावर व्याजाचे दायित्व असताना तसेच पीपीपी मॉडेल व त्याबाबतची मार्गदर्शक तत्वे शासनाने स्विकारली असताना त्यानुसार अपफ्रंट किंमत निश्चित करतांना व्याजाची रक्कम महामंडळाने गृहित धरलेली नाही. तसेच किमान भविष्यातील प्रकल्पांच्या बाबतीत तरी महामंडळ व्याजाची रक्कम गृहित धरणार आहे का अशी विचारणा समितीने केली असता, विभागाचे प्रधान सचिव तसेच महामंडळाच्या प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, महामंडळाने स्टुडिओवर ६.२९ कोटी रुपये खर्च केला होता. अपफ्रंट किंमत ठरविताना व्याज विचारात घेणे आवश्यक होते. त्यावेळी ६.२९ कोटी रुपये ही किंमत गृहित धरताना जिल्हा दरसुचीप्रमाणे जो दर आला, ती इमारतीची किंमत निश्चित करण्यात आली होती, त्यामुळे व्याज आकारण्याचा प्रश्न आला नाही. ही बाब सिकॉम सारख्या तज्ज्ञ संस्थेच्या मार्गदर्शनानुसार निश्चित करण्यात आली होती आणि त्यांनी परिक्षण केल्यानुसार अपफ्रंट किमत ठरविण्यात आली होती. तसेच या प्रकल्पानंतर कोणताही पीपीपी धर्तीवर प्रकल्प झालेला नाही. भविष्यात अपफ्रंट किंमत ठरविताना व्याज विचारात घेण्यात येईल. त्यानंतर समितीने पीपीपी मॉडेलवर सुरू असलेल्या दोन स्टुडिओबाबतच्या माहितीची तसेच कंपन्यांकडून महामंडळाला प्राप्त झालेल्या रकमेबाबत विचारणा केली असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, पीपीपी मॉडेलवर सुरू असलेले दोन स्टुडिओ या दोन वेगळ्या कंपन्या आहेत. स्टुडिओ ७ मधून २ कोटी ३८ लक्ष रुपये, स्टुडिओ ८ मधून १ कोटी ३६ लक्ष रुपये, स्टुडिओ ९ मधून १ कोटी ४६ लक्ष रुपये अपफ्रंट कॉस्ट मिळाली आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, सर्व स्टुडिओ महामंडळाने बांधावेत अशी महामंडळाची मूळ योजना असतांना नंतर त्यात बदल करून महामंडळाच्या हे स्टुडिओ पीपीपी तत्वावर खाजगी विकासकांकडून बांधून घ्यावेत. असे ठरविले, त्यामुळे नंतरच्या निर्णयामुळे महामंडळाला फायदा झाला की तोटा झाला, याचा काहीही ताळमेळ बसत नाही. त्यांच्यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही. महामंडळाने ही रक्कम उभारण्यासाठी

व्याज देण्याच्या अटीवर बंधपत्र (बॉण्ड) काढले. त्या ठिकाणी व्हिसलवुड, नंतर रिलायन्स व मुक्ता आर्टस् अशा खाजगी कंपन्यांनी अगोदर शिरकाव केला. यामधून महामंडळाला फायदा झाला आहे का, या समितीच्या प्रश्नाबाबत खुलासा करतांना महामंडळाच्या प्रतिनिधींनी रिलायन्स आणि मुक्ता आर्टस् यांना खुल्या निविदेमध्ये हे काम देण्यात आले होते. खुल्या निविदेमध्ये या कंपन्यांची बोली सर्वोच्च होती. या निविदा प्रक्रियेत रिलायन्स, बी.आर.फिल्म्स आणि मुक्ता आर्टस्, अशा तीन कंपन्यांच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. बांधा वापरा व हस्तांतर करावयाचा खर्च रु. १३ कोटी ६४ लक्ष होता आणि त्यावरील व्याजापोटी १० कोटी १६ लक्ष रुपये महामंडळाला मिळाले. अपफ्रंट प्राईसच्या रकमेवर दरसाल दरशेकडा १० टक्के याप्रमाणे व्याज मिळाले आहे. त्यामधील काही रक्कम मुदत ठेवीसाठी आणि काही रक्कम विकासात्मक कामांसाठी वापरली गेली आहे. लिज रेंट १३ कोटी ९१ लक्ष रुपये मिळाले आहे. स्टुडिओनिहाय दर सांगावयाचा झाल्यास स्टुडिओ क्रमांक ७ ला ८८ लक्ष ५२ हजार, स्टुडिओ क्रमांक ८ ला १ कोटी ४ लक्ष, स्टुडिओ क्रमांक ९ ला ६३ लक्ष ६४ हजार आणि कम्युनिकेशन सेंटरला ४४ लक्ष ६७ हजार रुपये एवढे भाडे आहे. तसेच २६१०१ स्क्वेअर मीटरवर स्टुडिओ आहे. सदरची जागा लिजवर देण्यात आली आहे. लिजची मुदत २० वर्षांची असून ती सन २०२७ मध्ये संपणार आहे. दरवर्षी लिज भाड्यामध्ये ५ टक्के वाढ होते. आतापर्यंत लिज भाड्यामधून १३ कोटी ९१ लक्ष रुपये आणि त्यावरील व्याज २ कोटी ६८ लक्ष रुपये मिळाले आहेत. महामंडळाला अपफ्रंट प्राईस १३ कोटी ६४ लक्ष रुपये एकरकमी मिळाली आहे. त्यावर आपल्याला दरवर्षी व्याज मिळत असते. लिजची मुदत सन २०२७ पर्यंत आहे. त्यामुळे दरवर्षी मिळणारे व्याज सन २०२७ पर्यंत अपफ्रंट प्राईसवर सन २०२७ पर्यंत काल्पनिक व्याजाची गणना (नोशनल इंटरेस्ट कॅलक्युलेट) केल्यास ती रक्कम १० कोटी १६ लक्ष एवढी होते. अपफ्रंट प्राईस, लिज रेंट आणि त्यावरील व्याज असे मिळून महामंडळाला सन २०२७ पर्यंत ४० कोटी रुपये मिळतील. सुरुवातीला २० कोटी रुपये कर्जरोख्याच्या माध्यमातून उभारण्यात आले. ५.४५ कोटी रुपये इंडियन ओव्हरसीज बँकेकडून कर्जाव्दारे उभारले होते. बॉण्डच्या रकमेवरील परतावा १७ टक्केप्रमाणे आहे तर बँकेकडून १३ टक्क्यांनी कर्ज मिळाले आहे. त्यामुळे यामधून आपल्याला ५ कोटी ४५ लक्ष परतफेड झाली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून २ कोटी ७० लक्ष रुपये त्याच दराने घेतले होते त्यांचेकडून त्यांची १३ टक्के व्याजदराने कर्ज घेऊन परतफेड केली आहे. स्टुडिओ ४ वरील खर्च ३ कोटी १५ लक्ष रुपये आहे. हा खर्च या कर्ज रकमेतून केला आहे. नवीन स्टुडिओ ७, ८ व ९ यावर ३ कोटी ५३ लक्ष रुपये खर्च झाला असून " हम एक है ", या टी.व्ही.शो साठी ५ कोटी ८० लक्ष रुपये खर्च झाले आहेत. असे समितीस सांगितले. यानंतर समितीने विचारणा केली की, " हम एक है " या दूरदर्शन कार्यक्रमासंदर्भात नेमकी ही कल्पना काय होती, ती कोणाची होती व त्या कार्यक्रमामधून काय साध्य झाले आहे, याबाबत माहिती देतांना महामंडळाच्या प्रतिनिधींनी या कार्यक्रमाची कल्पना तत्कालीन प्रधान सचिव तथा महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक, श्री.गोविंद स्वरुप यांची होती. परंतु, या कार्यक्रमाला पाहिजे तेवढे यश मिळाले नाही. राष्ट्रीय एकात्मता या संकल्पनेविषयी हा कार्यक्रम दूरदर्शनवरून प्रसारित करावयाचा होता. परंतु, त्याच वेळी गुजरातमध्ये दंगल झाल्यामुळे हा कार्यक्रम टी.व्ही.वर प्रसारित होऊ

शकला नाही आणि या कार्यक्रमाच्या खर्चाची सर्व दायित्व महामंडळावर आले. या प्रकरणी विभागीय तसेच लाचलुचपत विभागामार्फत चौकशी सुरू असून संबंधितांचे ५ वर्षाचे निवृत्ती वेतन रोखण्यात आले असून दोषीवर लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम तसेच भारतीय दंड संहिते अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत तसेच तत्कालीन विभागीय सचिव तथा महामंडळाचे कार्यकारी संचालक आणि वित्तीय सल्लागार यांना निलंबित करण्यात आले असून दोन वर्षात या प्रकरणी अंतिम निर्णय होईल असे समितीस सांगितले.

१.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.६ " अपफ्रंट किंमतीची कमी वसूली " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली साक्षीच्या वेळी असे निदर्शनास आले की, **महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने तीन स्टुडिओ आणि एक दळणवळण केंद्र गोरेगांव येथील चित्रनगरीमध्ये बांधण्यासाठी रु. २० कोटीचे बॉण्ड व्याजासहित जारी करून कर्ज घेतले होते. परंतु महामंडळाने या कामासाठी फक्त रु. ६.२९ कोटी खर्च केले होते व उरलेले कर्ज दुसऱ्या कामासाठी परावर्तित केले आहे. ज्या कामासाठी बॉन्ड जारी करण्यात आले त्याकामासाठी बॉन्ड वापरण्यात आले नाहीत तसेच गोरेगांव चित्रनगरी परिसरामध्ये चित्रिकरणासाठी देशातील नामांकित फिल्म स्टुडिओंचा तुलनात्मक अभ्यास करून मोठी कलागारे (सेट) आवश्यक आहेत तसेच नवीन पोलीस ठाणे, वुडन विश्रामगृहे उद्याने, नवीन गांवे, इ.संच उभारणे आग प्रतिबंधक यंत्रणा, रात्रपाळी करणाऱ्या कामगारासाठी वाहन व्यवस्था, रुग्णवाहिका सेवा रुग्णालये, विद्युत दिवे इ.सुविधा पुरविणे आवश्यक आहे आणि नवीन समिती कक्ष (कॉन्फरन्स हॉल), सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षा गेट रस्त्यांचे रुंदीकरण करण्यासाठी त्यादृष्टीने महामंडळाने कार्यवाही करावी याव्यतिरिक्त पणन व्यवस्थापनासाठी जबाबदार व्यक्तींची निवड करण्यात यावी तसेच व्यवसायवृद्धीसाठी नवीन विकास कक्ष स्थापन करण्यात यावा.**

गोरेगांव चित्रनगरीमध्ये ३० एकर जमिनीवर अतिक्रमण झाले असून १७७० झोपड्या अनधिकृतरित्या उभारल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे समितीने ही बाब अतिशय गांभीर्याने घेतलेली आहे. त्यामुळे सदर अनधिकृत झोपड्या निष्कासित करून लवकरात लवकर संरक्षक भिंत बांधण्यात यावी जेणेकरून अतिक्रमण होणार नाही. महामंडळाने नवीन प्रकल्प विकास आराखडा तयार केलेला आहे त्यानुसार शासन स्तरावर लवकरात लवकर मान्यता मिळण्यासाठी पाठपुरावा करावा जेणेकरून होणारा विलंब टाळता येईल व प्रकल्पासाठी विलंबामुळे होणारा खर्च टाळता येऊ शकेल. सदरहू प्रकल्पाचा विकास आराखडा इकोफ्रेन्डली असावा तसेच शुटींग झाल्यावर सेटचे सामान तसेच टाकून देण्यात येते. त्यामुळे पर्यावरणाची हानी होत असून त्यासाठी महामंडळाने अधिकारी/कर्मचारी नेमून सदर शुटींग कालावधी समाप्त झाल्यानंतर सेटचे सामान उचलले जाते का नाही पाहणे गरजेचे आहे. तसेच ज्या सेटचे सामान उचलले जात नाही त्यांच्याकडून दंड वसूल करणे आवश्यक आहे. अशी समितीतर्फे शिफारस करण्यात येत आहे.

निधीच्या कमतरतेमुळे हा प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर राबविण्याचे ठरविण्यात आले व अपफ्रंट किंमत रु. १३.६४ कोटी ठरविताना **महामंडळाने माहे एप्रिल, २००२ ते मार्च, २००७ या कालावधीसाठीचे रु. ४.२१ कोटीच्या व्याजाची रक्कम बीओटी ऑपरेटकडून वसूल करणे आवश्यक होते. पी.पी.पी. करार अंमलात आणताना उन्नत (वाढीव) किंमत सार्वजनिक खाजगी भागीदारी मार्गदर्शक तत्वानुसार ठरविली असता तर रु. ४.२१ कोटीचे महसुलाचे नुकसान सहजरित्या टाळता येऊ शकले असते.** सबब, भविष्यात अशा घटना पुन्हा होऊ नयेत याकरिता महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी तांत्रिक सल्ला घेणे आवश्यक आहे. अशी समितीची आग्रहाची सूचना आहे.

" हम एक है " हा कार्यक्रम टी.व्ही.वर प्रसारित झाला नसताना देखील या कार्यक्रमाचे दायित्व महामंडळावर असणे संयुक्तिक वाटत नाही कारण जरी या कार्यक्रमात भाग घेतलेल्या कलाकारांच्या मानधनावर खर्च झाला असला व कार्यक्रमाचे थेट (लाईव्ह) प्रसारण होणार होते. तथापि त्यासाठी प्रायोजक न मिळाल्यामुळे याची जबाबदारी महामंडळावर आली त्यामुळे, कलाकारांना मानधन देण्यात आले आहे. महामंडळाच्या निधीचा उपयोग महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी वैयक्तीक स्वार्थासाठी केला व त्यामुळे महामंडळाचे व पर्यायाने शासनाचे नुकसान झाले यात अनियमितता झाली असून, हे काम करण्यामागे जो मुळ उद्देश होता तो साध्य झाला नाही असे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. व याप्रकरणी सुरू असलेली चौकशी लवकरात लवकर पुर्ण करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करावा तसेच भविष्यात अशा अप्रिय घटना घडणार नाहीत याची प्रकर्षाने काळजी घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

" महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित "

(सन २००९-२०१०)

दोन - निष्फळ खर्च.—(कंपनीने भट्टी बांधण्यावर रु. २७.९० लाखांचा निष्फळ खर्च केला).

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-१० च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१३ मध्ये **" निष्फळ खर्च "** यासंदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादितच्या (कंपनी) मालकीची गौराळा, जिल्हा यवतमाळ येथे एक चुनखडीची खाण आहे. ह्या भागात पारंपारिक पद्धतीने चुन्याच्या भट्ट्या लावून चुनखडी निर्माण करणाऱ्या बऱ्याच खाजगी संस्था आहेत. आपल्या सध्याच्या उत्पादनात विविधता आणण्याच्या दृष्टीकोनातून अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित मूल्यवर्धित उपउत्पादने विकसित करण्यासाठी कंपनीने चुन्याची भट्टी उभारण्याचे ठरविले (जून, १९९९) कंपनीने या प्रकल्पासाठी खडकी स्थित (पुणे) सेन्ट्रल इमारत ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्युट (सी.बी.आर.आय.) यांच्याशी सल्लामसलत केली व सी.बी.आर.आय. यांनी दिलेल्या प्रकल्प (डिसेंबर, २०००) अहवालाच्या आधारे कंपनीने चार वर्षानंतर एकूण रु.२७.९० लाख खर्चून चुन्याची भट्टी बांधली (मार्च, २००४).

कंपनीने चुन्याची भट्टी कंत्राटी पद्धतीवर योग्य त्या संस्थेस चालविण्यास देण्याचे ठरविले (एप्रिल २००४). असे ठरले असून देखील कंपनीने आपल्या खाण व्यवस्थापकाला या तंत्रज्ञानाचा वापर करण्यासंबंधी जून २००४ मध्ये प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली. भट्टी कंत्राटी पद्धतीवर चालविण्यास देण्याचा निर्णय घेतल्यापासून २१ महिन्यांच्या उशिराने कंपनीने पाच वर्षाकरिता चुन्याची भट्टी चालविण्यासाठी निविदा मागविल्या (डिसेंबर २००५-जानेवारी २००६), परंतु त्यास काहीच प्रतिसाद मिळाला नाही. कंपनीने पुन्हा एकदा निविदा बोलावून (ऑगस्ट २००८) एसडीएस फोर्ज ह्या उच्चतम बोलीचा देकार दिलेल्या कंत्राटदारास (फेब्रुवारी २००९) मध्ये चुन्याची भट्टी दरमहा रु. २५०० भाड्याने चालविण्याचा ठेका दिला.कंत्राटदाराने चुनाभट्टीच्या तीन महिन्याच्या भाड्यापोटी फक्त रु.७५०० दिले होते आणि नंतर यंत्रसामुग्री व कामगार खाणीपासून स्थांनातरित केले. पुन्हा कंपनीने एकदा कंत्राटी पद्धतीने चुन्याची भट्टी चालविण्याचे प्रयत्न केले ते यशस्वी झाले नाहीत.

या संदर्भात आम्हाला खालील बाबी आढळून आल्या :-

- जेव्हा सीबीआर आय या संस्थेस प्रकल्प बनविण्यास कंपनीने सांगितले तेव्हा सदरहू प्रकल्पात अत्याधुनिक तंत्राज्ञानापैकी कुठल्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करावयाचा होता याची निश्चित स्वरूप कल्पना देण्यात आली नाही. अशा प्रकारचा उल्लेख करणे अत्यावश्यक होते कारण प्रकल्प अहवाल अंमलबजावणीसाठी हवा होता. संशोधन व विकासाच्या अभ्यासाकरिता नव्हे.

- सीबीआर आयने तयार केलेल्या प्रकल्प अहवालात पाण्याच्या उपलब्धतेविषयी विचार करण्यात आला नव्हता. ही नियोजनातील एक मोठी चूक होती कारण भट्टी प्रकल्प कार्यान्वयाच्या वेळी पर्यावरणाच्या रक्षणाकरिता यंत्रसामूग्री वापरण्यासाठी पाण्याची अत्यंत आवश्यकता होती. प्रकल्पाच्या ठिकाणी पर्यायी विद्युत पुरवठा सुविधा व पुरेशा आकाराचे साठवण गोदाम पण बांधले नव्हते.

- कंपनीच्या स्वतःच्या कागदपत्रांनुसार त्या भागात जुन्या पद्धतीने चालविण्यात येणाऱ्या बऱ्याच भट्टया होत्या. कंपनीने अत्याधुनिक पद्धतीने बांधलेली भट्टी चालविण्यास आवश्यक तो अनुभव असणाऱ्या संस्था उपलब्ध नव्हत्या.

- कंपनीने मार्च, २००४ मध्ये म्हणजे प्रकल्प अहवाल मिळाल्यापासुन चार वर्षांनी चुन्याची भट्टी बांधली. बांधकाम झाल्यानंतर कंपनीने भट्टी योग्य त्या संस्थेस कंत्राट पद्धतीने चालविण्यास देण्याचे ठरविले (एप्रिल २००४). परंतु, त्यानंतर २२ महिन्यांच्या दिरंगाईने कंपनीने डिसेंबर, २००५ ते जानेवारी २००६ मध्ये निविदा बोलविल्या ज्यास प्रतिसाद मिळाला नाही. तरीसुद्धा दुसऱ्यांदा निविदा बोलवितांना कंपनीने उशीर केला व अडीच वर्षापेक्षा अधिक उशिराने ऑगस्ट २००८ मध्ये पुन्हा निविदा बोलविल्या.

प्रकल्पाचे नियोजन सदोष होते. कारण त्यामध्ये उपलब्ध मूलभूत पायाभूत सुविधा तसेच त्या विशिष्ट जागी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अनुरूपतेचा विचार करण्यात आला नव्हता. या सगळयाची परिणती अत्याधुनिक तंत्रज्ञानाने बांधण्यात आलेली चुन्याची भट्टी बांधकाम केल्यापासून केवळ तीन महिने वापरानंतर आजतागायत बंद पडून राहिली व त्यात केलेली रूपये २७.९० लाखांची गुंतवणूक निष्फळ ठरली.

व्यवस्थापकाने (जुलै,२०१०) चुन्याची भट्टी वापरत नसल्याचे मान्य केले व सांगितले की, ज्या ठेकेदाराचा भट्टी चालविण्याचा ठेका चांगली कामगिरी नसल्याने काढून घेण्यात आला होता, त्याने न्यायालयात ठेका काढण्याच्या कंपनीच्या कृतीस आव्हान दिले होते. (मे, २०१०) या न्यायालयीन प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर पुन्हा नव्याने निविदा बोलवण्याचे सांगितले. व्यवस्थापनाच्या उत्तरात सीबीआर आयला प्रकल्प अहवाल बनविण्यास सांगताना निश्चित आवश्यकता न सांगण्याची कारणे, प्रकल्पाचे नियोजन करताना केलेली धरसोड जसे की, भट्टी ठेक्याने चालविण्यास देण्याचा अचानक घेतलेला निर्णय, निविदा बोलविण्यात झालेला उशीर इत्यादी बाबींचा उल्लेख टाळण्यात आला होता. या प्रकल्पावर केलेला रु. २७.९० लाखाचा खर्च तसेच प्रकल्पाची यंत्रसामूग्री २००४ मध्ये बांधकाम केल्यापासून वापरली गेली नाही ही वस्तुस्थिती तशीच राहते.

सबब, शिफारस करण्यात येते की, कुठलाही प्रकल्प हाती घेताना कंपनीने मुलभूत पायाभूत सोयींची उपलब्धता, प्रकल्पस्थानाची स्थिती तसेच नवीन तंत्रज्ञानाची उपयुक्तता या गोष्टींची खातरजमा करावी.

ही बाब शासनाला कळविण्यात (मे, २०१०) आली होती, त्यांचे उत्तर प्रलंबित होते. (डिसेंबर, २०१०)

२.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने दि.२१.०८.२०१० च्या पत्रान्वये पुढील अभिप्राय व वस्तुस्थिती महालेखापरीक्षकांना सादर केली आहे :—

(१) सदर प्रकल्प सीबीआर आय यांच्या सल्ल्याने व प्रोसेस टेक्नोलॉजिस फॉर क्लिन लाईम ॲण्ड लाईम बेस्ड प्रॉडक्टस या प्रकल्प अहवालाधारे उभारण्यात आलेला होता.

(२) सीबीआर आयच्या प्रकल्प अहवालाची प्रत दि.११.०५.२००९ च्या पत्रान्वये लेखापरिक्षकांना उपलब्ध करून दिली होती. तसेच वीज/पाणी इत्यादी पायाभूत सुविधांच्या अनुषंगाने गौराळा चुनखडक खाणीची सुयोग्यता विचारात घेण्यात आली होती.

(३) चुन्याच्या भट्टीसाठी पाणी आवश्यक नव्हते तर केवळ पर्यावरण संरक्षणासाठी आवश्यक असलेले पाणी प्रकल्प स्थळापासून ५०० मीटर अंतरावर उपलब्ध होते. सदर पाणी आणण्यासाठी ट्रॅक्टर ट्रॉलीची व्यवस्था केलेली होती.

(४) जून १९९९ मध्ये झालेल्या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सिलिमेनाईट, कायनाईट इत्यादी खनिजासंदर्भात मुल्यवर्धन प्रकल्प विस्तारित करण्याचे ठरविण्यात आले.

(अ) त्यानुषंगाने महामंडळाने सीबीआर आय, रूरकी या संस्थेची प्रोसेस टेक्नोलॉजिस फॉर क्लिन लाईम ॲण्ड लाईम बेस्ड प्रॉडक्टस या विषयासाठी सल्लागार म्हणून नियुक्ती केली. सीबीआर आय यांनी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाचा प्रस्ताव स्विकृत केला व आपला प्रकल्प अहवाल नोव्हेबर २००० मध्ये महामंडळास सादर केला.

(आ) सन २०००-०१ च्या भांडवली अर्थसंकल्पात यासाठी निधीची तरतूद करण्यात आली.

(इ) फेब्रुवारी २००२ मध्ये सीबीआरआयने प्रकल्प उभारण्यासाठी अभिकरण निश्चित करण्यासाठी निविदा मागविण्याबाबत कळविले.

(ई) मार्च २००३ मध्ये महामंडळाने अभिकरण निश्चित करून सदर प्रकल्प उभारणीसाठी मे.स्पेस ॲण्ड एनव्हार्यन्मेंटल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, देहरादुन या संस्थेस दि. ३१ मार्च २००३ अन्वये कार्यादेश दिला.

(उ) सदर प्रकल्प दि. २३ मार्च २००४ रोजी पूर्ण झाला.

(ऊ) महामंडळाने दि. २८ जून २००४ च्या अधिसूचनेव्ये सदर प्रकल्प चालविण्यासाठी व पक्क्या मालाची विक्री करण्यासाठी एक्सप्रेशन आणि इंन्टरेस्ट मागविले होते.

यास प्रतिसाद म्हणून १) मे. जयदिप मिनरल्स, चंद्रपूर २) मे. ईशान मिनरल्स, जळगांव व ३) मे.जैन एन्टरप्राईजेस, राजूर यांनी सदर प्रकल्प चालविण्यास तयारी दर्शविली. परंतु नंतर सदर तीनही अर्जदारांनी प्रकल्प चालविण्यास इच्छुक नसल्याचे कळविले.

सन २००५ मध्ये पुन्हा सदर प्रकल्प चालविण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या. परंतू त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे दि. २२ ऑगस्ट २००८ रोजी पुन्हा निविदा मागविण्यात आल्या. यामध्ये सर्वोच्च देकार देणाऱ्या मे.एसडीएस फोर्ज यांनी निविदा स्विकृत करून दि. १० फेब्रुवारी २००९ रोजी तसे हेतूपत्र देण्यात आले व दि. २८. मार्च २००९ रोजी त्यांच्याबरोबर करार करण्यात आला. या करारानुसार त्यांना दरमहा ५००० मे. टन चुनखडक व ५०० मे. टन डोलोमाईटचे उत्पादन करण्याबाबत उद्दीष्टे देण्यात आले होते. तसेच क्विकलाईम बनविण्याचे काम देखील देण्यात आले होते. यासाठी दरमहा रु. २५०० इतक्या भाड्याने चुन्याची भट्टी देण्यात आली.

मे.एसडीएस फोर्ज करारनाम्यातील अटीनुसार चुनखडक, डोलोमाईट व क्विकलाईमचे उत्पादन करण्यास अपयशी ठरले. त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तथापि, त्यांच्या कार्यक्षमतेत सुधारणा न झाल्याने त्यांच्या बरोबर केलेला संयुक्त उपक्रम करार दि.०६.०५.२०१० रोजीच्या नोटीशीद्वारे रद्द करण्यात आला. त्याविरुद्ध त्यांनी मा. न्यायालयात दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल महामंडळाच्या बाजूने दि.०९.०९.२०१० रोजी लागला व महामंडळाने केलेली कृती मा.न्यायालयाने योग्य ठरविली.

सदर चुन्याची भट्टी सुस्थितीत असून क्विकलाईमच्या उत्पादनासाठी तयार आहे.

२.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, शासनाने दि.०६.१०.२०१० च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडून खालील मुद्यांबाबत स्पष्टीकरण मागविले होते. मुद्देनिहाय स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे—

(१) महामंडळाच्या माईन मॅनेजरला तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्याची कारणे-

(अ) क्विकलाईमच्या उत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष ज्ञान मिळविणे

(आ) या तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या इतर प्रकल्पांना भेटी देऊन शिफारशी करणे.

माईन मॅनेजरने अशा एकूण ७ प्रकल्पांना भेटी देऊन प्रकल्पाच्या ठिकाणी भांडार गृह व निवास बांधण्याची शिफारस केली व त्यानुसार या बाबी पुरविण्यात आल्या.

(२) निविदा मागविण्यासाठी झालेला २१ महिन्यांचा विलंब- दि.२८.०६.२००४ च्या अधिसूचनेस प्रतिसाद म्हणून ३ कंपन्यांनी सदर प्रकल्प चालविण्यास तयार दर्शविली. परंतु नंतर सदर तीनही अर्जदारांनी प्रकल्प चालविण्यास इच्छुक नसल्याचे कळविले. डिसेंबर, २००५ मध्ये पुन्हा सदर प्रकल्प चालविण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या परंतु त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे दि.२२.०८.२००८ रोजी तिसरा प्रयत्न करण्यात आला व यामध्ये सर्वोच्च देकार देणाऱ्या मे.एसडीएस फोर्ज यांना काम देण्यात आले.

(३) वीज व पाण्याची उपलब्धता- प्रकल्पात वापरासाठी आवश्यक असलेले पाणी प्रकल्प स्थळापासून ५०० मीटर अंतरावर उपलब्ध होते.सदर पाणी आणण्यासाठी ट्रॅक्टर ट्रॉलीची व्यवस्था केलेली होती.

(४) मे.एसडीएस फोर्ज यांना चुन्याची भट्टी चालविण्यास आलेल्या अपयशाची कारणे–

अपुऱ्या मनुष्यबळाच्या अभावी मे.एसडीएस फोर्ज हे त्यांना ठरवून दिलेल्या उद्दीष्टाएवढे उत्पादन करू शकले नाही.

(५) मे.एसडीएस फोर्ज यांचेकडून येणे रकमेच्या वसुलीसाठी केलेल्या उपाययोजना-

मे. एसडीएस फोर्ज यांनी अनामत म्हणून ठेवलेली रक्कम जप्त करण्यात आली आहे व त्यातुन ही रक्कम वसूल करण्यात येईल.

वरील बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळास सदर चुन्याचीभट्टी चालविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत तसेच असे प्रकार भविष्यात टाळण्याच्या सूचना देण्यास आलेल्या आहेत.

- महामंडळाने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

२.४ समितीला उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १० मे,२०१६ रोजी उद्योग विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादितचे महाव्यवस्थापक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद क्र. ३.१३ " निष्फळ खर्च " याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादितच्या मालकीची गौराला, जिल्हा यवतमाळ येथील चुनखडीच्या खाणीची सद्य:स्थिती काय आहे. खनिकर्म महामंडळाच्या यवतमाळ व्यतिरिक्त आणखी कोणत्या माईन्स आहेत असे समितीने विचारले असता, यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी

खुलासा केला की, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडे सध्या ९ माईन्स आहेत. त्यात लाईमस्टोन व आयर्नओर आहेत. या सर्व छोटया माईन्स आहेत. महामंडळाने चुनखडीची भट्टी चालविण्याबाबत १९९९ मध्ये निर्णय घेतला तेथे क्विकलाईमच्या उत्पादनाचा सीबीआरआय रुरकी यांचा सल्ला घेतला होता. लाईमस्टोनचा वापर कमी होतो म्हणजे सिमेंटप्रमाणे वापर होणार नाही. म्हणून येथे चुन्याची भट्टी करण्यात आली. त्यावेळी २७ लाख ९० हजार खर्चून भट्टी बांधण्यात आली होती. चुनाभट्टी चालविण्यासाठी डिसेंबर, २००५ मध्ये निविदा काढल्या होत्या त्यामध्ये मे.एसडीएस फोर्ज यांची निविदा स्विकृत केली त्यांच्या बरोबरच्या करारानुसार त्यांना दरमहा ५ हजार मे.टन चुनखडक व ५०० मे..टन डोलोमाईटचे उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले तसेच क्विकलाईन बनविण्याचे काम देण्यात आले. यासाठी त्यांना २५०० रुपये प्रति महिना भाड्याने देण्यात आले त्यांनी फक्त ३ महिने याची रक्कम भरली आहे. यानंतर मे.एसडीएस फोज यांनी करारनियमातील अटी नुसार चुनखडक डोलोमाईटचे क्विकलाईनचे उत्पादन करण्यास अपयशी ठरल्यामुळे त्यांना कारणेदाखवा नोटीस बजावून करार रद्द करण्यात आले. यामध्ये २५ लाख रुपये सिक्युरीटी डिपॉझीट होते, ते देखील जप्त केलेले आहे. आता २०१६ मध्ये परत १० हजार रुपये महिना प्रमाणे भाडयाने देण्याचा प्रस्ताव मंजूर केलेला आहे.

त्यानंतर समितीने विचारले की, यवतमाळ जिल्हा व आजुबाजुच्या जिल्हयामध्ये खाजगी लोकांकडे माईन्स किंवा अशा भट्टया आहेत काय, खाजगी भट्टया चालतात व आपल्या महामंडळाच्या भट्ट्या का चालत नाही. यवतमाळ जिल्हयात वणी तालुक्यात राजूर येथे व चंद्रपूर जिल्हयात चुनाभट्टी सुरुÝ आहे. यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, तेथे खाजगी चुनाभट्टया व माईन्स होत्या, आता तेथील चुनाभट्टया पूर्णतः बंद झालेल्या आहेत. यापूर्वी बऱ्याच चुनाभट्टया सुरू होत्या, आता फक्त पाच भट्टया सुरू आहेत. पर्यावरणाच्या दृष्टीने ही चुनखडी भट्टी सीबीआरआय रुरकी यांच्या सल्ल्याने बनविण्यात आली होती. त्यांनी पाण्याच्या उपलब्धतेविषयी विचार केला नाही. तेथे पाण्याचे स्त्रोत कमी आहेत परंतु या चुनाभट्टीला पर्यावरणाप्रमाणे पाणी आवश्यक आहे. २००३-२००४ मध्ये आम्ही निविदा काढल्या, त्यात तीन अर्जदारांनी सहभाग घेतला. नंतर त्यांनी या कामास नकार दिलेला आहे.

यावर समितीने विचारले की, २००० चा प्रोजेक्ट असून २००३-२००४ मध्ये निविदा काढल्या आहेत. चार वर्षाचा डिफरन्स होत आहे. चुनखडी तयार करण्यासाठी पाणी पाहिजे. निविदा काढताना अशा महत्वाच्या बाबी त्यात आपण दाखवत नाही. खाजगी लोक भट्टया चालवतात व आपली भट्टी का चालत नाही, आपल्याकडे यंत्रणा आहे, टेक्नीकल स्टाफ आहे तरीही का चालत नाही, तसेच आपण बाहेरुÝन का माल घेऊ शकत नाही. शासनाची व महामंडळाची मालकी असताना असे का होत आहे, त्यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, तेथे ट्रॅक्टर ट्रॉलीने पाणी आणण्यात येईल. ५०० मीटरवर पाण्याची व्यवस्था आहे, तेथून ट्रॅक्टर ट्रॉलीने पाणी आणून स्प्रे करण्यात येईल. त्यामुळे जास्त पाण्याची गरज पडणार नाही. या चुनाभट्टी जेथे माईन्स आहेत त्या परिसरात आहेत त्यामुळे जेव्हा माईन सुरू होईल तेव्हा चुनाभट्टी चालू करता येईल. माईन्स बंद करून

चुनाभट्टी चालवू शकत नाही. कारण त्या माईन्स लिजहोल्ड एरियामध्ये आहेत. ते लोक बाहेरून कच्चा माल खरेदी करतात, आमची चुनाभट्टी वेगळी आहे. याकरिता पर्यावरण खात्याचे क्लिअरन्स घ्यावे लागते. यावर समितीने विचारले की, तुम्हाला राज्य सरकारचा क्लिअरन्स पाहिजे की केंद्र सरकारचा क्लिअरन्स पाहिजे. तुम्ही याकरिता प्रयत्न केले आहेत का, पर्यावरणाचा क्लिअरन्स लोक का होऊ देत नाहीत,

याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, केंद्र सरकारकडून क्लिअरन्स पाहिजे, याकरिता आमचे प्रयत्न सुरू आहेत. २००५ मध्ये क्लिअरन्सकरिता पब्लिक हेअरींगसुद्धा झालेली आहे. पण त्यावेळी लोकांनी पब्लिक हेअरींग होऊ दिलेली नाही. खाजगी व्यक्तींना भट्टयाकरिता पब्लिक हेअरींगची गरज नाही. त्यांना फक्त महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा क्लिअरन्स लागतो. पण आमची माईन्स असल्यामुळे आम्हाला केंद्र सरकारकडून क्लिअरन्स लागतो. लिजहोल्ड एरिया ५ हेक्टरच्या आत आहे. काही लोकांचा २.५ हेक्टर आहे. काही लोक ५ हेक्टर लिजच्या बाहेर आहेत. ते सुद्धा पूर्णपणे खरेदी होऊ शकते. अशा प्रकारे ११९ हेक्टर असलेल्या लीज होल्ड एरियामध्ये आपण पूर्ण एरिया कव्हर केला तर तो ५०० हेक्टरच्या पुढे जातो. एवढा एरिया आपण खरेदी करुÝ शकत नाही. कारण आम्हाला फक्त ११९ हेक्टरची गरज आहे. यानंतर समितीने विचारले की, एक भट्टी तयार करण्यासाठी किती खर्च येतो, त्यातून आपणास किती उत्पन्न मिळते. आपण दिलेल्या माहितीप्रमाणे २५०० दरमहा भाडे त्यांच्याकडून घेतले जाते. तुम्हाला एक भट्टी उभारण्यासाठी सुमारे २५ लाख रुपये खर्च येतो. सध्या महामंडळ तोट्यामध्ये आहे. महामंडळाचे उत्पन्न वाढीसाठी व नफयामध्ये येण्यासाठी महामंडळ काय करते, चुनाभट्टीवर अवलंबून न राहता दुसरे काही करणे अपेक्षीत आहे. अजून काही मिनरल्स तुम्हाला शोधून काढावे लागतील.

यावर विभागीय सचिवांनी नमूद केले की, ज्या माईन्स आहेत, त्यातून हे महामंडळ नफ्यामध्ये येणे शक्य नाही. मकरढोकळा येथील ११३ मिलीयन टनची कोळसा खाण मिळाल्यास त्यातून ते नफ्यामध्ये येऊ शकतील. शासनाचा विचार आहे की, लघुउद्योजकांना कोळसा वाटप या महामंडळामार्फत करावे. असे केले तर त्यातून ५ टक्के उत्पन्न प्राप्त होईल. यांच्याकडे सध्या तांत्रिक मनुष्यबळ नाही. लहान खाणी आहेत. मानवसंचालित पद्धती (मॅन्युअली ऑपरेशन) आहे, यांत्रिक पद्धती (मॅकेनिकल ऑपरेशन) कोठेही नाही. आहे त्या परिस्थितीत त्यांना हे शक्य नाही. दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी केंद्र शासनाने माईन्स ॲण्ड मिनरल्स ॲक्टमध्ये काही सुधारणा केल्या आहेत. यानुसार सर्व खाणी लिलावाद्वारे देण्यात येणार असून त्यामधील काही उत्पन्न राज्य शासनाला प्राप्त होणार आहे. आता महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाला उत्पन्न मिळण्याऐवजी थेट राज्य शासनाला उत्पन्न मिळणार आहे. त्यामुळे एक असाही विचारप्रवाह आहे की, या महामंडळाच्या आस्थापनेवर खर्च करून काही उपयोग नाही.

यानंतर समितीने विचारले की, सन २००३ मध्ये आपण प्रकल्प तयार करून घेतला. परंतु, प्रत्यक्षात प्रकल्प ४ वर्षानंतर पूर्ण झाला. या विलंबामुळे प्रकल्प खर्चात किती वाढ झाली व त्यास कोण जबाबदार आहेत, तसेच महामंडळामध्ये एकूण किती अधिकारी, कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांचे वेतन व भत्ते आणि

अन्य आस्थापनाविषयक खर्च किती आहे व महामंडळाला वार्षिक उत्पन्न किती आहे, या उत्पन्नामधून महामंडळाचा प्रशासकीय खर्च होऊ शकतो का, महामंडळ जर अशा प्रकारे तोट्यात असेल तर ते बरखास्त करण्याबाबतचा प्रस्ताव आपण शासनाला का सादर करीत नाही, यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, सन २००३ मध्ये प्रकल्प अहवाल सीबीआरआयने सादर केला. त्यानंतर निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यानुसार मेसर्स स्पेस ॲण्ड एनव्हार्यन्मेंटल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, डेहराडून यांची निविदा अंतिम करण्यात आली व त्यांना सन २००४ मध्ये वर्क ऑर्डर देण्यात आली. त्यांनी सन २००५ मध्ये काम पूर्ण केले आहे. महामंडळाकडे एकूण ९ माईन्स असून एकूण ४४ अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. या ९ पैकी ४ माईन्स महामंडळाकडून चालविल्या जातात, २ माईन्स कंत्राटदारांमार्फत चालविल्या जातात. सध्या दीड ते दोन कोटी रुपयांची विक्री आहे. महामंडळाचे उत्पन्न दीड ते दोन कोटी रुपये असून आस्थापनेवर एकूण ४ कोटी रुपये खर्च होत आहेत.

एकंदरीत सर्व परिस्थिती बघितली तर सद्य:स्थितीत महामंडळाला ३ ते ४ कोटी रुपये तोटा आहे. यापूर्वी महामंडळाकडे कोळशाचे दोन ब्लॉक्स होते. ते ब्लॉक्स महामंडळाकडे राहिले असते तर महामंडळाची आर्थिक परिस्थिती चांगली राहिली असती. आता पुन्हा या महामंडळाला एक मोठा ब्लॉक मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे व त्यामुळे हे महामंडळ फायद्यात येऊ शकेल, अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे लघुउद्योजकांना कोळशाचा पुरवठा करण्याचे काम देखील या महामंडळाला देण्याचा विचार शासन पातळीवरुन सुरू आहे व त्यामुळे देखील या महामंडळाला चांगले उत्पन्न मिळू शकेल. तथापि, केवळ मायनिंगच्या उत्पन्नाचा विचार केला तर हे महामंडळ कधीही फायद्यात येऊ शकणार नाही. कारण, शासकीय यंत्रणेमार्फत मायनिंग करणे महाग पडते. लघुउद्योजकांना कोळशाचे वाटप करण्याचे काम या महामंडळाकडे देण्याचे जवळ जवळ निश्चित झाले आहे. सर्वसाधारणपणे या माध्यमातून २०० ते २५० कोटी रुपयांचा टर्नओव्हर होईल व त्याच्या ५ टक्के म्हणजे ८ ते १० कोटी रुपये वार्षिक उत्पन्न या महामंडळाला मिळू शकेल.

२.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.१३ " निष्फळ खर्च " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली साक्षीच्या वेळी असे दिसून आले की, **खनिकर्म महामंडळाच्या मालकीची गौराळा जि.यवतमाळ येथे १ चुनाभट्टी उभारण्यावर २७.०० लाख खर्च झाले. चुनाभट्टीचे बांधकाम केल्यापासून केवळ ३ महिने वापरानंतर आजतागायत बंद पडून आहे त्यामुळे २७.९० लाखाची गुंतवणूक निष्फळ ठरली. तसेच महामंडळाने चुन्याची भट्टी कंत्राटी पद्धतीवर चालविण्यास देण्याचे माहे एप्रिल, २००४ मध्ये ठरले असून देखील महामंडळाने खाण व्यवस्थापकाला तंत्रज्ञान वापर करण्यासंबंधी माहे जून, २००४ मध्ये प्रशिक्षण देण्याची आवश्यकता नव्हती. महामंडळाकडे ९ खाणी असून त्यापैकी ४ खाणी महामंडळाकडून चालविल्या जातात व २ खाणी कंत्राटदारांकडून चालविल्या जातात. महामंडळाचे एकूण उत्पन्न रुपये २ कोटी असून आस्थापनेवर रुपये ४ कोटी रुपये खर्च होत आहे. त्यामुळे महामंडळाने कुठलाही प्रकल्प हाती घेताना महामंडळाने**

मुलभूत पायाभूत सोईंची उपलब्धता प्रकल्प स्थापनेची स्थिती तसेच नवीन तंत्रज्ञानाची उपयुक्तता या गोष्टी खातर जमा करणे आवश्यक आहे. जेणेकरून महामंडळाचे आर्थिक नुकसान होणार नाही. एकंदरीत सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता महामंडळ तोट्यात असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर महामंडळ शासनाने चालू ठेवण्याबाबत विचार करावा. अन्यथा महामंडळाने चुनाभट्टीवर अवलंबून न राहता इतर मूलद्रव्ये शोधून काढणे अपेक्षीत आहे किंवा कोळसा खाण मिळाल्यास महामंडळाकडून लघुउद्योजकांना कोळसा वाटप केल्यास महामंडळ फायद्यात येऊ शकेल असे समितीचे मत आहे. सबब समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी. व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

“ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ ”

(सन- २००९-२०१०)

तीन - निष्फळ खर्च.—(कंपनीने लेखा व व्यवस्थापन माहिती प्रणाली सॉफ्टवेअर पुरविण्याकामी रु. २३.३२ लाखांचा निष्फळ खर्च केला).

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-१० च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१४ मध्ये **“ निष्फळ खर्च ”** यासंदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ (एमएसएचएफडीसी) ने जिल्हास्तरीय व्यवस्थापन कार्य महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार (एप्रिल, २००५) ठेका पद्धतीवर महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. (कंपनी) ला देण्यात आले होते. कंपनीने लेखा व व्यवस्थापन माहिती प्रणालीचे सॉफ्टवेअर विकसित करण्याचे ठरविले (सप्टेंबर, २००६), आमंत्रित केलेल्या (मार्च, २००७) निविदांच्या आधारे लेखा सॉफ्टवेअर आखणी, विकास, चाचणी व बसविण्याचे काम स्मार्टलिंक, मुंबई (संस्था “अ”) यांना रु. २६.४० लाखांला देण्यात आले (मे, २००७) यासंबंधीच्या करारावर १६ मे २००७ रोजी सह्या करण्यात आल्या.

करारातील अटींप्रमाणे संस्था “ अ ” ने करारावर सह्या झालेल्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत काम पूर्ण करावयाचे होते व काम पूर्ण करण्यात विलंब झाल्यास प्रति दिवस रु. २०० प्रमाणे दंड आकारावयाचा होता. प्रदानाच्या अटींनुसार संस्था “ अ ” ला ठेक्याच्या एकूण रकमेच्या ६०% म्हणजे रु. १५.८४ लाख अग्रिमापोटी दिनांक १६ मे २००७ रोजी देण्यात आले. मार्च, २०१० पर्यंत संस्थेने दिलेले काम पूर्ण केले नव्हते.

तसेच एमएसएचएफडीसीच्या जिल्हा कार्यालयामधील माहिती काढण्यासाठी वेब-प्रणालीवर आधारित इन्ट्रानेट ॲप्लीकेशन तसेच व्यवस्थापन माहिती प्रणाली विकसित करण्याचे ठरविण्यात आले. ह्या कामाचा ठेका पुणे स्थित मेकाट्रॉनिक्स सिस्टम प्रायव्हेट मर्यादित संस्था “ ब ” ला रु. २४.९२ लाखास देण्यात आले (मे, २००७) व १६ जून २००७ ला करारावर सह्या करण्यात आल्या. करारातील अटींप्रमाणे संस्था “ ब ” ला जून, २००७ मध्ये एकूण रकमेपैकी ३०% रु. ७.४८ लाखाची उचल देण्यात आली. सदरहू काम चार महिन्यांत पूर्ण करावयाचे होते व काम पूर्ण करण्यात उशीर झाल्यास प्रति दिवशी रु. ५०० प्रमाणे दंड वसूल करावयाचा होता. वरील दोन्ही प्रकरणात आम्हाला खालील अनियमितता आढळून आल्या (मार्च, २००९).

- लेखा व व्यवस्थापन माहिती प्रणाली विकसित करण्याच्या कामाच्या निविदा दोन लिफाफा पद्धतीनुसार बोलवयाच्या होत्या. परंतु, कंपनीने निविदा आमंत्रित करताना मूल्यांकन निविदा करण्यासाठी तांत्रिक देकार बोलविले नाही. केवळ आर्थिक देकारांचाच विचार करण्यात आला जे निविदा प्रक्रियेच्या सर्वमान्य तत्त्वांच्या विरुद्ध होते.

- कंपनीस संस्था “ अ ” ने पूर्वी दिलेले (मार्च,२००६) सॉफ्टवेअरचे काम पूर्ण न केल्याचे तसेच या संस्थेकडून त्या कामासाठी दिलेल्या रु. ७.५५ लाख आगाऊ रकमेची वसुली करणे बाकी असल्याची जाणीव होती असे असूनसुद्धा संस्था “ अ ” ला मे, २००७ मध्ये पुन्हा एकदा काम दिले. ही बाब मे, २००७ मध्ये सदरहू संस्थेस काम देताना संचालक मंडळाच्या नजरेस आणण्यात आली नाही.

- कंपनीने संस्था “ अ ” ला बँक गॅरंटी किंवा सुरक्षा अनामत घेतल्याशिवाय आगाऊ रक्कम दिली (१६ मे २००७). करारातील अटींनुसार कंपनीने संस्था “ अ ” ला दंड आकारला (रु. २०० प्रति दिवस) नाही व आगाऊ रक्कम वसुलीसाठी उपायात्मक कारवाई केली नाही.

- संस्था “ ब ” ने सुद्धा माहिती सॉफ्टवेअरवर आधारित इन्ट्रानेट ॲप्लीकेशन व व्यवस्थापन माहिती प्रणालीचे काम पूर्ण केले नव्हते. कंत्राटदाराला जून, २००७ मध्ये रु. ७.४८ लाख (३०%) रक्कम देण्यात आली होती. जून, २०१० पर्यंत एकूण कामांपैकी सुमारे ७०% काम पूर्ण करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. लेखा सॉफ्टवेअरच्या अभावी इन्ट्रानेट आणि व्यवस्थापन माहिती प्रणाली सॉफ्टवेअरचा वापर करता येऊ शकला नाही.

अशाप्रकारे, संस्था “ अ ” द्वारा कराराप्रमाणे काम पूर्ण न करणे तसेच योग्य त्या सुरक्षा उपायांचा करारात कंपनीने समावेश न केल्याने रु. १५.८४ लाखांचा निष्फळ खर्च ठरला.

त्याचप्रमाणे संस्था “ अ ” कडून कालबद्ध पद्धतीने माहिती उपलब्धतेविषयी पुरेसे नियोजन न करता घाईघाईने संस्था “ ब ” ला काम देण्याच्या निर्णयामुळे रु. ७.४८ लाखांचा निष्फळ खर्च ठरला.

व्यवस्थापनाने म्हटले (ऑगस्ट, २०१०) होते की, लवाद नेमण्याकरीता यथावकाश कारवाई केली जाईल कारण करारातील तरतुदींनुसार लवादाने निर्णय दिल्याशिवाय कायदेशीर कारवाई करता येत नाही. व्यवस्थापनाने असे पण सांगितले की संस्था “ ब ” कडून त्यांनी दिलेली आगाऊ रक्कम परत मागवण्यात आलेली नाही कारण उर्वरित काम पूर्ण करण्यास संस्था “ ब ” ने तयारी दाखविली होती. परंतु संस्था “ अ ” ने त्यांना देण्यात आलेले काम पूर्ण न केल्याने संस्था “ ब ” च्या कामावर त्याचा परिणाम झाला आहे.

परंतु कंपनीने दिलेले उत्तर पटण्याजोगे नव्हते कारण कंपनीने लवाद नेमण्याकरीता आतापावेतो कुठलीही कारवाई केली (डिसेंबर,२०१०) नाही व करार करतेवेळी योग्य त्या सुरक्षा उपायांची करारात तरतूद केली नाही. दोन्ही संस्थांना कुठल्याही प्रकारची सहायक सुरक्षा / अनामत न घेता आगाऊ रकमा देण्यात आल्या त्यांची अद्याप वसुली झाली नाही. शिवाय करारातील तरतुदींनुसार काम पूर्ण करण्यात विलंब केल्याबद्दल दंड पण आकारण्यात आला नाही. असे पण आढळून आले की सॉफ्टवेअर शिवाय एमएसएचएफडीसी आपली लेख्यांची कामे हाताने अंतर्गत लेखापरिक्षकांकडून करून घेत होती. अंतर्गत लेखापरिक्षकाने केलेले काम त्याच संस्था “ अ ” स प्रदान केले होते. हे अतिशय गैर होते व कंपनी मध्ये एमएसएचएफडीसी यामधील ठेकेदारांच्या कामगिरीविषयी माहितीचे आदानप्रदान करण्यात समन्वयाचा अभाव दर्शवित होता.

म्हणून शिफारस करण्यात येते की,

● कंपनीच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी करारातील अटी योग्य ती सावधगिरी बाळगून आर्थिक शहाणपणा लक्षात ठेवून निश्चित करण्यात याव्यात.

● योग्य ते सहाय्यक तारण घेतल्याशिवाय ठेकेदाराला आगाऊ रक्कम देण्यात येवू नये.

● शासनाने सुद्धा एमएसएचएफडीसीची अत्यंत महत्त्वपूर्ण कामे ठेका तत्त्वावर कंपनीस सोपवितांना त्यात अंतर्भूत असलेल्या नियंत्रण धोक्यांची सुद्धा तपासणी करावयास हवी.

ही बाब शासनाला कळविण्यात (जून, २०१०) आली होती, त्यांचे उत्तर प्रलंबित होते (डिसेंबर, २०१०).

३.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी सन २००९-१० च्या वाणिज्यिक अहवालात परिच्छेद क्र. ३.१४ मध्ये नोंदविलेले अभिप्राय हे महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत व मार्फत संगणक प्रणाली विकसित करणेबाबत आहेत. सन २००४ ते २००८ या कालावधीत महामंडळाने संगणकीकरणाविषयी ज्या योजना हाती घेतल्या त्याबाबत एकत्रित असे अभिप्राय नोंदविले आहेत. त्यात खालील बाबींचा समावेश आहे :–

अ. क्र. (१)	कामाचे स्वरुप (२)	संस्था व कामाच्या आदेशाचा दिनांक (३)	किती रकमेस काम दिले (४)
			(रु. लाखांत)
१.	महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या लेखाविषयक संगणक प्रणालीचे डिझाईन, डेव्हलपमेंट, टेस्टिंग व इन्स्टॉलेशन करणे.	मे. स्मार्ट लिंक, मुंबई दि. १४.०१.२००५	२५.००
२.	महामंडळाच्या मुख्यालय व ३५ जिल्हा कार्यालयातील प्रकल्प संबंधित व तद्अनुषंगिक कामासाठी विशेष संगणक प्रणाली विकसित करणे.	मे. स्मार्ट लिंक, मुंबई दि. १६.०३.२००६	१५.७४
३.	अपंग महामंडळाच्या लेखाविषयक संगणक प्रणालीचे डिझाईन, डेव्हलपमेंट, टेस्टिंग व इन्स्टॉलेशन.	मे. स्मार्ट लिंक, मुंबई दि. १५.०५.२००७	२६.४०
४.	इंटरनेटमार्फत जिल्हा कार्यालय व मुख्यालय यांचा डाटा ट्रॅन्झॅक्शन व एम आय एस इंन्ट्रानेट प्रणाली विकसित करणे.	मेकॅटीनिक्स सिस्टिम प्रा. लि., पुणे दि. १५.०५.२००७	रु. २४.९२

शासन निर्णय दि. ११ एप्रिल २००५ अन्वये महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाच्या योजनांची अंमलबजावणी करण्याचे जिल्हास्तरीय काम महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडे सोपविण्यात आले. अपंग महामंडळाच्या योजनांच्या प्रकल्पांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित या महामंडळाच्या जिल्हा कार्यालय व मुख्यालय येथे अपंग महामंडळाच्या कामकाजासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली तयार करणे व कार्यान्वित करणे याबाबत जाहीर निविदा शासकीय नियमानुसार देण्याकरीता माहिती व जनसंपर्क संचालनालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांना कळविण्यात आले. दि. ७ मार्च २००७ च्या दैनिक " किल्ले रायगड " या वृत्तपत्रात माहिती व जनसंपर्क संचालनालयाने निविदा विषयीची जाहिरात प्रसिद्ध केली. तांत्रिक देकार व आर्थिक देकार स्वतंत्र लिफाफ्यामध्ये सादर करण्याचे जाहिरातीत नमूद केले होते. सदर जाहिरातीस अनुलक्षून एकूण ४ निविदा धारकांनी निविदा दाखल केल्या. परंतु कोणत्याही निविदा धारकांनी निविदेसोबत तांत्रिक देकाराचे लिफाफे सादर केले नाहीत. तथापि, कामाची निकड लक्षात घेवून दि. २६ मार्च २००७ रोजी निविदा समिती समोर आर्थिक देकाराच्या लिफाफ्यामधील निविदा उघडण्यात आल्या व त्यानुसार निर्णय घेतल्याचे दिसते.

प्राप्त निविदांमध्ये मे. स्मार्ट लिंक यांची निविदा रु. २६.४० लाख इतक्या किमतीची होती. प्राप्त निविदामध्ये ती न्यूनतम निविदा होती. दि. १४ मे २००७ च्या टिप्पणीन्वये न्यूनतम निविदाधारक (मे. स्मार्ट लिंक) यांच्या निवडीस व अनुषंगिक कार्यादेश निर्गमित करण्यास व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता दिली. सदर प्रस्तावास आगामी संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्याचे ठरले. त्यानुसार दि. १५ मे २००७ च्या पत्रान्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आला. दि. १० ऑगस्ट २००७ रोजी झालेल्या ३६ व्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सदर प्रस्ताव मान्यतेस्तव ठेवण्यात आला. त्यास संचालक मंडळाची मान्यता प्राप्त करण्यात आली. पुरवठा आदेशातील अट क्र. १२ नुसार करारनाम्यावर स्वाक्षरी झाल्यानंतर पुरवठादारास ६०% रक्कम अदा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार मे. स्मार्ट लिंक यांना दि. १६ मे २००७ रोजी रु. १५.८४ लाख (६०%) अदा करण्यात आले.

तथापि, मे. स्मार्ट लिंक यांनी त्यांचेकडे सोपविण्यात आलेले अपंग महामंडळाचे जिल्हास्तरीय कार्यालयाच्या संगणकीकरणाचे काम विहित कालावधीत पूर्ण केले नाही. सदर काम तातडीने पूर्ण करण्यासाठी मे. स्मार्ट लिंक यांचेकडे महामंडळातर्फे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. सद्यःस्थितीत मे. स्मार्ट लिंक या कंपनीने विषयांकित संगणकीकरणाचे काम पूर्ण केले आहे. त्याच्या पुष्ठ्यर्थ मे. स्मार्ट लिंक यांनी अपंग महामंडळाचे सन २००६-०७ चे लेखे संगणकीकृत करून त्यांचा अहवाल दि. १४ फेब्रुवारी २०१२ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास सादर केला आहे. कंपनी अधिनियम, १९५६, नियम ६१९(३)(अ) नुसार अपंग महामंडळाचा संविधानिक लेखापरिक्षक यांनी महालेखापाल यांना जो अहवाल सादर केला आहे त्यातील बाब क्र.१३ च्या अभिप्रायात अकाउंन्टींग कामकाज संगणीकृत केले असल्याचे

अभिप्राय नोंदविले आहेत. अपंग महामंडळाच्या सन २००६-०७ या वर्षाचा लेखापरिक्षित ताळेबंद व जमाखर्चाचा अहवाल शासनास सादर केला आहे. तसेच त्यांनी माहितीसाठी अपंग महामंडळाच्या संगणक प्रणालीच्या कामकाजाबाबत ३५ जिल्हा कार्यालयाच्या लेख्याबाबतची सी.डी. सादर केली आहे. सदर सी.डी. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांनी चालवून पाहिली असून सन २००५-०६ व २००६-०७ या कालावधीची सर्व जिल्ह्यांची माहिती अद्ययावत असल्याचे त्यांना आढळून आले आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या प्रकल्प विषयक कामकाजाची संगणक आज्ञावली कार्यान्वित करणेबाबतचे काम दि. १६ मार्च २००६ च्या कार्यादेश व दि. १८ मार्च २००६ च्या करारनाम्याने रु. १५.७४ लक्ष इतक्या रकमेस मे. स्मार्टलिंक लि. यांना देण्यात आले होते. सदर काम ३ महिने म्हणजेच दि. १८ जून २००६ पर्यंत पूर्ण करण्याबाबत करार करण्यात आला होता.

करारनाम्यानुसार खालीलप्रमाणे रकमा प्रदान करणे अपेक्षित होते :–

दि. १८. मार्च २००६ रोजी झालेल्या करारनाम्यावर संबंधित संस्थेच्या स्वाक्षरी झाल्यानंतर नमूद केल्यानुसार ५०% अग्रीम.	रु.७.८७ लक्ष
संगणक प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर ४०% रक्कम	रु. ६.३० लक्ष
संपूर्ण काम यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर ३ महिन्यांनंतर १०% रक्कम	रु. १.५७ लक्ष
एकूण अदा केलेली रक्कम	**रु. १५.७४ लक्ष**

मे. स्मार्टलिंक, मुंबई यांना दिलेले अंदाजित ५०% काम पूर्ण झाले असे प्रमाणित करून तत्कालीन व्यवस्थापनाने दि. २४ मार्च २००६ रोजी ५०% रक्कम रु.७.८७ लक्ष मधून सुरक्षा ठेव रु. ३२,२२० वजा करून शिल्लक रक्कम रु. ७.५५ लक्ष मे. स्मार्टलिंक कंपनीस अदा केले. उर्वरित ५०% काम निविदा धारकांनी विहीत मुदतीत पूर्ण केले नाही. याबाबत मे. स्मार्टलिंक कडे पाठपुरावा करण्यात आला. तथापि, त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. दरम्यान, पुरवठादारास (मे. स्मार्टलिंक) करारातील अट क्र. ६ नुसार कायदेशीर नोटीस देण्यात आली आहे. करारातील अट क्र. ६ (फ) नुसार पुरवठादार व महामंडळ यांतील मतभेदाचे मुद्दे लवादामार्फत निकालात काढणे आवश्यक आहे. परिणामी, या प्रकरणी लवाद नेमण्याची कार्यवाही करण्याबाबत महामंडळातर्फे ॲड. बांदीवडेकर यांना सूचना देण्यात आल्या असून ते याबाबत पुढील कार्यवाही करीत आहेत.

मे. स्मार्टलिंक, मुंबई यांना महामंडळाने सन २००६ मध्ये दिलेले योजनांचे / प्रकल्पांचे ५०% काम पूर्ण केल्याची धारणा तत्कालीन व्यवस्थापनाने पक्की केली होती. त्यामुळे अपंग महामंडळाकरीता लेखा व व्यवस्थापन संगणक प्रणालीचे कामाचे आदेश देताना योजनांच्या / प्रकल्पाच्या कामाची बाब संचालक मंडळाच्या नजरेस आणून देण्याची आवश्यकता भासली नाही.

अ. सदरहू मुद्दा हा महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा स्तरावरील कार्यालयात स्वतंत्र संगणक प्रणाली तयार करण्याबाबत मे. स्मार्टलिंक या संस्थेस दिलेल्या कामाशी संबंधित आहे. निविदेतील अट क्र. १० नुसार पुरवठादाराने महामंडळाकडे सुरक्षा अनामत रक्कम ठेवणे बंधनकारक आहे. तथापि, मे. स्मार्टलिंक यांनी महामंडळाकडे कोणतीही सुरक्षा रक्कम जमा केलेली नाही. मे. स्मार्टलिंक यांनी सुरक्षा अनामत रक्कम का जमा केली नाही किंवा त्यांना सुरक्षा रक्कम जमा करण्यातून सूट देण्यात आली होती किंवा कसे याबाबत उपलब्ध कागदपत्रामध्ये कोणतीही कारणमिमांसा आढळून येत नाही.

ब. सद्य:स्थितीत मे. स्मार्ट लिंक या कंपनीने विषयांकित संगणकीकरणाचे काम पूर्ण केले आहे. तसेच मे. स्मार्ट लिंक यांनी अपंग महामंडळाचे सन २००६-०७ चे लेखे संगणकीकृत करून त्यांचा अहवाल दि. १४ फेब्रुवारी २०१२ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास सादर केला आहे. कंपनी अधिनियम, १९५६, नियम ६१९ (३) (अ) नुसार अपंग महामंडळाचा संविधानिक लेखापरिक्षक यांनी महालेखापाल यांना जो अहवाल सादर केला आहे त्यातील बाब क्र. १३ च्या अभिप्रायात अकाऊंटींग कामकाज संगणकीकृत केले असल्याचे अभिप्राय नोंदविले आहेत. अपंग महामंडळाच्या सन २००६-०७ या वर्षाचा लेखापरिक्षित ताळेबंद व जमा खर्चाचा अहवाल शासनास सादर केला आहे. तसेच त्यांनी माहितीसाठी अपंग महामंडळाच्या संगणक प्रणालीच्या कामकाजाबाबत ३५ जिल्हा कार्यालयाच्या लेख्यांबाबतची सी.डी. सादर केली आहे. सदर सी.डी. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांनी चालवून पाहिली असून सन २००५-०६ व २००६-०७ या कालावधीची सर्व जिल्ह्याची माहिती अद्यावत असल्याचे त्यांना आढळून आले आहे. मे. स्मार्टलिंक वर कायदेशीर कारवाई करण्याचा तत्कालीन व्यवस्थापनाने (२०१०) निर्णय घेतल्याचे दिसून येते. त्यानुसार महामंडळाचे कायदेशीर सल्लागार श्री. बांदीवडेकर यांच्याशी संपर्क साधून लवाद (आरबिट्रेटर) नेमण्याविषयीची कारवाई प्रस्तावित केली आहे. सदर प्रकरणात कायदेशीर कार्यवाहीची प्रक्रिया चालू केल्याने प्रतिदिन रु. २०० दंड आकारण्याबाबतचा निर्णय तत्कालीन व्यवस्थापनाने घेतला नसल्याचे दिसून येते.

क. निविदेतील अटींनुसार अपंग महामंडळाचे लेखा व व्यवस्थापन संगणक प्रणालीचे काम दि. १५ ऑगस्ट २००७ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात हे काम दि. ३० नोव्हेंबर २००७ रोजी पूर्ण झाले आहे. त्यात एकूण ४५ दिवसांचा विलंब झाला आहे. या कालावधीत मे. स्मार्टलिंक यांना प्रतिदिन रु. २०० इतका दंड आकारणे आवश्यक होते. तथापि, या कालावधीत मे. स्मार्टलिंक यांना प्रतिदिन रु. २०० दंड आकारल्याचे आढळून येत नाही. निविदाधारकास अशाप्रकारे का दंड आकारण्यात आला नाही याबाबतची कारणे उपलब्ध कागदपत्रांत आढळून येत नाहीत.

इंट्रानेट ॲप्लीकेशन व व्यवस्थापन माहिती प्रणालीचे काम हे लेखाविषयक संगणक प्रणालीवर अवलंबून आहे. जून, २०१० पर्यंत इंट्रानेट ॲप्लीकेशन व व्यवस्थापन माहिती प्रणालीचे सुमारे ७०% काम पूर्ण करण्यात

आले होते. तथापि, यांस लेखाविषयक संगणक प्रणालीचे सहाय्य मे. स्मार्टलिंक यांचेकडून न मिळाल्यामुळे मे. मेकॅट्रॉनिक्स, पुणे यांनी सुमारे ७०% काम पूर्ण केल्यानंतरसुद्धा इंट्रानेट आणि व्यवस्थापन प्रणालीचा वापर करता येवू शकला नाही ही वस्तुस्थिती आहे. दि. १४ जानेवारी २००५ रोजी मे. स्मार्टलिंक, मुंबई यांना लेखा विषयक संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम देण्यात आले होते. ते त्यांनी सन २०१० पर्यंत पूर्ण केले होते. परंतु, मे. स्मार्टलिंक, मुंबई यांनी लेखाविषयक संगणक प्रणालीला सोर्सकोड टाकला होता. या सोर्सकोडमुळे त्या प्रणालीत गरजेनुसार बदल करणे किंवा एक्सेल मधून माहिती घेणे इतरांना शक्य होत नाही. परिणामी, ७०% काम पूर्ण होऊनसुद्धा मे मेकॅट्रॉनिक्स, पुणे यांना आवश्यक कार्यवाही करता आली नाही.

महालेखापाल यांच्या परिच्छेदात रु. १५.८४ लाखांचा निष्फळ खर्च झाल्याचा जो आक्षेप घेण्यात आला आहे, तो मे. स्मार्टलिंक, मुंबई यांना अपंग महामंडळाच्या लेखाविषयक संगणक प्रणालीच्या कामासाठी देण्यात आलेल्या कामाशी संबंधित आहे. त्या कामाचा आणि मे. मेकॅक्ट्रॉनिक्स, पुणे यांना देण्यात आलेल्या कामाचा संबंध नाही.

संस्था " अ " ला (मे. स्मार्टलिंक, मुंबई) दि. १४ जानेवारी २००५ रोजी देण्यात आलेले लेखाविषयक संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम नियोजित वेळेप्रमाणे पूर्ण केले. संस्था " ब " (मे. मेकॅक्ट्रॉनिक्स, पुणे) यांनी जून, २०१० पर्यंत ७०% काम पूर्ण केले. याबद्दल मे. मेकॅक्ट्रॉनिक्स, पुणे यांना रु. ७.४८ लक्ष इतके अग्रीम देण्यात आले. दरम्यान, मे. मेकॅक्ट्रॉनिक्स, पुणे या संस्थेने सुमारे रु. १२.४६ लक्ष इतक्या रकमेची यंत्र सामग्री वापरात आणली. परंतु संस्था " अ " (मे. स्मार्टलिंक, मुंबई) यांनी लेखाविषयक संगणक प्रणालीला सोर्सकोड टाकून अडवणुकीचे धोरण स्विकारल्यामुळे संस्था " ब " (मे. मेकॅक्ट्रॉनिक्स, पुणे) यांनी उभारलेली इंट्रानेट व व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित होवू शकली नाही.

संस्था " अ " (मे. स्मार्टलिंक, मुंबई) यांना महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत जिल्हा स्तरावरील कार्यालयाचे संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम तसेच महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाअंतर्गत प्रकल्प आज्ञावली व संगणक प्रणाली विकसित करणे याबाबतची दोन कामे स्वतंत्रपणे देण्यात आली होती. तथापि, मे. स्मार्टलिंक यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेली उपरोक्त कामे अर्धवटपणे केली व अडवणुकीचे धोरण स्विकारले. परिणामी, त्यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याच्या अनुषंगाने लवाद नेमणुकीबाबतची पुढील कार्यवाही करणेबाबत महामंडळाच्या वतीने ॲड. बांदीवडेकर यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. ॲड. बांदीवडेकर याबाबत पुढील अनुषंगिक कार्यवाही करीत आहेत. संस्था " ब " (मेकॅट्रॉनिक्स, पुणे) या संस्थेस इंट्रानेटची व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्याबाबतचे काम देण्यात आले. त्यांनी ७०% काम पूर्ण केले. सदर कामासाठी सुमारे रु. १२.४६ लक्ष इतक्या किंमतीची यंत्र सामग्री वापरात आणली आहे. याबद्दल त्यांना रु. ७.४८ लक्ष इतके अग्रीम प्रदान करण्यात आले आहे. केवळ लेखा प्रणालीचे संगणकीकृत माहिती मे. स्मार्टलिंक यांचेकडून न पुरविल्यामुळे इंट्रानेट प्रणाली कार्यान्वित होवू शकली नाही. त्यामुळे संस्था " ब " (मे. मेकॅक्ट्रॉनिक्स, पुणे) यांच्याकडून रु. ७.४८ लक्ष इतकी रक्कम वसूल करता येणे शक्य नाही.

संस्था " अ " ला (मे. स्मार्टलिंक, मुंबई) यांचेबरोबर दि. १६ मे २००७ रोजी करण्यात आलेल्या करार निविदेत बॅक गॅरंटी किंवा सुरक्षा रक्कम तरतूद केलेली नाही. याबाबत कागदपत्रात कुठेही कारणमिमांसा आढळून येत नाही. तर दि.१५ मे २००७ रोजी मे. मेकॅट्रॉनिक्स, पुणे बरोबर जो करार करण्यात आला आहे, त्यात सुरक्षा रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

संस्था " अ " यांनी लेखाविषयक संगणक प्रणालीचे काम पूर्ण केले आहे. त्यापर्यंतच्या कालावधीत प्रतिदिन दंड का आकारण्यात आली नाही याबद्दल उपलब्ध कागदपत्रात कारणे आढळून येत नाहीत.

महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाच्या लेख्यांची कामे मे. बी. के. जैन यांना देण्यात आले होते. मे. बी. के. जैन यांनी अंतर्गत लेख्यांचे काम परस्पर मे. स्मार्टलिंक, मुंबई यांच्या माध्यमातून पूर्ण केले आहे. सदरहू काम मे. स्मार्टलिंक, मुंबई यांना महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाने थेट दिलेले नाही.

१. कंपनीच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी करारातील अटी योग्य ती सावधगिरी बाळगून आर्थिक शहाणपणा लक्षात ठेवून निश्चित करण्यात येतील.

२. ठेकेदाराला आगाऊ रक्कम देण्यात येणार नाही.

३. एमएसएचएफडीसीची अत्यंत महत्त्वपूर्ण कामे ठेका तत्त्वावर कंपनीस सोपविताना त्यात अंतर्भूत असलेल्या नियंत्रण धोक्यांची सुद्धा तपासणी करण्यात येईल.

३.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे. महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयातील माहिती काढण्यासाठी वेब प्रणालीवर आधारीत इन्ट्रानेट ॲप्लीकेशन तसेच व्यवस्थापन माहिती प्रणाली विकसित करण्याच्या प्रकरणी महालेखापालांचे शेरे स्थितीदर्शक आहेत. त्यामुळे त्यावर अभिप्राय नाहीत.

निविदा मागविताना आर्थिक लिफाफ्यांसह तांत्रिक लिफाफे सादर करण्याचा उल्लेख जाहिरातीमध्ये होता. मात्र सर्वच निविदाकारांनी केवळ वित्तिय लिफाफे सादर केले. या परिस्थितीत निविदा स्वीकृतीपूर्वी नव्याने निविदा मागविणे किंवा मूल्यांकनाच्या (Specification) निश्चितीसाठी वाटाघाटीचा पर्याय स्वीकारणे यापैकी एक पर्याय प्राधिकाऱ्याने अंगीकारणे आवश्यक होते, तशी पद्धत अनुसरलेली दिसत नाही. मात्र आता कंपनीने काम पूर्ण केले आहे, ही बाब विचारात घेऊन निविदा प्रक्रियेतील सर्व अटींचे यापुढे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, अशा सूचना महामंडळास देण्यात आल्या आहेत.

मे. स्मार्ट लिंक, मुंबई यांना महामंडळाने सन २००६ मध्ये दिलेले योजनांचे / प्रकल्पांचे ५०% काम पूर्ण केल्याची धारणा तत्कालीन व्यवस्थापनाने पक्की केली होती. त्यामुळे अपंग महामंडळाकरीता लेखा व व्यवस्थापन संगणक प्रणालीचे कामाचे आदेश देताना योजनांच्या / प्रकल्पांच्या कामाची बाब संचालक मंडळाच्या नजरेस आणून देण्याची आवश्यकता भासली नाही. असे महामंडळाने नमूद केले आहे.

दरम्यान, व्यवस्थापकीय संचालक यांनी मे. स्मार्टलिंक, मुंबई यांच्याशी दि. १६ मे २०१२ रोजी बैठक आयोजित केली व सदर बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आल्याचे व्यवस्थापकीय संचालक यांनी त्यांच्या दि. ७ फेब्रुवारी २०१३ च्या पत्रान्वये शासनास कळविले आहे.

१. प्रोजेक्ट संगणक आज्ञावलीचे ८५% काम पूर्ण झाल्याने मे. स्मार्टलिंक यांना उर्वरित देय रु. ७.८७ लक्ष मधून रु. ३.०० लक्ष वजा करून रु. ४.८७ लक्ष इतकी रक्कम अंतिम देयक देण्याचे मान्य करण्यात आले.

२. अपंग महामंडळाच्या जिल्ह्यांतर्गत कामकाजासाठी संगणक प्रणाली तयार करण्याचे काम पूर्ण करण्यात आले. मात्र अपंग महामंडळाच्या मुख्यालयातील संगणीकरणाचे काम करण्यास मे. स्मार्टलिंक, मुंबई यांनी असमर्थता दर्शविली. त्यामुळे त्यांना देय असलेली रक्कम रु.१०.५६ लक्ष मधून रु. ५.०० लक्ष वजा जाता रु. ५.५६ लक्ष इतकी रक्कम देण्याचे मान्य करण्यात आले.

३. प्रोजेक्ट संगणक आज्ञावलीचे उर्वरीत काम तसेच त्यात अपेक्षित काम पुर्ण करणे व तद्नंतर पुढील १ वर्षाच्या काळात त्याची योग्य ती देखभाल विना-मोबदला करण्याबाबत मे. स्मार्टलिंक, मुंबई यांचेशी सहमती करार करण्याचे ठरले.

४. मे. स्मार्टलिंक, मुंबई यांचेशी सहमती करार करण्यात येवून सुधारीत संगणक आज्ञावली तयार करण्याबाबत सूचना केल्या. संचालक मंडळाच्या बैठकीत मे. स्मार्टलिंक यांनी महामंडळाच्या अपेक्षेनुसार उर्वरित कामाची पूर्तता केली आहे, व्यवस्थापकीय संचालक यांनी असे कळविले आहे.

भविष्यात अशा प्रकरणी करारनाम्याच्या अटीनुसार व संचालक मंडळाच्या मान्यतेने कार्यवाही करण्याबाबत दक्षता घेणेबाबत सूचना देण्यात येतील.

निविदेतील अट क्र. १० नुसार पुरवठादाराने महामंडळाकडे सुरक्षा अनामत रक्कम जमा करणे बंधनकारक आहे. तथापि, मे. स्मार्टलिंक यांनी सुरक्षा अनामत रक्कम का जमा केली नाही किंवा त्यांना सुरक्षा रक्कम जमा करण्यातून सुट देण्यात आली होती किंवा कसे? याबाबत महामंडळाकडून निर्देश देण्यात आलेले नाहीत. या प्रकरणी आगाऊ रक्कम वसुलीसाठी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी कार्यवाही करणे अपेक्षित होते.

दरम्यान आक्षेप क्र. २ येथे नमूद केल्याप्रमाणे महामंडळाने मे. स्मार्टलिंक यांच्याबरोबर बैठक आयोजित करून महालेखापाल यांच्या आक्षेपाच्या संदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आल्याचे व्यवस्थापकीय संचालक यांनी त्यांच्या दि. ७ फेब्रुवारी २०१३ च्या पत्रान्वये शासनास कळविले आहे. निर्णयाबाबत तपशिल आक्षेप क्र. २ च्या शासन अभिप्रायात नमूद करण्यात आले आहे.

संस्था " अ " ला (मे. स्मार्टलिंक, मुंबई) दि. १४ जानेवारी २००५ रोजी देण्यात आलेले लेखा विषयक संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम नियोजित वेळेप्रमाणे पूर्ण केले. संस्था " ब " (मे. मेकॅक्ट्रॉनिक्स,

पुणे) यांनी जून, २०१० पर्यंत ७०% काम पूर्ण केले. याबद्दल मे. मेकॅक्ट्रॉनिक्स, पुणे यांना रु. ७.४८ लक्ष इतके अग्रीम देण्यात आले. दरम्यान, मे. मेकॅक्ट्रॉनिक्स, पुणे या संस्थेने सुमारे रु. १२.४६ लक्ष इतक्या रकमेची यंत्र सामुग्री वापरात आणली. परंतु संस्था " अ " (मे. स्मार्टलिंक, मुंबई) यांनी लेखा विषयक संगणक प्रणालीला सोर्सकोड टाकून अडवणूकीचे धोरण स्वीकारल्यामुळे संस्था " ब " (मे. मेकॅक्ट्रॉनिक्स, पुणे) यांनी उभारलेली इंट्रानेट व व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित होवू शकली नाही. असे महामंडळाने नमूद केले आहे.

परंतु आक्षेप क्र. २ येथे नमूद केल्याप्रमाणे महामंडळाने मे. स्मार्ट लिंक यांच्याबरोबर बैठक आयोजित करून महालेखापाल यांच्या आक्षेपाच्या संदर्भात महत्वाचे निर्णय घेतलेले आहेत.

यापुढे कंपनीच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी महालेखापाल यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करण्याबाबत महामंडळास शासनस्तरावरुन सुचना देण्यात आल्या आहेत.

३.४ समितीला सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २ फेब्रुवारी २०१६ व २४ मे २०१६ रोजी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद क्र. ३.१४ " निष्फळ खर्च " याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात कंपनीने लेखा व व्यवस्थापन माहिती प्रणाली सॉफ्टवेअर पुरविण्याकामी रु. २३.३२ लाखांचा निष्फळ खर्च केल्याप्रकरणी महामंडळाच्या संबंधित अधिकारी यांनी थोडक्यात माहिती विषद करावी. अशी समितीने विचारणा केली.

यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी (वास्तविक पाहता) अपंग महामंडळाचा अतिरिक्त कार्यभार या महामंडळाकडे सन २००५ पासून आहे. सदरहू महामंडळाचे लेखा व व्यवस्थापन माहिती प्रणाली तयार करण्याचे काम स्मार्ट लिंक कंपनीला दिले होते. त्याकरिता १५.८४ लाख रुपये अग्रीम रक्कम देण्यात आली होती. मे. मेकॉट्रॉनिक या कंपनीला महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाचे इंट्रानेट ॲप्लीकेशनचे कामासाठी ७.४८ लाख रुपये अग्रीम रक्कम दिली होती. अशाप्रकारे एकूण २३.३२ लाख रुपया संदर्भात महालेखापरीक्षक यांनी लेखा आक्षेप नमूद केला आहे. सदरहू अग्रीम रक्कम सलग ३-४ वर्षे खात्यामध्ये निदर्शनास आल्याने सदर प्रकरणी निष्फळ खर्च झाला आहे, असा महालेखापरीक्षक कार्यालयाचा लेखा आक्षेप आहे. वास्तविक पाहता ओबीसी महामंडळाकडून अपंग महामंडळाचे सॉफ्टवेअरचे काम पूर्ण करण्यात आले आहे व महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या इंट्रानेट ॲप्लीकेशनचेही काम पूर्ण झाले आहे. महामंडळाने सदरहू कंपन्याकडून झालेल्या विलंबाबाबत त्यांना दंड वसूल केला असून सदरहू लेखे राशीभूत (कॅपिटलाईझ) करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी निष्फळ खर्च झाला, असे म्हणता येणार नाही. कंपनीकडून संगणकीय प्रणाली विकसित करून घेण्याकरिता महामंडळाने माहे मार्च, २००७ मध्ये निविदा काढली होती असा खुलासा केला.

यावर समितीने पुनः विचारणा केली की, महामंडळाने दिलेल्या माहितीमधील पान क्रमांक ७ वर नमूद दिनांक १८ मार्च २००७ रोजीची निविदा व नंतरची निविदा ही वेगवेगळया कामांची आहे काय, त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, सदरहू निविदा महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळाच्या संगणक आज्ञावलीसंबंधी होती. पहिले काम ५० टक्के पूर्ण होण्यापूर्वी पुन्हा दुसरे काम संबंधित कंपनीला दिले त्यामुळे निष्फळ खर्च झाला असे लेखापरीक्षकांचे म्हणणे आहे. तसेच सन २००६ व २००७ मधील दोन्ही वेगवेगळ्या निविदा आहेत. सदरहू कालावधी मध्ये कोणते अधिकारी कार्यरत होते, याबाबत समितीस माहिती देताना सदरहू कालावधीमध्ये लेखा अधिकारी श्री. एस. के. बुवा व त्यांना श्री.साळसकर हे सहाय्य करीत होते. श्री. साळसकर यांना महालेखापरीक्षा कार्यालयातून सेवानिवृत्त झाल्यानंतर अकाऊंट संबंधी कामकाज पाहण्याकरिता महामंडळामध्ये नियुक्त करण्यात आले होते. श्री. एस. के. बुवा हे महामंडळाचे लेखा अधिकारी ४ ते ५ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. गोटे होते व तेही सेवानिवृत्त झाले आहेत. असे महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

३.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.१४ " निष्फळ खर्च " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली साक्षीच्या वेळी महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाने शासनाच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित या कंपनीला लेखा व व्यवस्थापन माहिती प्रणालीचे सॉफ्टवेअर विकसित करण्याचे काम दिले त्या कामासाठी या कंपनीने मे. स्मार्टलिंक, मुंबई यांची नेमणूक केली व या कामासाठी द्यावयाच्या मोबदल्याच्या एकूण रक्कम रु. २६.४० लाख पैकी ६०% म्हणजेच रु. १५.८४ लाख मे. स्मार्टलिंकला देण्यात आले. तसेच **महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामधील माहिती प्रणालीचे सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठी मे.मेकॉट्रानिक्स, पुणे यांची नेमणूक केली व त्या कामासाठी द्यावयाच्या मोबदल्याच्या एकूण रक्कम रु.२४.९२ लाख पैकी ३०% म्हणजेच रु.७.४८ लाख मे. मेकॉट्रॉनिक्स, पुणे यांना देण्यात आले. त्यापैकी "अ" कराराचे काम दिल्याच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या पूर्ण करावयाचे होते त्याला २ वर्षापेक्षा जास्त विलंब झाला व "ब" चे कराराचे काम दिल्याच्या तारखेपासून ४ महिन्यांत पूर्ण करावयाचे होते त्याला २ वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही काम पूर्ण झालेले नाही असे निदर्शनास आले, महामंडळाने समर्थन (जस्टिफिकेशन) व्हावे याकरिता दिलेल्या माहितीमुळे संभ्रम निर्माण झाला आहे. समर्थन चुकीच्या पद्धतीने देण्यात आले आहे. महामंडळाने ५० टक्के अग्रीम संबंधित कंपनीला तीन महिन्यामध्ये काम पूर्ण करावे. यासाठी दिले होते त्यानंतर सन २००७ मध्ये संबंधित कंपनीला पुन्हा काम देण्यात आले होते त्यावेळी सदरहू कंपनीने सन २००६ मध्ये दिलेले काम ही पूर्ण केले नव्हते. ५० टक्के काम पूर्ण केले अशी त्यावेळच्या व्यवस्थापनाची धारणा होती, त्यामुळे पुढील काम संबंधित कंपनीस देण्यात आले, ही बाब समितीस**

समर्थनीय वाटत नाही. कारण धारणा आणि वस्तुस्थिती या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. सदरहू प्रकरणी जी धारणा होती तीच मुळात चुकीची होती कारण सन २००६ मधील काम कंपनीने पूर्ण केलेले नसताना ही दुसरे काम सन २००७ मध्ये देण्यात आले आहे ही वस्तुस्थिती आहे, त्यामुळे व्यवस्थापकीय संचालक व संबंधित अधिकाऱ्यांनी ५०% अग्रीम संबंधित कंपनीला दिल्यानंतर जबाबदारीपूर्वक संगणकीय प्रणालीचे काम पूर्ण करून घेणे आवश्यक होते.

महामंडळाने या परिच्छेदासंदर्भात चुकीचे उत्तर घेऊन समितीसमोर येणे ही बाब अतिशय गंभीर आहे. तसेच ती विशेषाधिकाराचा भंग करणारी आहे. शासनाकडून ही सदर प्रकरणी लक्ष घातले जात नाही. आणि महामंडळाकडून देण्यात आलेले उत्तर योग्य नाही. निविदा कार्यवाहीमध्ये कंपनीकडून चुक झाली आहे, असे उत्तर शासनाने सदरहू लेखापरीच्छेद प्रकरणी दिले आहे. त्यावेळी तांत्रिक निविदा नव्हत्या तर पुन्हा निविदा काढणे आवश्यक होते, तसेच विनिर्देशासाठी (स्पेसिफिकेशनसाठी) वाटाघाटी करावयास पाहिजे होत्या. सदर प्रकरणी दोन्हीही पर्याय अवलंबिण्यात न आल्याने अक्षम्य चूक झालेली आहे. परंतु शेवटी काम पूर्ण झालेले असल्याने, यापुढे अशाप्रकारे चुकीच्या पद्धतीने कार्यवाही करु नये, अशा सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत तसेच निविदेबाबतची कार्यवाही करण्यासाठी शासनाचेही नियम आहेत. कोणतीही निविदा काढताना अगोदर तांत्रिक बोली खुली (टेक्निकल बिड ओपन) करण्यात येते व त्यामध्ये कंपनी योग्य असेल तरच आर्थिक बोली खुली (फायनान्शिअल बिड ओपन) करण्यात येते. तांत्रिक आणि आर्थिक बोली (टेक्निकल आणि फायनान्शिअल बिड) एकाच वेळी खुल्या (ओपन) केल्याचे कोठेही उदाहरण नाही. **महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाने दिलेल्या या अभिप्रायाशी शासन तिळमात्र सहमत नाही, त्यामुळे सदरहू प्रकरणी त्यावेळी शासनाने संबंधितावर कारवाई करण्याबाबत महामंडळास सूचना देणे आवश्यक होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही शासनाकडून करण्यात आली नाही. ही वस्तुस्थिती आहे.**

तसेच निविदेचे दोन्ही लिफाफे जरी एकत्र आले असले तरी अगोदर तांत्रिकदृष्ट्या निर्णय घेण्याकरिता कोण पात्र आहे हे तपासणे आवश्यक होते. या धोरणाचे महामंडळाकडून उल्लंघन करण्यात आले आहे याप्रकरणी महामंडळावर शासनाचे नियंत्रण असणे अभिप्रेत आहे. लेखापरीक्षकांनी सदरहू प्रकरणी अहवाल सादर करून झालेली चूक महामंडळ व शासनाच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर शासनाने सदरहू प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करावयास पाहिजे होती, **या प्रकरणामध्ये २५ लाख रुपयांचे काम दिलेले आहे. या रकमेच्या ६० टक्के रक्कम म्हणजेच १५ लाख रुपये अग्रीमापोटी देण्यात आले आणि केवळ ७५ हजार रुपयांची बँक गॅरंटी घेण्यात आली. म्हणजेच या प्रकरणात फार उदारता दाखविण्यात आलेली आहे. १५ लाख रुपये घेतल्यानंतर कंपनी अचानक बंद होऊ शकते. ही बाब महामंडळाने गांभीर्याने घेतलेली नाही. साधारणपणे अभियांत्रिकी करार किंवा पायाभूत प्रकल्पाशी संबंधित प्रकल्पांमध्ये लवाद नेमले जातात. सदरचे संगणक प्रणाली करार इंटरनेट इत्यादी विकासित करण्यासंदर्भातील होते. यामध्ये त्यांनी लवाद नेमण्याचा खंड (आर्बीट्रेटरचा क्लॉज) घातलेला नाही. व यामध्ये लवादही नेमलेला नाही, त्यामुळे हा करार करीत** असताना प्रमाणक प्रक्रियेचा

दंड करण्याचा खंड (पेनल्टी क्लॉज) समाविष्ट केलेला नाही. व सन २००७ मध्ये सुरक्षा ठेव (सेक्युरिटी डिपॉझिट) म्हणून मे. स्मार्टलिंक या कंपनीकडून केवळ २५ हजार रुपयांची पावती घेतलेली आहे. ही बाबही अधोरेखीत होण्याजोगी आहे.

सदरहू सुरक्षा ठेव अत्यंत अल्प आहे त्यामुळे मे. स्मार्टलिंक यांनी सुरक्षा अनामत रक्कम त्या प्रमाणात का जमा केली नाही किंवा कंपनीस सुरक्षा रक्कम जमा करण्यास महामंडळाकडून सूट देण्यात आली होती किंवा कसे याबाबत उपलब्ध कागदपत्रामध्ये कोणतीही कारणमिमांसा नाही. फक्त २५ हजार रुपयांची पावती घेतल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबी शासनाने गांभीर्याने पहाणे आवश्यक आहे. यासंदर्भात महामंडळाने सन २०१३ पासून आतापर्यंत कोणती कार्यवाही केली, कोणाच्या विरोधात केली, व त्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत विचारणा करणे आवश्यक होते. **या प्रकरणाशी संबंधित काही अधिकारी लेखा शाखेमध्ये आजही सेवेत असतील तर त्या सर्व संबंधितांची वेतन वाढ (इन्क्रीमेन्ट) रद्द करण्यात यावी असे समितीचे स्पष्ट मत आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

" महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ "

(सन- २००९-२०१०)

चार - महसुलाचे नुकसान :- (महामंडळाने वाटपकर्त्याला वाणिज्यिक दराने जमीन घेण्याचे मान्य केले असतांनाही जमीन औद्योगिक दराने नियतवाटप केल्यामुळे रु. १.०५ कोटीच्या वाटपदाराला अदेय फायदा दिला होता).

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-१० च्या प्रकरण क्रमांक ३ मधील **परिच्छेद क्रमांक ३.१८ मध्ये "महसुलाचे नुकसान"** यासंदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, मेडीप्लास्ट पॅकेजिंग नागपूर प्रायव्हेट मर्यादित (एमपीएनपीएल) आणि भाग्यश्री होम अप्लॉयन्स प्रायव्हेट मर्यादित (बीएचएपीएल) यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (महामंडळ) यांनी ऑगस्ट, २००७ मध्ये हिंगणा औद्योगिक वसाहतीत व्यापारी दराने जमीन वाटप करण्याची विनंती केली. हे दोघे प्रकल्पबाधित होते कारण महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (एमएडीसीएल) त्याच्या मिहान* प्रकल्पासाठी वरील प्रकल्पबाधितांच्या ८,२०० व १,०७५ चौरस मीटर भूखंडाचे अधिग्रहण केले होते महामंडळाच्या धोरणानुसार अधिग्रहित केलेल्या एकूण जमिनींपैकी केवळ १५ टक्के जमिनच प्रकल्पग्रस्तांना द्यावयाची होती. परंतू, महामंडळाने सहानुभूती म्हणून जवळपास अधिग्रहित केलेल्या १०० टक्के जमीन वाटप करण्यास मान्यता दिली होती.

महामंडळाने १० डिसेंबर २००७ रोजी एमपीएनपीएल यांना ६,२०० चौरस मीटर व बीएचएपीएलना ३,००० चौरस मीटर जमीन रु. २,२१३.७५ प्रति चौरस मीटर या व्यापारी दराने करण्यात येत असल्याचे कळविले, परंतु या दोघांनी भूखंडाची किंमत भरण्यास नकार दिला व ते प्रकल्पबाधित असल्याने त्यांना रु. ७०० प्रति चौरस मीटर या व्यापारी दराने भूखंड देण्याची विनंती केली. सदरहू विनंती मान्य (जानेवारी, २००८) करताना महामंडळाच्या संचालक मंडळाने (बीओडी) औद्योगिक व व्यापारी दरातील फरक (रु. १,५१३.७५ प्रति चौरस मीटर) एमएडीसीएलकडून ज्यांनी आपल्या प्रकल्पासाठी वरील दोन प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी अधिग्रहित केल्या होत्या, वसूल करण्यास सांगितले. त्यानुसार ६,२०० आणि ३,००० चौरस मीटर जमीन (एप्रिल,२००८) अनुक्रमे एमपीएनपीएल व बीएचएपीएल यांना रु. २,२१३.७५ प्रति चौरस मीटर या व्यापारी दराने (रु. १,७५० प्रति चौरस मीटर अधिक १० टक्के हिंगणा औद्योगिक वसाहतीस लागू असलेले अतिरिक्त अधिमुल्य अधिक १५ टक्के रोड फ्रंटेज) वाटप करण्यात आली. त्या औद्यागिक क्षेत्रातील प्रचलित औद्योगिक दर रु. १,१५० प्रति चौरस मीटर (रु. १,००० प्रति चौरस मीटर अधिक १५ टक्के रोड फ्रंटेजसाठी जादा अधिमूल्य).

भूखंड वाटप सूचनापत्र मिळाल्यानंतर दोन्ही प्रकल्पग्रस्तांनी (एमपीएनपीएल व बीएचएपीएल) महामंडळास त्यांना भूखंड औद्योगिक वा व्यापारी दराने देण्याचा व औद्योगिक वसाहतीमधील भूखंड वाटपात लावण्यात येणाऱ्या १० टक्के अधिमूल्य न आकारण्याची विनंती (मे, २००८) केली. दुसरा पर्याय जास्त फायदेशीर असून देखील

***बहूआयामी आंतरराष्ट्रीय प्रवासी व मालवाहतुकीचे केंद्र (मिहान) प्रकल्प, नागपूर.**

महामंडळाने पहिला पर्याय स्वीकारुन औद्योगिक दराने भूखंड वाटप केले. ही बाब महामंडळाच्या आर्थिक हितसंबंधास बाधक होती.

महामंडळाच्या उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला दिलेल्या तोंडी आदेशानुसार (सप्टेंबर, २००८) प्रादेशिक व्यवस्थापक, नागपूर यांनी सुविधा क्षेत्रासाठी राखीव असलेल्या भूखंडातून एमपीएनपीएलला ६,२०० चौरस मीटर व बीएचएपीएलला १,०७५ चौरस मीटर भूखंड वेगळा काढून रु. १,१५० प्रति चौरस मीटर या औद्योगिक दराने उभय प्रकल्पग्रस्तांना दिला (नोव्हेंबर, २००८) महामंडळास अनुक्रमे रु. ७१.३० लाख व रु. १२.३६ लाख भू-अधिमूल्यापोटी मिळाले व भूखंड डिसेंबर, २००८ मध्ये ताब्यात देण्यात आले. जून, २००९ मध्ये महामंडळाच्या अध्यक्षांनी या जमीन वाटपास कार्योतर मान्यता दिली. याशिवाय जुलै, २००९ मध्ये बीएचएपीएलना १.००० चौरस मीटर अतिरिक्त जमीन रु. १,१०० प्रति चौरस मीटर या औद्योगिक दराने देण्यात आली व महामंडळाच्या अध्यक्षांचा मान्यतेने (जून, २००९) ही जमीन जुलै, २०१० मध्ये ताब्यात दिली गेली.

महामंडळाच्या अध्यक्षांचा निर्णय महामंडळाच्या संचालक मंडळाने वरील दोन्ही पक्षांना हिंगणा औद्योगिक वसाहतीत व्यापारी दराने भूखंड वाटप करण्याच्या निर्णयाच्या विरुद्ध होता. अशाप्रकारे ८,२७५ चौरस मीटर भूखंड रु. २,४१५ प्रति चौरस मीटर या प्रचलित व्यापारी दराने देण्याऐवजी (८ ऑगस्ट २००८ पासून प्रभावी असलेला) औद्योगिक दराने वाटप केल्याने रु. १.०५* कोटी इतक्या अधिमूल्याचे नुकसान झाले होते.

व्यवस्थापनाने आपल्या उत्तरात (फेब्रुवारी, २०१०) म्हटले की, प्रकल्प ग्रस्तांची विनंती लक्षात घेऊन त्यांना औद्योगिक दराने भूखंडाचे वाटप करण्यात आले होते व त्यास महामंडळांच्या अध्यक्षांची पण मान्यता (जून, २००९) होती. उत्तर मान्य करता येत नाही, कारण त्यांत दस्तरखुद्द दोन्ही पक्षांची व्यापारी दराने भूखंड घेण्याची तयारी दाखविली असतांनाही त्यांना औद्योगिक दराने भूखंडाचे वाटप का करण्यात आले याचा खुलासा करण्यात आलेला नाही. तसेच, अध्यक्षांचा निर्णय संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध होता ज्यामुळे दोन्ही भूखंडधारकांना अदेय फायदा होऊन महामंडळाच्या हितांचे नुकसान झाले होते.

सबब शिफारस करण्यात येते की, भूखंडाचे वर्गीकरण व त्यासाठी आकारावयाचे मूल्य याबाबत स्वतः निश्चित केलेल्या धोरणांविरुद्ध जाऊन महामंडळाने अविवेकी निर्णय घेऊ नयेत.

ही बाब व्यवस्थापन/शासनाला कळविण्यात (मे, २०१०) आली होती; त्यांचे उत्तर प्रलंबित होते (डिसेंबर, २०१०)

४.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, भारत सरकारच्या वतीने पुरस्कृत करण्यात आलेले मिहान प्रकल्प महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र विमान प्राधिकरण (एम.ए.डी.सी) मार्फत राबविण्याचे मान्य केले.

***७,२७५ चौरस मीटर × रु. १,२६५ (रु. २,४१५ - रु. १,१५० प्रति चौरस मीटर) + १,००० चौरस मीटर × रु. १.३१५ (रु. २,४१५ - रु. १,१०० प्रति चौरस मीटर) = रु.१०५.१८ लाख.**

त्यानुसार, मिहान प्रकल्प अंमलात आणणे करीता महाराष्ट्र सरकारने आवश्यक जागेकरिता अंदाजे ४३५४ चौ.मी. जागा अधिसुचीत केली. ह्या प्रकल्पामुळे बाधित होणारे मिहान प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन महाराष्ट्र सरकारने दिले होते. ह्या प्रकल्पामध्ये दोन्ही कंपन्या बाधित झाल्याने बाधित कंपन्यांचे, महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात सामावून पुनर्वसन करणेचे ठरले.

दोन्ही कंपन्यांचे चालू उद्योग मिहान प्रकल्पाकरीता अधिसूचित केलेल्या जागेमध्ये येत असल्याने महाराष्ट्र शासन निर्णयानुसार उद्योगाचे औद्योगिक प्रयोजनात येत असुनही व्यापारी प्रयोजन विचारात घेऊन महामंडळाच्या धोरणानुसार हिंगणा औद्योगिक क्षेत्रात युनिट स्थापन करणेस भुखंड वाटप करणेत यावा अशी विनंती केली.

औद्योगिक गतीविधी ही व्यापारी गतीविधी असल्याचे त्यांचा समज झाला असावा त्यानुसार महामंडळाला दि. २१ जानेवारी २००८ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या ३१८ व्या बैठकीमध्ये प्रकल्प-बाधित कंपन्यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना व्यापारी दराने भूखंड वाटप करण्याचा ठराव पारित करण्यात आला.

संचालक मंडळाचा ठराव क्र. ४५२१ च्या अनुषंगाने व महामंडळाच्या भूखंड वाटपाच्या प्रचलित धोरणानुसार वरील प्रकल्प-बाधित कंपन्यांना व्यापारी दराने हिंगणा औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाकरीता देकारपत्र देण्यात आले.

अंकेक्षण करताना काहीबाबी अंकेक्षकाच्या नजरेस आल्यात. त्या पुढीलप्रमाणे :—

(१) दोन्ही प्रकल्प बाधित कंपन्यांनी देकार पत्र प्राप्त झाल्यानंतर महामंडळाला अशी विनंती केली होती की, एकतर औद्योगिक दराने किंवा व्यापारी दराने भूखंडाचे वाटप करावे व त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्रासाठी लावण्यात आलेला १०% जास्तीचा आकार रद्द करण्यात यावा.

(२) औद्योगिक प्रयोजनाकरीता भूखंडाचा वापर होणार असल्याचे भूखंडाचे वाटप औद्योगिक दराने करणेत यावे अशी विनंती देकारपत्र प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराने केली.

पुनर्वसन धोरणानुसार, प्रकल्प-बाधित युनिटचे पुनर्वसन विहीत औद्योगिक धोरणानुसार करावयाचे होते तरीसुद्धा अर्जदाराची गतीविधी ही औद्योगिक गतीविधीपेक्षा वेगळी असू शकते. पुनर्वसनाचे वेळेस महामंडळाच्या वित्तीय बाबींचा विचार करण्यात आला नाही, व महामंडळाने जमिनीचा प्रिमियम, प्रकल्प बाधित व्यक्तीकरीता असलेल्या त्यावेळेच्या नियमानुसार स्वीकारण्यात आला व भूखंडाचा ताबा अर्जदारास देण्यात आला.

भूखंडधारकाने त्यांच्या उद्योगाचे विस्तराकरीता लगतच्या जागेची मागणी केली असून त्यांचे विनंतीचा विचार करून महामंडळाचे धोरणानुसार उद्योग विस्ताराकरीता भूखंड वाटप करण्याचे मान्य करणेत येऊन त्यांना भूखंड वाटप करण्यात आले.

दि. २१ ऑगस्ट २००८ रोजी अर्जदारास व्यापारी दराने भूखंड वाटप करण्याचे ठरले त्याच वेळेस वाटप करण्यात येणाऱ्या जागेचे औद्योगिक जागेत परिवर्तन करण्याचा निर्णय महामंडळाने दि. १४ ऑगस्ट २००८ रोजी घेतला व वाटप करण्यात आलेल्या भूखंडालगतचे भूखंड हे औद्योगिक भूखंड असून अर्जदार सुद्धा वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचा औद्योगिक वापर करणार आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम असून सदर उपक्रम ना-नफा ना-तोटा या धर्तीवर आधारीत आहे. औद्योगिक जागा औद्योगिक प्रयोजनकरीता वापरात येत असल्याने औद्योगिक जागेकरीता वाणिज्य दर आकारुन मतभिन्नता येऊ नये म्हणून सदर जागा प्रचलित धोरणानुसार औद्योगिक दराने वाटप करण्यात आलेली आहे.

अशा प्रकारे प्रकल्पबाधित उद्योगाचे पुनर्वसन करण्याचा निर्णय विहीत नियमावलीस बाधित न करता घेण्यात आला आहे. सदर जागा औद्योगिक जागेत परिवर्तीत करून औद्योगिक दराने औद्योगिक वापराकरीता महामंडळाचे प्रचलित धोरणानुसार महामंडळाचे आर्थिक नुकसान न करता वाटप करण्यात आले आहे.

अर्जदार हे शासनाच्या मिहान प्रकल्पाअंतर्गत जमीन संपादित झालेले प्रकल्पग्रस्त असल्याने त्याचप्रमाणे विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे आवश्यक ५% हून अतिरिक्त सुविधा क्षेत्र उपलब्ध असल्याने व महामंडळ स्वतः नियोजन प्राधिकरण असल्याने महामंडळाने विचार करून औद्योगिक दराने तसेच सरळ पद्धतीने कंपनीस वाटप करण्याच्या घेतलेल्या निर्णयास संचालक मंडळाची कार्योत्तर मान्यता ठराव क्र. ४९५१ नुसार प्राप्त झालेली आहे. अंकेक्षकानी घेतलेला परिच्छेद क्र. ३.१८ महसुलाचे नुकसान वगळणेकरीता विनंती करण्यात येत आहे.

४.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, सदर बाब महामंडळाच्या अखत्यरितील असल्यामुळे विभागाचे भाष्य नाही.

४.४ समितीला उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २६ एप्रिल,२०१६ रोजी उद्योग विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील **परिच्छेद क्र. ३.१८ "महसूलाचे नुकसान"** याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात महामंडळाने वाटपकर्त्याला वाणिज्यिक दराने जमीन घेण्याचे मान्य केले असतानाही जमीन औद्योगिक दराने नियतवाटप केल्यामुळे १.०५ कोटीचा वाटपदाराला अदेय फायदा दिला होता. वाटपकर्त्याने स्वतः वाणिज्यिक दराने जमीन विकत घेण्याचे प्रस्तुत केलेले असतानाही औद्योगिक दराने जमिनीचे नियतवाटप का करण्यात आले होते, आतापर्यंत काय झाले याची माहिती द्यावी. कोणत्या परिस्थितीमध्ये हे प्रकरण झाले, या संदर्भात काही निकष आहेत काय, आपण प्रकल्पबाधितांचे ८ हजार २०० व १ हजार ०७५ चौरस मीटर भूखंडाचे अधिग्रहण केले होते.महामंडळाच्या धोरणानुसार अधिग्रहीत केलेल्या एकूण जमिनींपैकी केवळ १५ टक्के जमीनच प्रकल्पग्रस्तांना द्यायची होती. परंतु आपण त्यांना

अधिकची जमीन दिली आणि तीसुद्धा व्यापारी दराने न देता औद्योगिक दराने दिली. याबाबत आपले काय म्हणणे आहे, अशी समितीने महामंडळ तसेच विभागीय प्रतिनिधींना विचारणा केली.

यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, एमआयडीसीने एखाद्याची मोकळी जागा संपादित केली असेल तर त्यास १५ टक्के विकसित जमीन भूसंपादनात दिली जाते. परंतु त्यामध्ये आणि या प्रकरणामध्ये फरक आहे. ज्या दोन कंपन्यांची जमीन मिहान प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली होती, ती मोकळी जागा नव्हती, त्या जागेवर उद्योग अस्तित्वात होता आणि सुरुÝ होता. सन २००७-०८ मध्ये शासनाचा मिहान प्रकल्पावर भर होता. मिहान प्रकल्प सुरुÝ करण्यासाठी जी जागा पाहण्यात आली त्या क्षेत्रात वरील दोन उद्योग येत होते. या दोन उद्योगांना हिंगणा एमआयडीसीमध्ये जागा देण्यात यावी अशाप्रकारची विनंती आली होती. वरील दोन उद्योगांची जेवढी जागा प्रकल्पामध्ये जात आहे तेवढी जागा त्यांना देणे क्रमप्राप्त आहे. यामध्ये १५ टक्के जागा देण्याचा प्रकार येत नाही. हिंगणा, एमआयडीसीने सुरूवातीला निर्णय घेतला होता की, सदर दोन उद्योगांना व्यापारी दराने जमीन द्यायची व व्यापारी आणि औद्योगिक दरातील फरक एमएडीसीएलकडून वसूल करायचा. त्यानंतर त्यांच्याकडून शासनास पत्र आले की, त्या जमिनीवर उद्योग उभारावयाचा असल्यामुळे औद्योगिक दराने जमीन द्यावी. त्यामुळे त्यांना औद्योगिक दराने जमीन देणे क्रमप्राप्त होते. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

यानंतर बोर्डाच्या मिटींगमध्ये असा स्पेसिफीक निर्णय घेण्यात आला होता काय, पूर्वीचे असे पूर्वोदाहरण आहे काय, महामंडळाने त्या दोन उद्योगांसाठी असा निर्णय घेतला की अन्य उद्योगांसाठी देखील असा निर्णय घेतला आहे तसेच महामंडळाने त्या उद्योगांना अतिरिक्त जमीन देखील दिलेली आहे. बीचएपीएल उद्योगाची जमीन १ हजार ०७५ चौरस मीटर इतकी असताना त्यांना ३ हजार चौरस मीटर इतकी जमीन दिली. म्हणजे आपण त्यांची कमी जागा घेऊन त्यांना तिप्पट जागा दिली. त्यांचा उद्योग सुरुÝ होता म्हणून त्यांना जमीन दिली हे मान्य आहे, परंतु ते व्यापारी दराने जमीन घेण्यास तयार होते फक्त औद्योगिक क्षेत्रासाठी लावण्यात आलेला १० टक्के जास्तीचा आकार रद्द करावा अशी त्यांनी विनंती केली होती. असे असताना महामंडळाने त्यांना व्यापारी दर न आकारता औद्योगिक दर का लावलेला आहे, शासनाच्या निदेशाप्रमाणे जमीन दिली. त्या उद्योगास ठराविक आकाराची जागा द्यावी असे शासनाने निर्देश दिले नव्हते. तरी त्या उद्योगांना कोणत्या नियमानुसार जास्तीची जागा दिली, अशी समितीने विचारणा केली.

त्यावर त्या दोन उद्योगांसाठीच हा निर्णय आहे. मिहान प्रकल्प आल्यामुळे त्या दोन उद्योगांची जमीन गेली. मिहान हा शासनाचा प्रकल्प असल्यामुळे त्या उद्योगांना सामावून घ्यावे असे शासनाने सांगितल्यामुळे त्यांना सामावून घेतलेले आहे. पण ही धोरणात्मक बाब नाही. या दोन उद्योगांसाठी त्यावेळी असा निर्णय घेण्यात आला होता. मिहान प्रकल्पामध्ये दोन उद्योग बाधित होत होते. त्या दोन उद्योगांची अनुक्रमे ८ हजार २०० आणि १ हजार ०७५ चौरस मीटर इतकी जागा होती. ज्या उद्योगाची ८ हजार २०० चौरस मीटर जागा होती त्यांना ६ हजार २०० चौरस मीटर जागा दिली. तर ज्या उद्योगाची १ हजार ०७५ चौरस मीटर जागा होती त्या

उद्योगास ३ हजार चौरस मीटर इतकी जागा देण्यात आली. त्या उद्योगास इतकी जागा का देण्यात आली हे रेकॉर्डवर स्पष्ट होत नाही. परंतु त्यांची मागणी असल्यामुळे व त्यांना तेथे उद्योग शिफ्ट करावयाचा असल्यामुळे त्यांना जागा देण्यात आली असावी अशी शासनाची धारणा महामंडळ व विभागीय सचिवांनी पक्की केली.

यानंतर समितीने विचारणा केली की, समोरची व्यक्ती व्यापारी दराने जमीन घेण्यास तयार होती. फक्त १० टक्के अतिरिक्त हप्ता माफ करावा अशी त्यांची मागणी होती. तरी देखील महामंडळाने त्यांना औद्योगिक दराने जमीन दिली यावर शासनाचे म्हणणे तसेच कंपन्यानी दिलेला प्रस्ताव महामंडळास बंधनकारक असल्याबाबत खुलासा करतांना महामंडळाच्या प्रतिनिधींनी सदर कंपन्यांनी पत्राद्वारे तीन प्रस्ताव दिले होते. त्यांचा पहिला प्रस्ताव सदरची जागा आम्हाला ७०० रुपयाला द्यावी असा होता. त्यावेळी औद्योगिक दर ७०० रुपये नव्हता. आपल्याकडे लिलावाच्या दोन पद्धती आहेत. जर लिलाव धोरण असेल तर लगतच्या मागील आर्थिक वर्षात लिलावाद्वारे जो काही दर आला असेल त्यामध्ये १० टक्के वाढ करावी अन्यथा पुन्हा लिलाव करावा. आपल्याकडे लिलावाचा दर रुपये १७५० आला होता त्यामध्ये १० टक्के वाढ करुन ती जमीन देण्याबाबत विचार होता. अगोदर सांगितल्याप्रमाणे सुरुवातीला त्यांनी ७०० रुपये दर लावावा अशी मागणी केली होती. त्यांनी दुसरा प्रस्ताव दिला होता की, रुपेय १ ७५० हा दर १० टक्के वगळून द्यावा. त्यांनी तिसरा प्रस्ताव दिला होता की, आपण जो काही दर लावणार आहात तो आम्हाला मान्य आहे, परंतु, आम्हाला त्याचे ४० हप्ते पाडून द्यावेत. त्यावेळी औद्योगिक दर रुपये ११५० होता. तेव्हा त्या कंपनीस रुपये ११५० या दराने जमीन द्यावी असा बोर्डाने निर्णय घेतला. असे समितीसमोर स्पष्ट केले.

तसेच महामंडळाने, कंपन्यांनी दिलेल्या प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही केली नाही. कोणीही प्रस्ताव दिला तरी त्यावर प्रचलित नियमाप्रमाणे बोर्डाने निर्णय घ्यावा लागतो. सदर जमीन त्यांना औद्योगिक वापरासाठी पाहिजे होती. सुरुवातीला व्यापारी दराने जमीन देण्याचा जो निर्णय घेण्यात आला होता तो तसा पाहिला तर चुकीचा होता. तसा निर्णय का घेण्यात आला हे सांगण्याबाबत असमर्थता दर्शविली तसेच तो चुकीचा निर्णय होता. ही बाब मान्य केली तसेच ती उद्योगाची जागा असेल तर त्या उद्योगासाठी जागा द्यायला पाहिजे. तेव्हा त्या वेळच्या औद्योगिक दरानुसार जमीन देण्यात आलेली आहे. त्यांनी कोणताही प्रस्ताव दिला तरी आपण औद्योगिक दर आणि औद्योगिक वापर तपासून भूखंडाचे वाटप केलेले आहे. औद्योगिक क्षेत्रासाठी जे भूखंड आहेत त्यासाठी महामंडळ निविदा काढत नाही. त्यांचे प्रकल्प अहवाल घेण्यात येतात हे प्रकल्प अहवाल तपासण्यासाठी वेगवेगळ्या समित्या आहेत, त्या समित्या निर्णय घेतात. औद्योगिक क्षेत्रामध्ये जर निवासी आणि वाणिज्यिक भूखंड असतील तर त्याच्या निविदा काढल्या जातात असा समितीसमोर खुलासा केला.

४.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.१८ "महसूलाचे नुकसान" या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली साक्षीच्या वेळी असे निदर्शनास आले की, दोन कंपन्यांना व्यापारी दराऐवजी औद्योगिक दराने जमीन देण्याचा एवढा मोठा निर्णय तोंडी आदेशानुसार (ओरल ऑर्डरवर) होत असेल आणि नंतर त्यास पूर्वलक्षीप्रभावाने मान्यता दिली जात असेल तर शासकीय कंपन्यांच्या कामाची पद्धत योग्य नाही. **सदर कंपन्यांना व्यापारी दराने जमीन देणे हे ही बाब महामंडळाने शासनाच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे होते, सदर जमीन कंपन्यांना औद्योगिक वापरासाठी पाहिजे होती, सुरूवातीला व्यापारी दराने जमीन देण्याचा जो निर्णय घेण्यात आला होता तो चुकीचा होता असे नमूद केले असले तरी यासंदर्भात पारदर्शकता दिसून येत नाही. ही बाब विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी मान्य केली आहे.**

एका उद्योगाला कमी जमीन सुद्धा दिलेली आहे. एखादा चालू उद्योग एमआयडीसीमध्ये येत असेल तर महामंडळ त्याला जागा देते. त्यावेळी त्यांना जास्त जागा दिली त्याचे कागदपत्र उपलब्ध नाही. यासंदर्भात समितीच्या असेही निदर्शनास आले की, **समोरची व्यक्ती व्यापारी दराने जमीन घेण्यास तयार असताना महामंडळ उदार होऊन त्यांना औद्योगिक दराने जमीन देते, त्यामुळे एकप्रकारे शासनाचे नुकसानच झालेले आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार अधिग्रहित केलेल्या एकूण जमिनीपैकी केवळ १५ टक्के जमीन प्रकल्पग्रस्तांना द्यावयाची असताना व त्यानुसर मे.मेडिफ्लास्ट पॅकेजिंग नागपूर प्रायव्हेट लि. आणि मे.भाग्यश्री होम अप्लायन्सेस प्रायव्हेट लि. या दोन प्रकल्प बाधित कंपन्यांची मिहान प्रकल्पासाठी अनुक्रमे ८२०० चौ.मी. व १०७५ चौ.मी. भूखंडाचे अधिग्रहण केले असताना प्रत्यक्षात त्यांचा अनुक्रमे ६२०० चौ.मी. व ३००० चौ.मी. आकाराचे भूखंड हिंगणा औद्योगिक वसाहतीत औद्योगिक दराने वाटप करण्यात आल्याने महामंडळाचे आर्थिक नुकसान झाले आहे. असे समितीचे स्पष्ट मत आहे.**

तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी उपरोक्त कंपन्यांना नियतवाटप केलेल्या भूखंडाकरिता व्यापारी दर आकारल्यास शासनाने होणारे आर्थिक नुकसान टाळता येऊ शकते ही बाब महामंडळाच्या संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. तथापि याठिकाणी असे झाल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने भूखंडाचे वर्गीकरण व त्यासाठी आकारावयाचे मूल्य याबाबत निश्चित केलेल्या धोरणाविरुद्ध महामंडळाने शासनाचे नुकसान होईल असे निर्णय घेऊ नयेत. याकरिता शासनाने एक स्वयंस्पष्ट धोरण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरिता निश्चित करून त्यानुसार भूखंडाचे नियतवाटप करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या अवलोकनार्थ ३ महिन्यांत सादर करावा. अशी समितीची शिफारस आहे.

पाच - टाळता येण्याजोगा खर्च :- (महामंडळाने विनंती प्रस्ताव (रिक्वेस ऑफ प्रपोजल) नुसार काम करणे आवश्यक नसलेले रु.७२.५३ लाखाचे काम कार्यान्वीत केल्यामुळे खाजगी संस्थेला अदेय फायदा झाला होता).

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-१० च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१९ मध्ये **" टाळता येण्याजोगा खर्च "** यासंदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महामंडळाने मे,२००९ मध्ये बारामती, लातूर, नांदेड, उस्मानाबाद आणि यवतमाळ येथील विमानतळ ९५ वर्षे मुदतीसाठी "जसे आहे तसे" तत्वावर आखणी, विकास, अपग्रेडींग, संचालन, देखभाल व चालविण्यासाठी विनंती प्रस्ताव (आरएफपी) मागविले. विनंती प्रस्तावात महामंडळाने अस्तित्वात असलेल्या चल व अचल मालमत्ता तसेच महामंडळाकडून चार* विमानतळांवर सध्या चालू असलेली व डिसेंबर,२०१० पर्यंत पूर्ण करावयाच्या कामांची यादी पण उघड केली होती.

विनंती प्रस्तावास प्रतिसाद म्हणून दाखल तीन प्रस्ताव प्राप्त झाले होते. रिलायन्स विमानतळ डेव्हलपर्स प्रायव्हेट मर्यादित (आरएडीपीएल) यांनी दिलेला रु.६३ कोटींचा उच्चतम देकार महाराष्ट्र शासनाच्या उच्चाधिकार प्राप्त समितीने स्विकारला. महामंडळाने सप्टेंबर,२००९ मध्ये देकारपत्र दिले. पाच विमानतळ ९५ वर्षांच्या लिजने चालविण्याकरिता आरएडीपीएलने पाच स्पेशल परपज व्हेईकल कंपन्यांची स्थापना केली होती, महामंडळाने या कंपन्यांबरोबर पाच करार केले (ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००९) विमानतळांची जमीन ऑक्टोबर व नोव्हेंबर,२००९ मध्ये हस्तांतरित करण्यात आली.

कागदपत्रांच्या तपासणी दरम्यान (जानेवारी, २०१०) असे आढळून आले की, मे, २००९ मध्ये विनंती प्रस्ताव आमंत्रित केल्यानंतर "उस्मानाबाद येथील विमानतळाची धावपट्टीच्या विस्ताराचे" काम एका कंत्राटदाराकडून (सुभाष देशमुख आणि कंपनी) करून घेतले ज्याचे मूल्य रु.७२.५३ लाख होते व विनंती प्रस्ताव मध्ये समाविष्ट नव्हते. कंत्राटदाराला प्रथम रंनिग बिलापोटी रु.५३.१७ लाख देण्यात आले (सप्टेंबर, २००९) उर्वरित मोजलेल्या व नोंद घेतलेल्या कामाचे रु.१९.३६ लाख अद्याप पावेतो कंत्राटदाराला देणे बाकी होते (जुलै, २०१०).

विनंती प्रस्तावाच्या व कराराच्या अटींप्रमाणे विमानतळ "जसे आहे तसे" या तत्वावर ज्यात अस्तित्वात असलेल्या मालमत्ता व चालु असलेल्या कामाचा समावेश होता, भाडेपट्ट्याने देण्यात आला होता. म्हणून विनंती प्रस्ताव आमंत्रित केल्यानंतर त्यात समाविष्ट नसलेल्या कामांवर खर्च करणे अत्यंत अयोग्य होते. यातून कंत्राट व्यवस्थापनातील गंभीर त्रुटी निदर्शनास येतात, शिवाय ते महामंडळाच्या आर्थिक हित संबंधांना पण मारक होते.

व्यवस्थापनाने वस्तुस्थिती (मे, २०१०) मान्य केली व म्हटले की, विनंती प्रस्तावामध्ये या कामाचा समावेश नव्हता व महामंडळाने सदरहू काम जानेवारी, २०१० मध्ये थांबविले असल्याचे सांगितले.

*** पांचपैकी चार विमानतळांवरील (लातूर, नांदेड, उस्मानाबाद व यवतमाळ) चालू असलेली कामे महामंडळाने पूर्ण करावयाची होती.**

तरीपण वस्तुस्थिती राहतेच की, अनियमितता लेखापरीक्षणाने उघडकीस आणल्यानंतर काम थांबविण्यात आले व दोषी अधिकाऱ्यांवर, ज्यांच्या बेजबाबदारीने आरएडीपीएलला अदेय मेहरबानी दाखविली गेली, याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली नव्हती.

शिफारस करण्यात येते की, महामंडळाने आपल्या आर्थिक हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी करारातील अटींवर लक्ष ठेवणारी प्रणाली मजबूत करावी तसेच दोषी अधिकाऱ्यांवर त्रुटीपूर्ण करार व्यवस्थापनाकरिता, ज्यात खाजगी संस्थेस अदेय मेहेरनजर दाखविणे समाविष्ट आहे, कारवाई करावयास हवी.

ही बाब शासनाला कळविण्यात (मे, २०१०) आली होती त्यांचे उत्तर प्रलंबित होते (डिसेंबर, २०१०)

५.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, उस्मानाबाद येथील हवाई धावपट्टी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विकसित करून सन २००६ मध्ये मऔविमकडे तद्नंतरच्या देखभालीसाठी व परिचलनासाठी हस्तांतरित झालेली होती.

सदरची १२१५ मी. लांबीची धावपट्टी ही अतिमहत्वाच्या व्यक्तीच्या उस्मानाबाद येथील प्रासंगिक भेटीच्यावेळी कमी पडत असल्यामुळे या धावपट्टीचे दोन्ही बाजूस प्रत्येकी २०० मी लांबीचे विस्तारीकरण करण्याचे ठरले व त्यास मऔविम संचालक मंडळाच्या ३२३ व्या बैठकीमध्ये ठराव क्रं. ४६७७ अन्वये रु. ४२७.०० लक्ष (नक्त) व रु. ४९१.०५ लक्ष (ठोक) एवढ्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. तद्नंतर सदर कामास मा. मुख्य अभियंता, पुणे यांनी त्यांचे कार्यालयीन नोंदवही बाब क्रं.०२ माहे नोव्हेंबर, २००८ अन्वये रु. ३,८७,७०,०९०.०० (नक्त) एवढया रक्कमेस तांत्रिक मंजूरी प्रदान केली.

वर नमूद केलेल्या कामासाठी नोव्हेंबर,२००८ मध्ये निविदा काढून सर्वात कमी दर असलेले मे. सुभाष देशमुख ॲन्ड कं., सोलापूर यांना कार्यकारी अभियंता, लातूर यांचे पत्र क्रं. ८७३ दिनांक १२ मे २००९ अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आला. सदर काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदारास मंजूर निविदेप्रमाणे १२ मे २००९ ते ११ नोव्हेंबर २००९ एवढा कालावधी देण्यात आलेला होता व त्याप्रमाणे १२ मे २००९ पासून कामास प्रत्यक्षपणे सुरूवात झाली. कामाच्या प्रगतीनुसार उप अभियंता, उस्मानाबाद यांनी सदर कामाचे प्रथम धावते देयक रु. ५३.१६ लक्ष ठेकेदारास माहे ०९/२००९ मध्ये अदा करण्यात आले.

सदरील काम मा.सह मुख्य कार्यकारी अधिकारी (मा व तं) मुंबई यांचे तोंडी आदेशान्वये दिनांक ३ नोव्हेंबर २००९ रोजी बंद करण्यात आले. दरम्यानच्या कालावधीमध्ये म्हणजेच दिनांक ३ नोव्हेंबर २००९ पर्यंत कंत्राटदाराने रु.५३.१६ लक्ष याशिवाय रु. १९,३६,०४७.०० इतक्या रक्कमेचे काम केलेले होते. अशा प्रकारे विषयांकित कामावर एकूण रु. ७२.५३ लक्ष खर्च झालेला आहे.

आर्थिक व्यवहार्यता, व्यवसायिक योजनासाठीच्या व पाच विमानतळांचे प्रारुप करारनामा तयार करण्यासाठी सल्लागार नेमणुकीचा निर्णय महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक क्रं. ३१६ बाब क्र.४४७७ दिनांक

१९ डिसेंबर २००७ अन्वये मंजूर झाला. सदरील बाबतीत निवडक आठ कंत्राटदाराकडून निविदा घेणे बाबत संचालक मंडळाच्या दिनांक १९ फेब्रुवारी २००९ रोजी झालेल्या बैठकीत अंतिम निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने महामंडळाने दिनांक १४ मे २००९ रोजी महामंडळाचे पाच विमानतळाचे संरचना, विकास, श्रेणीवाढ, चालन, देखभाल व व्यवस्थापन करणेसाठी आरएफपी मागविण्यात आले. या संदर्भात उच्चाधिकार समितीच्या मंजूरीने निविदा दिनांक १४ जुलै २००९ रोजी उघडण्यात आल्या व निविदेस अंतिम मंजूरी मंत्रीमंडळाने दिनांक २८ ऑगस्ट २००९ रोजी देण्यात आली. त्यानंतर दिनांक ०३ नोव्हेंबर २००९ रोजी उस्मानाबाद विमानतळ हे रिलायन्स एअरपोर्ट डेव्लपमेंट यांना हस्तांतरित करण्यात आले.

उस्मानाबाद येथील विमान धावपट्टीच्या विस्तारीकरणाची निविदा नोव्हेंबर,२००८ मध्ये वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आणि फेब्रुवारी- २००९ मध्ये मा. अध्यक्ष, मऔविम यांनी निविदेस मंजूरी दिली.

तद्नंतर तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सन २००९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेनंतर कार्यालयीन आदेश दिनांक १२ मे २००९ रोजी दिला. यानंतर कंत्राटदाराने दिनांक ३ नोव्हेंबर २००९ पर्यंत रु. ७२.५३ लक्ष इतक्या रक्कमेचे काम पूर्ण केले व तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्या आदेशानुसार काम दिनांक ३ नोव्हेंबर २००९ रोजी बंद करण्यात आले. अशारीतीने विषयांकित कामावर रु. ७२.४३ लक्ष इतका खर्च झालेला आहे व त्या अनुषंगाने मे. रिलायन्स कंपनी यांचेकडे सदर रक्कम वसूल करणे बाबत वेळोवेळी विनंती करण्यात आली. सदरील कामाव्यतिरिक्त या विभागाअंतर्गत येणाऱ्या लातूर विमानतळावरील संरक्षक भिंतीचे काम (Committee Work) असून सदरील काम भूसंपादनाच्या अडथळ्यामुळे अद्याप हाती घेण्यात आलेले नाही. म्हणून उस्मानाबाद विमानतळावर झालेल्या खर्चाची रक्कम लातूर विमानतळाच्या कामातून वसूल करणे बाबत. मे. रिलायन्स कं. यांनी त्यांचे पत्र दिनांक २३ एप्रिल २०१२ अन्वये लेखी संमती महामंडाळास दिलेली आहे. तरी आपणास विनंती करण्यात येते की, संदर्भीय शेरा बंद करण्यात यावा.

५.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, सदर बाब महामंडळाच्या अखत्यारितील असल्यामुळे विभागाचे भाष्य नाही.

५.४ समितीला उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २६ एप्रिल,२०१६ रोजी उद्योग विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील **परिच्छेद क्र. ३.१९ "टाळता येण्याजोगा खर्च"** याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात म्हणणे मांडताना विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पाच विमानतळाची खाजगीकरणाची प्रक्रिया चालू होती. उस्मानाबादची धावपट्टी २०० मीटर लांब केली पाहिजे असे दिसून आले. त्या कामाच्या निविदा झाल्या आणि दरम्यानच्या काळात त्याकामाचा कार्यादेश (वर्क ऑर्डर) होऊन ७२ लाख रुपये खर्च करण्यात आला होता. माहे मे,२००८ मध्ये कार्यादेश (वर्क ऑडर) दिला. नोव्हेंबर,२००९ मध्ये विमानतळाचे काम रिलायन्स कंपनीकडे आले. दरम्यानच्या काळात खर्च करण्यात

आला होता. जास्तीचा ठेका होता तो रद्द करुन तेवढ्यावरच काम थांबविण्यात आले नंतर रिलायन्स कंपनीशी वाटाघाटी झाल्या. रिलायन्सनही रक्कम भरण्यास तयार आहे. लातूर विमानतळ येथे एमआयडीसीला काही काम करायचे होते, त्यामध्ये हे समायोजन करुन घ्यावे हे देखील रिलायन्सने मान्य केलेले आहे. लातूरमध्ये काही भूसंपादनात अडचणी असल्यामुळे एमआयडीसीला भूखंड पूर्ण ताब्यात आलेला नाही. त्यामुळे अद्याप समायोजन अद्याप होऊ शकले नाही.

विमानतळाचे काम रिलायन्स कंपनीकडे देण्याचा निर्णय माहे नोव्हेंबरमध्ये झाला असला तरी त्याबाबतची कार्यवाही अगोदर सहा-आठ महिन्यांपासून सुरु होती. त्या परिस्थितीमध्ये विमानतळांचा ताबा द्यायचा आहे हे अधिकाऱ्यांना माहीत होते. एखाद्या विमानतळाने पैसे भरल्यानंतर किती खस्ता खाव्या लागतात हे आम्ही अमरावती विमानतळाच्या बाबतीत अनुभवले आहे. त्या परिस्थितीमध्ये विमानतळ ९५ वर्षाच्या लीजवर देत आहोत हे माहीत असताना त्याचे टेंडर काढून काम केले तर त्याचा फायदा रिलायन्सला मिळाला असता हे सर्व माहीत असताना अधिकाऱ्यांनी असा खटाटोप कशासाठी केला, तसेच सन २००७ मध्ये निर्णय झाला होता. त्या धावपट्टीवर बोईंग विमान उतरणार आहे असेही नव्हते. ती धावपट्टी २०० ते ४०० मीटरपर्यंत वाढवावयाची होती. त्या धावपट्टीवर फक्त चार्टरप्लेन उतरणार होते, त्यासाठी तेवढी धावपट्टी पुरेशी होती. आणि महामंडळास आहे त्या परिस्थितीमध्ये विमानतळ हस्तांतरीत करावयाचे होते. त्यामुळे घाई का केली. या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी समितीचे म्हणणे मान्य करून महामंडळास तो प्रकल्प द्यायचा होता. काही वेळा खाजगी कामामध्ये वेळ खूप लागतो. शासनास मेन्टेनन्स आणि विस्तारीकरणाची कामे करावी लागतात. या प्रकरणामध्ये खाजगीकरणाचा निर्णय सन २००७ मध्ये घेतला होता तो सन २००९ पर्यंत आला. काही वेळा कामे लांबली जातात. हे काम रिलायन्स कंपनीस मिळणार होते असे नाही तर यासाठी निविदा प्रक्रिया काढण्यात आली, त्यामध्ये रिलायन्स कंपनीला काम मिळाले. दिनांक १२ मे २००९ रोजी कार्यादेश दिला. फ्लाईंग अकॅडमी करायची असल्यामुळे तेथे फ्लाईंग ॲकॅडमीचा प्रस्ताव होता. त्यांच्यासाठी १४०० मीटरची धावपट्टी आवश्यक होती. ती १२१५ मीटर होती. त्यामुळे धावपट्टीचे दोन्ही बाजूस २०० मीटर वाढविण्याचे ठरले. तथापि, फ्लाईंग ॲकॅडमी त्यावेळी सुरू झाली नाही. परंतु, सन २०१३-२०१४ मध्ये सुरू झाली. ते काम करणे आवश्यक होते. निविदा प्रक्रिया चालू झाली, परंतु ती अंतिम झाली नव्हती. हे काम कोणाला मिळणार ते सुद्धा नक्की झाले नव्हते. या कामाची माहे मे,२००९ मध्ये कार्यादेश देण्यात आला. माहे ऑगस्ट,२००९ मध्ये निविदा शासन मंजुरीसाठी पाठविण्यात आली होती. रिलायन्सला प्रत्यक्षात ताबा माहे नोव्हेंबर,२००९ मध्ये देण्यात आला. हे काम माहे मे,२००९ मध्ये सुरू करण्यात आले. समितीचे म्हणणे बरोबर आहे. त्याच्या आधी सल्लागार नेमून पाच विमानतळांचे खाजगीकरण करण्याचे काम सुरू झालेले होते ही वस्तुस्थिती मान्य करून ते काम कोणाला द्यायचे व केव्हा द्यायचे ते अंतिम ठरलेले नव्हते. दरम्यानच्या काळामध्ये कार्यालयीन आदेश देण्यात आलेले होते. ज्यावेळेस काम हस्तांतरित केले त्यावेळेस ते काम बंद (टर्मिनेट) करण्यात आले. जरी ३ कोटी ६९ लाखांचे ते काम होते. तरी देखिल ज्यावेळेला माहे नोव्हेंबर,२००९

मध्ये रिलायन्सला शासन निर्णयाप्रमाणे हस्तांतरीत केले. त्यावेळेला ते काम थांबविण्यात आले. ते ओव्हर लॅप्स् झालेले आहे ही वस्तुस्थिती आहे.

उस्मानाबाद विमानतळासाठी दीड कोटी रुपये खर्च झाला आहे. यामध्ये पाच विमानतळांपेक्षा या विमानतळामध्ये फायदा त्यांना मिळाला असता आणि ही प्रक्रिया पूर्ण होत आली असती. तेवढी अट टाकू शकलो असतो. या समितीच्या म्हणण्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, रिलायन्स कंपनीने मान्य केले आहे की, जर लातूर विमानतळाचे काम झाले तर समायोजन करून घेऊ. लातूर विमानतळाचे काम एम.आय.डी.सी. ने त्यांना करून द्यायचे आहे. हे अभिलेखावर (ऑन रेकॉर्ड) मान्य केलेले आहे. लातूर विमानतळाचे काम पूर्ण झालेले आहे. फक्त संरक्षण भिंतीचे काम (वॉल कंपाऊंड) करायचे आहे. संरक्षण भिंतीच्या (वॉल कंपाऊंड) खर्चामध्ये ही रक्कम समायोजित केली जाईल असे लेखी पत्राद्वारे रिलायन्सने कळविले आहे.

संरक्षण भिंतीच्या बांधकामाच्या खर्चाचा अंदाज नाही. तेथे पूर्ण संरक्षण भिंत (वॉल कंपाऊंड) करण्यासाठी ४२ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. एकूण ८२०८ मीटर संरक्षण भिंत आहे. त्यासाठी ४८ हेक्टर जमीन आवश्यक आहे. त्यापैकी ३६ हेक्टर जमिनीचा ताबा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे (एम.ए.डी.सी.) आलेला आहे. अजून ११ हेक्टर जमीन पाहिजे आहे. त्या जमिनीचा वाद चालू आहे, जमीन अजून ताब्यात आलेली नाही. ही जमीन तुकड्या तुकड्यामध्ये आहे. त्यामुळे जमिनीमध्ये एक सलगता आलेली नाही. अशा कारणामुळे संरक्षण भिंतीचे (वॉल कंपाऊंड) काम सुरू करता आलेले नाही. ११ हेक्टर जमीन ताब्यात घेऊन काम सुरू करण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे. तेथे दोन मोठ्या दगडखाणी (क्वॅरी) आहेत.

५.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.१९ "टाळता येण्याजोगा खर्च" या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, महामंडळाने माहे मे,२००९ मध्ये बारामती, लातूर, नांदेड, उस्मानाबाद व यवतमाळ येथील विमानतळ ०५ वर्षे मुदतीच्या करारावर "जसे आहे तसे" या तत्वावर आखणी विकास अपग्रेडींग संचालन व देखभाल व चालविण्यासाठी प्रस्ताव मागविले त्यापैकी उस्मानाबाद येथील विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्ताराचे काम सन २००९ मध्ये मे.सुभाष देशमुख ॲण्ड कंपनी, सोलापूर यांना काम देण्यात आले. ज्याचे मूल्य रु.७२.५३ लाख होते व ते या विनंती प्रस्तावामध्ये समाविष्ट नव्हते मे.सुभाष देशमुख आणि कंपनीच्या कंत्राटदारास माहे सप्टेंबर,२००९ मध्ये प्रथम चालू देयकापोटी रु.५३.१७ लाख देण्यात आले उर्वरित रक्कम रु.१९.३६ लाख देणे बाकी होते. **वास्तविक पहाता विनंती प्रस्तावाच्या व कराराच्या अटींप्रमाणे विमानतळाच्या "जसे आहे तसे" या तत्वावर अस्तित्वात असलेल्या मालमत्ता व चालू असलेल्या कामाचा समावेश होता तथापि, महामंडळाने विनंती प्रस्तावानुसार आवश्यक नसलेले रु.७२.५३ लाखाचे धावपट्टी विस्ताराचे काम कार्यान्वित केल्यामुळे मे.रिलायन्स विमानतळ डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड (आरएडीपीएल) यांना अप्रत्यक्षरित्या फायदा झाल्याचे निष्पन्न होत आहे. या प्रकरणी**

दिनांक १९ फेब्रुवारी २००९ रोजी अंतिम निर्णय घेण्यात आला. दिनांक १४ मे २००९ रोजी विनंती प्रस्ताव (आरएफपी) मागविण्यात आला व दिनांक १४ जुलै २००९ रोजी निविदा उघडण्यात आल्या व त्यानुसार महामंडळाचा प्रस्ताव नसताना मे.सुभाष देशमुख ॲन्ड कंपनी सोलापूर, यांना धावपट्टी विस्ताराचे काम देण्याची गरज नव्हती. मे.रिलायन्स कंपनीने लातूर विमानतळाच्या संरक्षण भिंतीच्या खर्चामध्ये उस्मानाबाद विमानतळासाठी झालेला खर्च समायोजन होणार आहे असे लिहून दिले होते. तरीही त्यावेळच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी थोडे तारतम्य पाळून सद्सदविवेकबुद्धीने विचार करून त्या सर्व गोष्टी थांबवायला पाहिजे होत्या किंवा मोबदल्याची अट टाकायला पाहिजे होती. अथवा झालेला खर्च रिलायन्स कंपनीकडून रक्कम वसूल करावयास हवी होती तथापि तसे न करता याकामाबाबत अकारण घाई केली आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. याप्रकरणी कंत्राट व्यवस्थापनामध्ये झालेल्या गंभीर त्रुटीस कारणीभूत असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर आवश्यक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल तसेच यापुढे महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या प्रत्येक कंत्राटामध्ये तांत्रिक त्रुटी निर्माण होऊ नयेत यासाठी संबंधित महामंडळाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी, असे सुचित करण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

सहा - टाळता येण्याजोगा खर्च :- (निविदा शेवटच्या तारखेपूर्वी अंतिमरुप न केल्यामुळे जास्त दराने काम द्यावे लागून रु.६० लाखांचा टाळता येण्याजोगा खर्च झाला).

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००९-१० च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.२० मध्ये **" टाळता येण्याजोगा खर्च "** यासंदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, कुठल्याही कार्यक्षमक कंत्राट व्यवस्थापन प्रणालीत प्राप्त झालेले देकार व प्रस्ताव त्यांच्या अंतिमग्राह्य तारखेपूर्वी स्वीकारणे संघटनेच्या आर्थिक हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक आहे. पुन्हा निविदा बोलविताना जास्त दराचा प्रस्ताव येण्याची भीती तर असतेच, परंतु नियोजित काम पूर्ण करण्यात देखील विलंब होतो. पुन्हा निविदा आमंत्रित करणे टाळण्यासाठी महामंडळाने निविदांचा देकार ग्राह्यता कालावधी १८० दिवस ठेवण्याविषयी परिपत्रक जारी केले (१७ जून २००४) आहे.

महामंडळाने यवतमाळ औद्योगिक वसाहतीमधील अंतर्गत रस्त्यांवर ५०० एमएम जाड बीएम आणि २५ एमएम जाड एसडीबीसी* प्रक्रिया करण्याचा अंदाज रु. १.१६ कोटी खर्चाच्या कामासाठी निविदा आमंत्रित केल्या (जुलै २००६). सर्व चारही** ठेकेदारांच्या आर्थिक स्थितीशी संबंधित करंट क्विक रेशिओ निर्धारित टक्क्यांच्या खाली असल्याने ते ठेकेदार पात्र ठरले नाहीत व सर्व निविदा नाकारण्यात आल्या. नोव्हेंबर,२००६ मध्ये पुन्हा एकदा निविदा आमंत्रित करण्यात आल्या व त्या १५ फेब्रुवारी, २००७ ला उघडण्यात आल्या निविदेस तीन ठेकेदारांनी प्रस्ताव देऊन प्रतिसाद दिला (ह्यातील एक) जोडून उरलेल्या ठेकेदारांनी जुलै २००६ मध्ये आमंत्रित केलेल्या निविदांमध्ये पण भाग घेतला होता व आर.बी. कंस्ट्रक्शन यांनी प्रस्तुत केलेला रु. १.५६ कोटींचा (अनुमानित किंमतीपेक्षा ३४.५८ टक्के अधिक) देकार न्यूनतम निघाला. परंतु महामंडळाच्या

उच्च कार्यालयाच्या पातळीवर निविदा अंतिम करण्यात दिरंगाई झाली. परंतु विलंबाची कारणे कागदोपत्री नमूद केलेली आढळत नाहीत. महामंडळाची देकाराचा विधीग्राह्यता कालावधी वाढविण्याची विनंती (जुलै २००७) न्यूनतम निविदाकाराने मान्य केली नाही (ऑगस्ट,२००७). अंतिमग्राह्यता तारखेपूर्वी निविदांचे अंतिमकरण करता न आल्यामुळे तिसऱ्या वेळी सप्टेंबर,२००७ मध्ये कामाच्या कार्यकक्षेत काहीही बदल न करता पुन्हा एकदा निविदा बोलविल्या. यावेळी फक्त दोन निविदाकारांनी प्रतिसाद दिला (चिद्दरवार कंस्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट मर्यादित व आर.बी.कंस्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट मर्यादित) न्युनतम देकार देऊ केलेल्या चिद्दरवार कंस्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट मर्यादितस रु.२.१६ कोटीस (अंदाजित किंमतीपेक्षा ८६.७७ टक्के अधिक) देण्यात आले. या संस्थेचा क्विक रेशिओ*** आवश्यक असलेल्या १.१० ऐवजी १.०८ होता. याच संस्थेने २००६ मध्ये दिलेला देकार क्विक रेशिओ १.१० च्या खाली असल्याच्या कारणाने नाकारण्यात आला होता. यावेळी मात्र महामंडळाने क्विक रेशिओ केवळ थोडा फरकाने कमी असल्याचे सांगून या संस्थेने दिलेला देकार स्विकारला होता.

अशाप्रकारे अंतिमग्राह्यता तारखेपूर्वी निविदांना अंतिमकरण न देणे आणि त्यानंतर फेरनिविदा बोलावून जास्त दराने ठेका दिल्याने टाळता येण्याजोगा रु. ६० लाखाचा खर्च झाला. यावरुन महामंडळाच्या सर्वोत्तम आर्थिक हितासाठी निविदा अंतिमग्राह्यता तारखेपूर्वी अंतिमकरण करण्यात आलेल्या अपयशावरुन यासंबंधीच्या सूचनांचे पालन होत नसल्याचे दिसून येते.

व्यवस्थापनाने आपल्या उत्तरात (ऑगस्ट, २०१०) ज्यास शासनाने सहमती दर्शविली होती, म्हटले होते की, दुसऱ्या वेळी निविदा रद्द केल्या कारण अंतिमग्राह्यता कालावधी वाढवून देण्यासाठी न्युनतम निविदाकाराने काही अटी घातल्या होत्या, ३४.५८ टक्क्यांचा देकार व्यवहार्य नव्हता कारण कामाचा मुख्य घटक असलेल्या डांबराच्या किंमती वाढत होत्या व जर त्या निविदाकाराला ठेका दिला असता तर निर्धारित वेळेत आवश्यक त्या दर्जाचे काम करून घेणे कठीण झाले असते.

व्यवस्थापनाने दिलेले उत्तर पश्चातबुद्धीचे व विसंगती युक्त आहे व डांबराच्या किंमतीत वाढ झाल्यास निविदेमध्ये दरबदलाची तरतूद करण्यात आली होती जेणेकरून डांबराच्या किंमतीत वाढ झाल्यास कंत्राटदाराला योग्य ती वाढ करून देता येत होती. निविदा प्राप्त झाल्याबरोबर १८० दिवसांच्या ग्राह्यता कालावधीत जर महामंडळाने निविदांना अंतिमरुप दिले असते तर कमीत कमी दरात काम करून घेता आले असते.

म्हणून शिफारस करण्यात येते की, संघटनेचे आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी कंत्राट व्यवस्थापनाची योग्य ती प्रणाली विकसित करावी. निर्णय प्रक्रियेत दिरंगाई झाल्यास त्याबद्दल सर्व पातळ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी यंत्रणा विकसित करावी.

---

* सेमी डिव्हाईस बीटूमिनस कम्पाऊंड

** चिद्दरवार कंस्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट मर्यादित, जसवंतसिंग ओबेरॉय, आर.बी.कंस्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट मर्यादित व साई कंस्ट्रक्शन.

*** चालूमत्ता वजा मालसाठा जलद मत्ता दर्शवितात यांना चालू मत्ताने भागल्यास तो जलद गुणोत्तर (क्विकरेशो) दर्शवितो जो ताबडतोब सॉलव्हन्सी व वित्तीय ताकद दर्शविते.

६.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, अंकेरक्षणातील मुद्दे मान्य आहेत व सदर बाबींची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :

- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, मुंबई यांचे परिपत्रक क्र. ५४, दि. २९/१२/२००६ नुसार निविदा प्रक्रियेचे कालावधी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

I.	कार्यकारी अभियंता	. .	७ दिवस
II.	अधीक्षक अभियंता	. .	१० दिवस
III.	मुख्य अभियंता	. .	१० दिवस
IV.	मुख्य लेखा अधिकारी	. .	१० दिवस

- निविदा प्रक्रियेचे कालावधी कटाक्षाने पाळण्यात येईल.
- उत्तराहर्ततेची मर्यादा रु. ५०.०० लाख ऐवजी रु. ३.०० कोटी करण्यात आली असून, त्यामुळे विलंब टाळता येईल.
- उत्तराहर्ततेचा निर्णय अधीक्षक अभियंता यांचे स्तरावरच घेण्यात येईल.
- वरील कार्यवाहीमुळे निविदा प्रक्रियेतील कालावधी कमी होऊन विहित मुदतीत निविदेबाबतचा निर्णय घेता येईल.

६.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, सदर बाब महामंडळाच्या अखत्यारितील असल्यामुळे विभागाचे भाष्य नाही.

६.४ समितीला उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २६ एप्रिल,२०१६ रोजी उद्योग विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद क्र. ३.२० "टाळता येण्याजोगा खर्च" याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात निविदा शेवटच्या तारखेपूर्वी अंतिमरुप न केल्यामुळे उशीर झाला म्हणून पुन्हा निविदा बोलविताना त्याची किंमत वाढून गेली. जवळजवळ ८६ टक्के काम करावे लागले. निविदा वेळेवर फायनल करून दिली असती तर हा खटाटोप वाचला असता व निविदा काढल्यानंतर अंतिमरुप न करण्याची कारणे काय होती, अशी विचारणा समितीने केली असता, त्यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी निविदेला अंतिम मान्यता न मिळाल्याने सुरूवातीला जी १ कोटी ५६ लाखांची निविदा होती. ती शेवटी २.१६ लाखांची निविदा काढून द्यावे लागली. त्यावेळेस विधीग्राह्यता (व्हॅलिडिटी) उपलब्ध झाली नाही. चर्चेमध्ये नस्ती परत आल्यानंतर पुन्हा निविदा काढण्यात आली. यामध्ये पहिल्या बोलीला प्रतिसाद मिळाला नाही म्हणून दुसरी बोली काढण्यात आली. दुसऱ्या बोलीमध्ये निविदा काढल्यानंतरची विधीग्राह्यता दिनांक

१४.८.२००७ पर्यंत होती. त्यानंतर ही सर्व प्रक्रिया पूर्ण करुन सक्षम अधिकाऱ्यांकडे दिनांक ८.५.२००७ रोजी म्हणजे जवळपास विधीग्राह्यता संपायच्या तीन महिने आधी जमा करण्यात आले होते. परंतु याला मान्यता न मिळाल्याने सदर निविदा व्यपगत झाली. त्यानंतर पुन्हा कालावधी वाढवून देण्याबाबत निविदाधारकास विचारणा करण्यात आली. परंतु त्याने तारीख वाढवून न दिल्याने सदर निविदा रद्द झाली. असा समितीस खुलासा केला.

६.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.२० " टाळता येण्याजोगा खर्च " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली साक्षीच्या वेळी असे निदर्शनास आले की, निविदेचे शेवटच्या तारखेपूर्वी अंतिमरुप न झाल्यामुळे **यवतमाळ औद्योगिक वसाहतीतील अंतर्गत रस्त्यावर ५०० एमएम जाड बीएम आणि २५ एमएम एसडिबीसी प्रक्रिया करण्याकामी अंदाजित रु. १.१६ कोटी एवढ्या कामासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने निविदा मागविल्या होत्या. तथापि चारही ठेकेदारांच्या आर्थिक स्थितीशी संबंधित करंट क्विक रेशिओ निर्धारित टक्क्याच्या खाली असल्याने ते ठेकेदार अपात्र ठरले सबब, रु.१.५८ कोटीची मे.आर.बी. कन्स्ट्रक्शन या ठेकेदाराची निविदा न्युनतम ठरल्याने ती मान्य करण्यात आली तथापि तिचे अंतिमीकरण करतांना त्यात दिरंगाई झाल्याने रु १ कोटी ५६ लाख या निविदा वाटून ती रु.२.१६ कोटी पर्यत पोहोचली व त्यामुळे महामंडळास ६० लाख रुपये जास्त भरावे लागले. याची जबाबदारी तत्कालिन अधिकाऱ्याची आहे असे समितीचे मत आहे कारण सहा महिन्याच्या कालावधीमध्ये विधीग्राह्यता होऊन निविदेचे अंतिमरुप तयार होणे आवश्यक होते तथापी तसे झाले नाही व यासंदर्भात समितीस याबाबत समाधानकारक खुलासाही प्राप्त झाला नाही. निविदा स्वीकृतीचे रु ३ कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या अधिकार हे एमआयडीसीच्या मुख्य अभियंता यांना देण्यात आलेले आहेत. व त्यावरील रखमेच्या सर्व निविदा एमआयडीसीच्या अध्यक्षांकडे मंजूरीसाठी दिल्या जातात. आधी एक कोटी रुपयांपर्यंतच्या निविदा एमआयडीसीच्या अध्यक्षांकडे पाठविल्या जायच्या. आता त्यात सुधारणा करून रु. ३ कोटी पेक्षा जास्त रकमेच्या निविदा अंतिम मंजूरीसाठी एमआयडीसी अध्यक्षांकडे पाठविल्या जातात, त्यामुळे ३ कोटी रुपयापर्यंतच्या सर्व निविदा व्यवस्थित विधीग्राह्यता तपासून विहित कालावधीत पाठविणे आवश्यक आहे तसेच यापुढे महामंडळाचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कंत्राट व्यवस्थापनाची योग्य ती प्रणाली विकसित करावी. व निर्धारित वेळेत दर्जेदार काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांच्या आंत सादर करण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.**

" महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित "

(सन- २०१०-२०११)

सात - अपुरे अंतर्गत नियंत्रण :- (अपुरे व अपर्याप्त अंतर्गत नियंत्रणामुळे बियाण्यांच्या विक्रीमध्ये कंपनीची रु. १.२४ कोटी इतकी वसुली झाली नाही).

७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-११ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१२- मध्ये **" अपुरे अंतर्गत नियंत्रण "** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (कंपनी), अकोला तर्फे राज्यात कृषीसाठी बियाण्यांची विक्री विक्रेत्यांमार्फत केली जाते. कंपनीच्या धोरणानुसार कंपनीने "कॅश ॲण्ड कॅरी" तत्वावर विक्री करावयाची होती ज्यामध्ये विक्रेत्यांना मालाची उचल करु देण्याअगोदर पूर्ण रोकड प्राप्त करावयाची होती.

आमच्या असे निदर्शनास आले (मे,२०१०) की, कंपनीने बियाण्यांची पूर्ण रक्कम वसूल न करता विक्रेत्यांना सन २००७-०८ ते २०१०-११ या कालावधीमध्ये कंपनीच्या ऋणकोकडून येणारे देय रु. ६.१४ कोटी ते रु.१८.५८ कोटी इतके होते. शिवाय ३१ मार्च,२०११ रोजी संपलेल्या वर्षासाठी कंपनीचे रु.२.७१ कोटीचे अदत्त ऋणको सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी होते व त्यामधील रु.१.२४ कोटी ऋणकोंची कंपनीने शंकास्पद ऋण म्हणून धरले होते. कंपनीकडे बॅक गॅरंटी, मालमत्ता गहाण, भरणा करण्यात विलंब झाल्यास दंडरुप व्याजाची वसुली इ.सारखे पर्याय वापरुन पर्याप्त अनामत जमा ठेवण्याची पद्धत अस्तित्वात नव्हती व त्यामुळे देयांची वसुली झाली नाही.

एका विक्रेत्याकडून (गोविंद कृषी विकास केंद्र, यवतमाळ) पुरवठा केलेल्या सोयाबीन बियाणासाठी रु.१७.६७ लाखांची वसुली होऊ शकली नाही कारण त्या विक्रेत्याचे धनादेश अनादृत झाले. कंपनीने विक्रेत्याविरुद्ध दाखल केलेला दावा निष्कासित करण्यात आला (जून,२००७) कारण कंपनीला हे स्थापित करण्यात अपयश आले की, ते धनादेश कुठल्याही वैध ऋणापोटी होते व वास्तवात हा माल विक्रेत्यांकडे पोहोचला कारण विक्रेत्याचा कोड, वाहतूक पावती क्रमांक व ऑर्डर संदर्भ क्रमांक यावर विक्रेत्याची सही नव्हती.

आम्हाला असे आढळले की, १० प्रकरणा (जोडपत्र ११) मध्ये कंपनीने रु.१९.३३ लाखांच्या डिक्री मिळविल्या (ऑक्टोबर,१९९० ते एप्रिल,२००२) होत्या, परंतु त्या काही व्यापाऱ्यांच्या नादारी तसेच काहींचा माग न लागल्यामुळे कंपनीला वसूल करता आल्या नाहीत. शिवाय ह्या रकमा वसूल होण्याची शक्यता फार तुरळक असल्याने निर्लेखित करावयाला हव्या होत्या परंतु त्या सध्याही वसुली योग्य दाखविण्यात येत आहेत.

व्यवस्थापनाने अंतर्गत नियंत्रणामध्ये अक्षमता असल्याचे मान्य केले (मे,२०११) व यंत्रणेचे बळकटीकरण करण्यासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. व्यवस्थापनाने पुढे असेही म्हटले की, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची सुरूवात केली आहे. शासनाने या उत्तरास सहमती दर्शवली (ऑक्टोबर,२०११).

७.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, महामंडळाकडून "कॅश ॲण्ड कॅरी" या धोरणाची अंमलबजावणी होऊ शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. बियाणे व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणावर होत असलेली उलाढाल व दूरदृष्टीचे धोरण लक्षात घेता अशी पद्धत अवलंबविणे महामंडळाला कठीण जाते. बियाणे व्यवसायामध्ये सुरक्षा रक्कमेच्या स्वरुपात बँक गॅरंटी स्वीकारण्याची पद्धत काहीशी अडचणीची आहे. तरी पण महामंडळाचे उधारीवरील विक्रीवर संपूर्ण लक्ष असते हे खालील दिलेल्या आकडेवारीवरुन लक्षात येते :

- मागील १० वर्षाची वित्तीय उलाढाल रु. २,४६,६१० लाख (आर्थिक वर्ष २००१-०२ ते २०१०-११)
- एकूण वसुली संशयास्पद असलेले,

अ. संशयास्पद अधमर्ण राईट ऑफ	रु. २६.३९ लाख
ब. तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीचे अधमर्ण	रु. ९९.०० लाख
	एकूण रु. १२५.३९ लाख

- एकूण उलाढालीची वसूली संशयास्पद असलेले रु. ०.०५ टक्के

उपरोक्त आकडेवारीवरुन लक्षात येईल की मागील १० वर्षामध्ये कंपनीने एकूण रु. २,४६,६१० लक्ष रुपयाची विक्री केली आहे आणि या विक्री रक्कमेपैकी रु. १२५.३९ लाख एवढी रक्कम वसुली संशयास्पद असलेली आहे. एकंदर उलाढालीशी अशुद्ध व वसुली योग्य नसलेल्या रक्कमेशी तुलना करता हे प्रमाण नगण्य आहे.

उशिरा प्राप्त झालेल्या रक्कमेवर व्याजाची आकारणी केली जात नाही हे खरे नाही. महामंडळ उशिरा प्राप्त झालेल्या रक्कमेवर व्याजाची आकारणी करीत असते. खरीपच्या उधारीची भरणा करावयाची शेवटची तारीख दिनांक ३१ ऑगस्ट व रब्बीची २८ फेब्रुवारी असते. या ठरलेल्या तारखेनंतर विक्रेत्यांकडून आलेल्या रक्कमेवर व्याजाची आकारणी केली जाते.

मे. गोविंद कृषी सेवा केंद्र, उमरखेड या केसमध्ये महामंडळाने कलम १३८ अंतर्गत चेक अनादर झाल्याबद्दल केस दाखल केली होती. परंतु सदर दिलेला धनादेश न्यायिक उधारीचा नसल्यामुळे केस खारीज झाली. वस्तुतः महामंडळाने बियाण्यांचा पुरवठा मालाच्या जावक प्रतच्या तारखेनुसार केलेला आहे व या बियाण्यांच्या विक्री बद्दलच सदर धनादेश प्राप्त झाला तरी काही तांत्रिक त्रुटीमुळे कोर्टाने प्रतिवादीच्या बाजूने निकाल दिला. प्रतिवादीने बियाण्याच्या प्राप्तीबद्दल केव्हाही नकार दिलेला नाही. प्रतिवादीला बियाणे पाठविले गेले, प्रत्यक्ष बियाणे घेतले गेले व प्रतिवादीकडून पोचसुद्धा प्राप्त झाली. महामंडळाने संबंधित विक्रेत्यावर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे.

१० पार्टीच्या केसमध्ये महामंडळाने रुपये १९.३३ लाख रुपयाच्या वसुलीची न्यायालयीन डिक्री प्राप्त झाली आहे. परंतु सदर पार्टीचे दिवाळे निघाल्यामुळे किंवा अस्तित्त्वात नसल्यामुळे ह्या रक्कमेची वसुली पार्टीकडून

होऊ शकली नाही. महामंडळ सदर रक्कम लेख्यामध्ये सुचित केल्यानुसार वैधानिक मत प्राप्त केल्यानंतर यांचे खाते बंद (राईट ऑफ) करण्यात येतील.

श्री.डी. बी. बोबडे, जिल्हा व्यवस्थापक, यवतमाळ यांचेविरुद्ध विभागीय चौकशी नेमण्यात आली होती. चौकशी अहवालानुसार संबंधित व्यक्तीला दोषी ठरवून या रक्कमेची वसुली करण्याचे ठरविण्यात आले (प्रत सोबत संलग्न करण्यात आली आहे.)

महामंडळाचा स्वतःचे अंतर्गत लेखापरिक्षण विभाग आहे व या विभागाकडून जिल्हा कार्यालयातील सर्व कार्याचे जसे झालेली विक्री, बियाण्यांचे मात्रा लेखे, विक्रेत्याकडे बाकी राहिलेल्या रक्कमेवरील व्याज इ. बाबींचा अंकेक्षण केले जाते. याशिवाय वैधानिक लेखा परिक्षकाकडून सध्याच्या अंतर्गत नियंत्रण पद्धतीचे परिक्षण करून त्यांच्या अहवालामध्ये नोंद घेतली जाते.

वरील सर्व बाबींचा व आकडेवारीचा विचार करता महामंडळाच्या मालाची जावक, त्याची देयके व वसुलीवर योग्यप्रकारचे अंतर्गत नियंत्रण आहे. एखाद्या विशिष्ट व्यवहारावरुन महामंडळाचे अंतर्गत नियंत्रण पद्धत अस्तित्त्वात नाही असे ठरविले जाऊ शकत नाही. व्यवस्थापनाचे उधारीच्या विक्रीवर संपूर्णतः लक्ष असते.

तरी विनंती करण्यात येते की, भारताचे महालेखापाल व लेखा परिक्षक यांच्या सन २०१०-११ च्या अंकेक्षण अहवालातून सदरहू आढावा / परिच्छेद क्रमांक वगळण्यात यावा.

७.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

७.४ समितीला कृषी विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १८ मे,२०१६ रोजी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादितचे महाव्यवस्थापक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद क्र. ३.१२ "अपुरे अंतर्गत नियंत्रण" याबाबत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली की, बियाणे पुरवठा करण्याबाबत महामंडळाची पॉलिसी काय आहे, बियाणांच्या विक्रीतून महामंडळाचा किती नफा होतो, बियाणे तालुका व जिल्हा पातळीवर विक्री करण्यासाठी महामंडळाकडून डिलरची नेमणूक कशा प्रकारे करण्यात येते, त्यासाठी जाहिरात देण्यात येते काय, आपण डिलर नियुक्त करताना त्याची कपॅसिटी पाहत असाल तर गोविंद नावाच्या कंपनीमुळे महामंडळाचे नुकसान झाले त्याचे कारण काय,

यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, महामंडळामार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये बियाण्यांचा पुरवठा करण्यात येतो. राज्यामध्ये बियाण्यांचा पुरवठा करणारे महामंडळाचे १,३५५ डिलर असून त्यांच्या माध्यमातून जवळपास १० लाख क्विंटल बियाण्यांची विक्री करण्यात येते. महामंडळाचा टर्नओव्हर जवळपास ५५० कोटी रुपयांचा असून जवळपास ४० कोटी रुपये बियाणे विक्रीतून नफा मिळतो. ज्या भागामध्ये विक्रेते

(प्रझेंस) नाही त्याकरिता महामंडळाकडे प्रस्ताव आला तर त्यावर विचार करण्यात येतो. राज्यात जवळपास सर्वत्र महामंडळाने बियाणे विक्रीसाठी डिलरची नियुक्ती केली असून जर कोणी डिलरशीपसाठी मागणी केली तर त्यावर विचार करण्यात येतो त्याकरिता जाहिरात देण्यात येत नाही. गोविंद नावाची पार्टी ही यवतमाळ जिल्ह्यातील आहे. एखादी पार्टी नुकसानीत गेली, व्यवसाय बंद केला असे प्रकार घडले तरच महामंडळाचे पैसे अडकतात. मागील १० वर्षांच्या कालावधीमध्ये महामंडळाने जवळपास अडीच हजार कोटी रुपयांचा टर्नओव्हर केला असून आऊट स्टँडींग अमाऊंट १ कोटी २५ लाख रुपये आहे.

यावर समितीने विचारणा केली की, रोख विक्री (कॅश ॲण्ड कॅरी) योजना गोविंद कंपनीसाठी महामंडळाने वापरली नाही का, त्यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, महामंडळाने " कॅश ॲण्ड कॅरी " ही पॉलिसी जवळपास ३०-३५ वर्षापूर्वी स्वीकारलेली आहे. त्यावेळी बाजारामध्ये बियाणे विक्री करणाऱ्या ४-५ कंपन्या होत्या. मागील १५ वर्षांच्या कालावधीमध्ये बियाणे निर्मिती करणाऱ्या कंपन्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. तसेच अनेक मल्टीनॅशनल कंपन्या बियाण्यांच्या व्यवसायामध्ये उतरलेल्या आहेत. त्यामुळे आजमितीस एकही कंपनी रोख विक्री (कॅश ॲण्ड कॅरी) धोरणाप्रमाणे व्यवसाय करीत नाही त्यामुळे सदरहू बाब महामंडळासही शक्य नाही. कारण बाजारामध्ये अनेक कंपन्या उतरलेल्या असल्याने स्पर्धा वाढली. अशा परिस्थितीत महामंडळाने जर कॅश ॲण्ड कॅरी पॉलिसीप्रमाणे बियाणे पुरवठा केला तर शेतकऱ्यांपर्यंत बियाणे पोहोचणार नाही. यावर समितीने विचारले की, महामंडळामार्फत तळागाळातील शेतकऱ्यापर्यंत बियाण्यांचा पुरवठा करण्यात येतो. काही गावातील अनेक बियाणे विक्रीच्या दुकानावर महाबीज बियाण्यांचा बोर्ड लावण्यात येतो व त्यांच्याकडून महाबीजचे डुप्लीकेट बियाणे व खते विक्री करण्यात येते. महाबीज बियाणे पुरवठादारावर महामंडळाचे नियंत्रण आहे काय,

याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, होय, डिलरशीप देण्याकरिताचा प्रस्ताव निकषानुसार जिल्हास्तरावरुन विभागीय स्तरावर व तेथून मुख्यालयाकडे पाठविण्यात येत असतो. सर्व बाबींचे पालन करूनच डिलर नियुक्त करण्यात येतो. एखाद्या डिलरने त्याचा व्यवसाय बंद केला, तो मृत झाला, व्यवसायामध्ये नुकसान झाले तरच महामंडळाचे पैसे आतापर्यंत बुडाले आहेत. महाबीजचे बनावट बियाणे विक्री प्रकरणी महाबीजकडून कारवाई करण्यात येत नाही. परंतु अशा प्रकरणी नमुने तपासणीस पाठवून त्यामध्ये डुप्लीकेटपणा आढळला तर गुन्हे दाखल करून शासनस्तरावरुन त्यावर नियंत्रण ठेवण्यात येते. यावर समितीने विचारले की, रोख विक्री (कॅश ॲण्ड कॅरी) योजनेत बदल करण्याबाबत महामंडळाने शासनास कळविले आहे काय तसेच विभागाने सदर पॉलिसी बोर्डाकडून चेंज करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यासाठी काही तरी चेक्स आणि बॅलन्स ठेवावा लागणार आहे. आपण सुरक्षा अनामत आणि बँक हमी घेत नाही. परंतु, १०० टक्के मालाची निर्यात केली जाते.

यावर विभागीय प्रतिनिधींनी व महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, रोख विक्री (कॅश ॲन्ड कॅरी) या धोरणाबाबत निर्णय मंडळाच्या पातळीवर होत असतो. मंडळाच्या धोरणानुसार रोख विक्री (कॅश ॲण्ड

कॅरी) पद्धतीनुसार विक्री केली जाते. व्यवहाराचा भाग म्हणून ते प्रत्यक्षात नाही. त्यामध्ये पूर्णपणे यश मिळत नाही. रोख विक्रीवर (कॅश ॲण्ड कॅरीवर) आधारित स्वाधिन (डिलिव्हरी) केली जाते. पक्ष नियुक्ती (पार्टी अपॉईंट) करीत असताना आपण त्यांच्याकडून तीन कोरे धनादेश घेत असतो. सुरक्षा अनामत (सिक्युरिटी डिपॉझिट) म्हणून २५ हजार रुपयाची रक्कम घेतली जाते. या व्यतिरिक्त डिसेंबर महिन्यात प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्येक विक्रेत्याकडून २० टक्के आगाऊ रक्कम घेऊन नोंदणी केली जाते. २० टक्के रकमेच्या आधारे प्लेसमेंटचा प्लॅन तयार केला जातो. जिल्ह्याच्या ठिकाणच्या कार्यालयातून खेडेगावापर्यंत बियाणे पैसे घेऊन पाठवायचे म्हटले तर ते प्रत्यक्षात होत नाही.

यावर समितीने विचारले की, आपल्या महामंडळाला ४० कोटी रुपयाचा नफा झालेला आहे. असे असेल तर आपण उत्पादन क्षमता यंत्रणा वाढविली पाहिजे. महाबीज हे शासनाचे आहे. ते लोकांना पसंत आहे. महाराष्ट्रात खाजगी लोकांचे जे वर्चस्व आहे, ते बंद होण्यासाठी महामंडळाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, महामंडळाकडून बाजारात ६ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध करुन दिले जाते. यापैकी ९० टक्के बियाणांचे सेल होते आणि १० टक्के बियाणे शिल्लक राहते. महामंडळ यासंदर्भात खूप काटेकारपणे नियोजन करीत असते. असे असले तरी थोडेफार बियाणे शिल्लक राहते. कारण सर्व बियाणे विकणे शक्य होत नाही. हायब्रीड मका आणि बीटी कॉटनमध्ये जास्तीत जास्त फायदा होत असतो. अशा प्रकारचे पीक घेण्याचा प्रयत्न केला जातो. बोर्डाच्या मदतीने काही सुविधा घेण्याचा प्रयत्न करीत असतो.

यावर समितीने विचारणा केली की, १० पार्टीकडून १९.३३ करोड रुपये येण्याचे अपेक्षित होते. महामंडळाने अकाऊंट बंद करुन टाकलेले आहे. त्यावेळी श्री. बोबडे हे जिल्हा व्यवस्थापक म्हणून काम करीत होते. त्यांच्या विरोधात महामंडळाने गुन्हा दाखल केलेला आहे. या प्रकरणात पुढे काय निष्पन्न झालेले आहे, महाबीज ही कॉर्पोरेशन आहे. शासनाने त्यास शेअर कॅपिटल दिले आहे की, महामंडळावर अवलंबून असते.

यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, संबंधितांच्या विरोधात दोन प्रकारच्या केसेस दाखल केलेल्या आहेत. पहिल्या प्रथम जबाबदार अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करुन विभागीय कारवाई केलेली आहे. टोटल लॉस झालेला असून, त्याचा लेव्ही केलेला आहे. दुसरी केस फर्मच्या विरोधात दाखल केली होती. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने माननीय उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्याने असे सांगितले की, तुम्ही माझ्याकडून सर्व वसुली केलेली आहे. परंतु, त्याच्या अगेन्स्ट कंपनीच्या विरोधात केस सुरु आहे. त्याने सांगितले होते की, एकच रक्कम दोघांकडून कशी वसूल केली जाऊ शकते. त्याने पैसे परत करण्याबाबत ऑर्डर केली होती. पार्टीच्या विरोधात डिक्री पास झाली आणि माननीय उच्च न्यायालयाने त्यांच्याकडून पैसे वसूल करा अशा प्रकारचे म्हणणे ऐकून घेतले होते. त्याने पुन्हा कोर्टाच्या विरोधात माननीय उच्च न्यायालयात धाव घेतली. सद्यःस्थितीत माननीय उच्च न्यायालयात केस सुरु आहे. दरम्यान जिल्हा कोर्टात दावा मंजूर झाला होता, त्याची वसुलीची दरखास्त आपण दाखल केली होती आणि ती केस सुरु असून, प्रोग्रेसमध्ये आहे.

यामध्ये दोन शेतकरी प्रतिनिधी असतात. हे निवडणुक प्रक्रियेतून निवडून येतात. रिक्त पदावर अशासकीय सदस्याची शासनाकडून नेमणूक करणे अभिप्रेत असते. सद्य:स्थितीत ४ पदे रिक्त आहेत. दोन सदस्य बीजोत्पादकाची आहेत.

७.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.१२ "अपुरे अंतर्गत नियंत्रण" या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता **समितीने अशी शिफारस केली की, विक्रेता (डिलर) म्हणून एखाद्या पक्षाची (पार्टी) नियुक्ती करीत असताना त्या पक्षाकडून २५ हजार रुपयांऐवजी १ लाख रुपयांची अनामत रक्कम घेण्यात यावी. संबंधित विक्रेत्याकडून (डिलर) बनावट बियाणे विक्री होणार नाही अथवा बियाण्यामध्ये भेसळ होणार नाही असे शपथपत्र घ्यावे तसेच ते घेत असताना त्यामध्ये असे देखील नमूद करण्यात यावे की बनावट अथवा भेसळ युक्त बियाणे विक्री करताना आढळल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.**

तसेच महाबिज हे शासनाचे महामंडळ आहे. जिल्ह्यात, तालुक्यात आणि खेड्या-पाड्यात महाबीजचेच चांगल्या प्रतीचे बीज पोहचले पाहिजे आणि त्याचा फायदा सर्व सामान्य शेतकऱ्यांना होण्यासाठी महामंडळाने प्रयत्न केले पाहिजे. महामंडळाने उत्पादन क्षमता वाढविणे अतिशय गरजेचे आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी ऐन हंगामाच्या कालावधीत बियाण्यांची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर असते. विभागनिहाय जमिनीची पोत कशाप्रकारे आहे आणि त्या ठिकाणी कोणते पिक व बियाणे घेतले जाऊ शकते याचा महामंडळाने सर्वंकष अभ्यास केला पाहिजे. त्यादृष्टीने शेतकऱ्यांचे भरघोस उत्पादन वाढून आर्थिक फायदा होण्याच्या दृष्टीकोनातून महामंडळाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे अशी समिती शिफारस करीत आहे. तसेच ज्याप्रमाणे खाजगी कंपन्या व्यवसाय करताना त्यांचे प्रतिनिधी पाठवित असतात आणि त्या जिल्ह्यातील मालाची प्रतवारी व गुणवत्ता आहे याची तपासणी केली जाते आणि त्यानंतर त्याची खरेदी केली जाते त्यानुसार आपल्या महामंडळाचे प्रतिनिधीनीदेखील त्या ठिकाणी जाऊन मालाची प्रतवारी व गुणवत्ता तपासणी करून खात्री केली पाहिजे, महाराष्ट्रात बियाण्याचा व्यवसाय जवळपास ८००० कोटी रुपये असून महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची वार्षिक उलाढाल केवळ ५०० कोटी रुपयांपर्यंत आहे त्यामुळे बियाण्याचा एकूण व्यवसाय पहात महाबीजचा वाटा खूपकमी असल्याने महाबीजने बियाण्यांची उत्पादन क्षमता वाढवून सदर व्यवसायात वाटा वाढविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादितची मागील १० वर्षातील उलाढाल जवळपास २,५०० कोटी रुपये असून येणे रक्कम रुपये १ कोटी २५ लाख आहे. त्यामुळे सदर महामंडळाची राज्यातील शेतकरी वर्गामध्ये असलेली विश्वासार्हता, बियाण्याची गुणवत्ता व रास्त दर या सर्व बाबींचा विचार करता महामंडळाने आणखी व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून बी-बियाणे निर्मिती क्षमता वाढवावी व इतर खाजगी बियाणे निर्मिती कंपन्यांप्रमाणे व्यवस्थापन कौशल्य व आधुनिक तंत्रज्ञान अवगत करावे. यवतमाळ येथील गोविंद कृषी केंद्र यांच्याकडून महाबीजचे सुमारे १७.६७ लाख रुपये येणे बाकी आहेत. त्याची वसुली करण्यात यावी व यापुढे बियाणे विक्रेत्यांना बियाणे पुरविताना रोख रक्कम जमा केल्यानंतरच पुरवठा करण्यात यावा याकरिता नव्याने निकष

लावावेत जेणेकरून महामंडळाचे आर्थिक नुकसान होणार नाही. असे समितीचे मत आहे. व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

" महिला आर्थिक विकास महामंडळ "

(सन- २०१३-२०१४)

आठ - आयकर परताव्याची मागणी न करणे :- (महिला आर्थिक विकास महामंडळाने आर्थिक वर्ष २००८-०९ ते २०१२-१३ मध्ये बँकेने केलेल्या आयकर वजावटीच्या परताव्याची मागणी केली नाही परिणामत: रु. ३७.८१ लाखाचे नुकसान झाले).

८.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१३-१४ च्या प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.२ मध्ये **"आयकर परताव्याची मागणी न करणे"** यासंदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महिला आर्थिक विकास महामंडळ (कंपनी) कडे असलेला अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकाकडे मुदत ठेवीत (एफडी) गुंतविला जातो. २००८-०९ ते २०१३-१४ या आर्थिक वर्षात कंपनीला या ठेवीवर रु. ३.८८ कोटीचे व्याज मिळाले ज्यामधून बँकेनी रु. ३९.८९ लाखांची (४७) आयकर वजावट (टीडीएस) केली. कंपनी ही नफा न कमावणारी संस्था असल्याने ती आयकर अधिनियम, १९६१, च्या कलम ११ अंतर्गत बँकाकडून मिळालेल्या व्याजावर आयकर प्रदान करण्यापासून मुक्त (एक्झंप्ट) होती.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, (फेब्रुवारी, २०१४) कंपनीने २००८-०९ या वित्तीय वर्षाचे जे आयकर विवरण पत्रक (आयटी रिटर्न) जमा केले त्यांत बँकांनी व्याजावर केलेल्या आयकर वजावटीचे रु. १.६७ लाख परताव्याचा दावा केला नाही. यापुढे, आर्थिक वर्ष २००९-१० व त्यानंतरच्या वर्षांची आयकर विवरण पत्रके अजुनही जमा करावयाची होती (सप्टेंबर, २०१४) आयकर अधिनियम, १९६१ च्या कलम १३९(४) नुसार कंपनीस आयकर विवरण पत्रक संबंधित कर निर्धारण वर्षाच्या समाप्तीपासून एक वर्ष संपायच्या आधी किंवा आयकर विभागाद्वारे कर निर्धारण पूर्ण होण्याआधी यापैकी जे अगोदर असेल त्याप्रमाणे भरण्यास आवश्यक होते. कंपनीने कलम १३९(५) नुसार आयकर विभागाकडून आयकर परतावा मागणीसाठी वित्तीय वर्ष २००८-०९ चे संशोधित आयकर विवरण पत्रक सुद्धा जमा केले नव्हते की, जे संशोधित आयकर विवरण पत्रक संबंधीत कर निर्धारण वर्ष संपल्यापासून एक वर्षाच्या आत किंवा कर निर्धारण पुर्ण होण्याच्या अगोदर यापैकी जे आधी असेल त्याप्रमाणे केव्हाही भरता येवू शकले असते.

अशाप्रकारे, कंपनीने आर्थिक वर्ष २००८-०९ चे संशोधित आयकर विवरण भरण्याची व आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१२-१३ चे आयकर विवरण भरण्याची संधी गमावलेली होती, कारण आयकर परतावा मागणी करण्याची वेळ मर्यादा अगोदरच संपलेली होती. (मार्च,२०१४) परिणामत: कंपनीस रु. ३७.८१ लाखाचे नुकसान झाले.

लेखापरीक्षणाचे आक्षेप स्वीकारतांना व्यवस्थापनाने असे नमूद (सप्टेंबर,२०१४) केले की, त्यांच्या वार्षिक लेख्यांना अतिमरुप देण्याचे काम वेळेत पूर्ण न झाल्यामुळे आयकर विवरण भरली जाऊ शकले नाही. व्यवस्थापनाने पुढे असेही नमूद केले की, आयकर विभागाकडून परतावा मिळविण्यासाठी प्रक्रिया सुरू केलेली आहे. या उत्तराला शासनानेही दुजोरा दिला होता (नोव्हेंबर, २०१४) दिलेले उत्तर स्विकारण्यासारखे नव्हते कारण वेळेत वार्षिक लेखे पूर्ण करणे व आयकर विवरणपत्रक वेळेत भरणे हे व्यवस्थापनाचे कर्तव्य होते. ज्यांचे पालन झालेले नाही. तसेच आर्थिक वर्ष २०१२-१३ पर्यंतची आयकर विवरणपत्रके जमा करण्याची समय मर्यादा अगोदरच संपलेली होती.

८.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, विलंबाने रिटर्न फाईल करण्याबाबतची मुभा मिळण्याकरीता S119 of IT Act १९६१ च्या अंतर्गत माविम बोर्डाकडे अपिल करीत आहे. त्यामुळे माविमला च्क्च क्लेम करता येईल. तसेच माविमचा जो TDS कापण्यात आला आहे. त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यामुळे Dedicator चा रिव्हाईज TDS रिटर्न फाईल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

८.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

८.४ समितीला महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १ मार्च २०१६ रोजी महिला आर्थिक विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी केलेल्या लेखापरीक्षणामधील परिच्छेद क्र. ४.२ मध्ये आयकर अधिनियम, १९६१ च्या कलम ११९ अंतर्गत आयकर विवरण पत्रक (आयटी रिटर्न) जमा करण्यास झालेला विलंबाबाबत समितीने विचारणा केली असता त्याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, २ वर्षांचे लेखे तपासण्यात विलंब झाल्यामुळे आयकर वजावट परतावा दाखल (टिडीएस रिटर्न) फाईल करायला विलंब झाला. त्यावर समितीने विचारले की, आयकर भरताना लेखे पूर्ण न करता तात्पुरत्या लेख्याच्या आधारे आयकर भरता येऊ शकला असता हे खरे आहे काय.

त्याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, महामंडळाकडील आकडेवारी बदलणारी होती त्यामुळे एकदा परतावा सादर केल्यानंतर पुन्हा बदल करण्यापेक्षा महामंडळाच्या सचिवांनी असा सल्ला दिला की, लेखे अंतिमरुप देण्याचे काम सुरू असल्याने ते पूर्ण झाल्यानंतर परतावा सादर केल्यास पुन्हा गुंतागुंत होणार नाही. यावर समितीने विचारले की, महामंडळाने आयकर प्राधिकरणाकडे या संबंधी माहिती घेतलेली आहे काय, त्यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, लेख्यांना अंतिमरुप देण्यात आल्यानंतर या ४-५ वर्षांचे परताव्याचे प्रस्ताव दाखल केले जाणार आहेत कारण प्रत्येक वर्षी अपील करण्यात काही अर्थ नाही. माविम ही ना नफातत्त्वावर चालणारी संस्था आहे. यावर महालेखाकांरानी विचारले की, आता ते दावे मान्य करतील की नाही याबाबतही शंका आहे टीडीएस बाबत माविमने बँकेकडे विचारणा का केली नाही.

याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, बँकेलाही आयकर वजावट परतावा सुधारणा करण्याबाबत पत्र दिले आहे. यावर समितीने विचारले की, बँकेने आयकर वजावट परतावा कापण्यात येऊ नये असे बँकेकडे विचारण्यात आले नाही का, बँकेकडे विहीत नमुन्यामध्ये अर्ज असतात. बँकेला यासंदर्भात माविमला सवलत असल्याचे सांगता येऊ शकले असते. याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, १२ AA फॉर्म बँकेला दिला होता. परंतु, त्यावेळेस नेमका त्यांचा स्टाफ बदलला गेला. नवीन स्टाफला हे माहीत नव्हते. त्यामुळे त्यांनी चुकून आमचा टीडीएस कापला. एकदा टीडीएस कापल्यानंतर आम्हाला रिटर्न शिवाय काही ऑप्शन नाही. यानंतर समितीने असे विचारले की, तुम्ही टीडीएसबाबतचे अपील कोणाकडे केले आहे, कारण ते प्रलंबित दाखविले आहे. यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, आम्हाला ते सीबीडीटीमध्ये करावयाचे आहे. ते केलेले नाही. आता आम्ही वाट पाहत आहोत. कारण हे ३-४ वर्षांचे एकत्र असल्याने प्रत्येक वर्षी नवीन अपील करण्यापेक्षा आम्ही सन २०१५-२०१६ चे सुद्धा स्ट्रिमलाईन करुÿन घेत आहोत. कारण आम्हाला सुदैवाने सन २०१३-२०१४, सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ करिता एकच ऑडिटर सीएजीकडून आलेले आहेत.

यावर समितीने विचारले की, आपण ३ वर्षांचे एकत्र सबमिशन करणार आहात. मात्र आपण प्रत्येक वर्षीच रिटर्नसाठी सबमिट केले तर आपल्याला ती रक्कम मिळेल व ती दुसऱ्या कारणाकरिता वापरता येईल. ३ वर्षे आपण वाट पाहिली तर तोपर्यंत ती रक्कम इन्कमटॅक्सकडे पडून राहील. इन्कमटॅक्स डिपार्टमेंटच्या चुकीमुळे रिफंड देण्यास उशीर लागला तर ते १२ टक्के व्याज देतात. तुमच्याकडून जर चूक झाली तर इंटरेस्ट मिळत नाही. यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, महोदय, रुÿल प्रमाणे प्रत्येक वर्षाला १२ टक्के इंटरेस्ट इन्कमटॅक्स देते. आम्ही सेक्शन ११९ खाली अपील करण्याचा प्रयत्न करुÿ.

८.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ४.२ "आयकर परताव्याची मागणी न करणे" या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी **महिला आर्थिक विकास महामंडळाकडील रक्कम राष्ट्रीयकृत बँकेकडे मुदत ठेवीत (एफडी) गुंतविली जाते. सन २००८ ते २०१४ या आर्थिक वर्षात कंपनीला ठेवीवर रुपये ३.८८ कोटीचे व्याज मिळाले त्यामुळे बँकेने रुपये ३९.८९ लाखाची आयकर वजावट केली, महामंडळाकडून वार्षिक लेख्यांना अंतिमरुप देण्याचे काम वेळेत पूर्ण न झाल्यामुळे आयकर विवरण भरले जाऊ शकले नाही. आयकर वजावट परतावा (टीडीएस) मिळणेसाठी १२ AA हा फार्म बँकेला दिला होता परंतु बँकेचा कर्मचारीवृंद (स्टाफ) बदलला गेला व नवीन कर्मचारीवृंदाला (स्टाफला) हे माहित नसल्यामुळे बँकेने चुकून माविमचा टीडीएस कापला गेला त्यामुळे आयकर परतावा भरण्याशिवाय पर्याय उरला नाही "असा महामंडळाच्या प्रतिनिधींनी केलेला खुलासा अत्यंत बेजबाबदारपणा, ढिसाळ कारभार व गलथानपणा माविमकडून झाल्याचे समितीस दिसून येत आहे माविमकडून झालेल्या या अक्षम्य चुकीमुळे आर्थिक वर्ष २००८-२००९ ते २०१२-**

२०१३ मध्ये आयकर वजावटीची परताव्याची रु. ३७.८१ लाख एवढी रक्कम केवळ आयकर परतावा मागणी करण्याची काल मर्यादा संपल्यामुळे प्राप्त होऊ शकली नाही पर्यायाने माविमचे रु. ३७.८१ लाखाचे नुकसान झाले आहे याप्रकरणी समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली असून विहीत कालावधीत आयकर परतावा मागणी पूर्ण केली असती व माविम या ना- नफातत्वावर चालणाऱ्या महामंडळास सदर रक्कम प्राप्त झाली असती तर त्या रक्कमेचा विनियोग महिला स्वयंसहाय्य बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे विविध उपक्रम व कार्यक्रमांसाठी करता येऊ शकला असता असे समितीचे स्पष्ट मत आहे. कंपनी अधिनियम, १९५६ मधील कलम १६६, २१०, २३०, ६१९ व ६१९-बी नुसार कंपन्यांच्या लेख्यांना प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आंत अंतिमरुप देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सांविधानिक महामंडळांच्या बाबतीत लेख्यांना अंतिमरुप देणे, त्यांचे लेखापरिक्षण व अहवाल विधीमंडळाला सादर करणे त्यांच्या अधिनियमातील तरतूदींनुसार आवश्यक असते. अशी तरतूद असताना लेखे पूर्ण व आयकर विवरण पत्र वेळत भरणे माविमच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक तसेच व्यवस्थापनाचे कर्तव्य आहे. त्याचे पालन झाले नाही त्यामुळे महामंडळाचे आर्थिक नुकसान झाले आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. सदर नुकसान भरपाई भरुन काढण्यासाठी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व महाव्यवस्थापकांवर कोणती दंडात्मक कार्यवाही केली आहे. याबाबतची माहिती समितीस अवगत करण्यात यावी. तसेच यापुढे प्रत्येक वर्षाला महामंडळाचे लेखे विधीमंडळास सादर करण्यात यावेत, अशी समितीची शिफारस आहे.

सबब, समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.

बैठकीचे परिशिष्ट

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक गुरुवार, दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी दुपारी २-०० वाजता, कक्ष क्रमांक १९०१, एकोणिसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

उपस्थिती :

१. डॉ. सुनील देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.
३. श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.
४. श्री. अमित साटम, वि.स.स.
५. श्री. मनोहर भोईर, वि.स.स.
६. श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. म. मु. काज, सह सचिव (२),
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,
(४) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती).

महालेखाकार कार्यालय, मुंबई :

(१) श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार,
(२) श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखापरीक्षक.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्रीमती वल्सा नायर-सिंह, सचिव (सांस्कृतिक कार्य विभाग)
(२) श्री. विलास पाटील, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ.
(३) श्री. संजय पाटील, सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या वाणिज्यिक अहवालातील ''महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ'' यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक १० मे २०१६ रोजी सकाळी ११-३० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख
(२) डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(४) श्री. आकाश फुंडकर, वि.स.स.
(५) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,
(३) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती),

महालेखाकार यांचे कार्यालय, मुंबई :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. अपूर्व चंद्रा, प्रधान सचिव, उद्योग विभाग.
(२) श्री. पी. वाय. टेंभरे, महाव्यवस्थापक (संचलन), महाराष्ट्र राज्य, खनिकर्म महामंडळ, नागपूर,
(३) श्री. सु. ला. भोई, कक्ष अधिकारी, उद्योग विभाग.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या वाणिज्यिक अहवालातील ''महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित'' यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक २ फेब्रुवारी २०१६ रोजी सकाळी ११-३० वाजता, कक्ष क्रमांक २००१, विसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(४) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. राजेश तारवी, उप सचिव

महालेखाकार कार्यालय, मुंबई :

(१) श्रीमती संगीता चौरे,प्रधान महालेखाकार
(२) श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखापरीक्षक.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. शरद बी. लोंढे, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ.
(२) श्री. ए. एस. हांडे, उप महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य, इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ.
(३) श्री. जा. मा. गोसावी, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या वाणिज्यिक अहवालातील ''महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ'' यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय अधिकाऱ्यांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार,दिनांक २४ मे २०१६ रोजी सकाळी ११-३० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख
(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.
(४) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(५) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.
(६) श्री. आकाश फुंडकर, वि.स.स.
(७) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.
(८) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(९) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

महालेखाकार कार्यालय, मुंबई :

(१) श्री. रवीकिरण उबाळे, उप महालेखाकार
(२) श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग
(२) श्री. शरद बा. लोंढे, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग महामंडळ
(३) श्री. जा. मा. गोसावी, सह सचिव, सामाजिक न्याय विभाग
(४) श्री. ए. एस. हांडे, लेखा अधिकारी

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या वाणिज्यिक अहवालातील ''महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ'' यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक २६ एप्रिल २०१६ रोजी सकाळी ११-३० वाजता, कक्ष क्रमांक १९०१, एकोणिसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुनील देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. अशोक उईके, वि.स.स.

(३) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

(४) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

महालेखाकार कार्यालय, मुंबई :

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार

(२) श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखापरीक्षक.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. अपूर्व चंद्रा, प्रधान सचिव, उद्योग विभाग

(२) श्री. भूषण गगराणी, मुख्य कार्यकारी अधिकारी, एम.आय.डी.सी.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००९-२०१० च्या वाणिज्यिक अहवालातील ''महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ'' यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार,दिनांक १८ मे २०१६ रोजी दुपारी २-०० वाजता, कक्ष क्रमांक १९०१, एकोणिसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(२) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

(३) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी , वि.स.स.

(४) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव

महालेखाकार कार्यालय, मुंबई :

(१) श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार

(२) श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) डॉ. भगवान सहाय, अपर मुख्य सचिव (कृषी)

(२) श्री. क. म. वंजारे, उप सचिव (कृषी)

(३) श्री. अशोक अमानकर, महाव्यवस्थापक, महाबीज

(४) श्री. संजय ठकरार, महाव्यवस्थापक, महाबीज

(५) श्री. आज. जी. नाके, महाव्यवस्थापक, महाबीज

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या वाणिज्यिक अहवालातील ''महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित'' यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक १ मार्च २०१६ रोजी सकाळी ११-३० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स., तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

(४) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.

(५) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(६) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.

(७) आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. राजेश तारवी, उप सचिव.

महालेखाकार कार्यालय, मुंबई :

(१) श्री. रवीकिरण उबाळे, उप महालेखाकार,

(२) श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्रीमती कुसुम बाळसराफ, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ

(२) श्रीमती राजस कुंटे, जीएम, सीएफ ॲण्ड एएस

(३) श्री. ब. बा.चव्हाण, उप सचिव, महिला व बालविकास विभाग.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ च्या वाणिज्यिक अहवालातील " महिला आर्थिक विकास महामंडळ " यांच्या परिच्छेदासंबंधात विभागीय अधिकाऱ्यांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक सोमवार, दिनांक १ ऑगस्ट,२०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स., तथा समिती प्रमुख

(२) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

(३) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(४) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.

(५) ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.

(६) श्री. अमित साटम, वि.स.स.

(७) श्री. राजन साळवी, वि.स.स.

(८) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.

(९) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१०) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(११) ॲड. अनिल परब, वि.प.स.

(१२) आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. प्र.स.मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई